महाराष्ट्र सारस्वत

ग्रंथमाला

मासिकपुस्तकांत छापिलेलें प्रकरण.

महाराष्ट्र सारस्वत.

हें पुस्तक

विनायक लक्ष्मण भावे, बी. एस्‌सी.

यांणीं केलें तें

विष्णु गोविंद विजापूरकर, एम्. ए., यांणीं

कोल्हापूर ‘ श्रीसमर्थप्रसाद ’ छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

किंमत ८८. ट० हा० ८१.

महाराष्ट्र सारस्वत.

प्रस्तावना.

यांत माझें असें कांहींच नाहीं. या सर्व साधुसंतांच्या उष्ट्या पत्रावळी गोळा करून हें ताट तयार केलें आहे. महाराष्ट्र भाषेच्या आदि उगमापासूनचा इतिहास थोडक्यांत सांगण्याचा यांत यत्न केला आहे. ज्यांस आपल्या भाषेच्या इतिहासाचें केवळ विहंगम दृष्टीनेंच अवलोकन करावयाचें असेल त्यांस पुढील निबंधापासून थोडासा उपयोग होईलसें वाटतें. परंतु यापेक्षां खोल पाण्यांत शिरणारांस यांत कांहीं सांपडावयाचें नाहीं. व अशा विद्वानासांठीं हा प्रयत्नही नव्हे. हा निबंध लिहिण्यापूर्वीं आपल्या कवीसंबंधीं कालानुक्रमानें माहिती सांगणारें एका 'कविचरित्र' खेरीज दुसरें साधन असल्याचें माहित नव्हतें. कविचरित्र हें पुस्तक आतां अगदीं दुर्मिळ झाल्यासारखें आहे. व त्यांतील माहितीही पुष्कळ ठिकाणीं चुकीची आहेसें वाटतें. करितां पुनः माहिती मिळवून एक लहानसा निबंध लिहावा असें मनांत आणिलें. यांत मिळाली तेवढी माहिती मिळवून कवींचा काळ व त्यांचे ग्रंथ यांविषयीं लिहिलें आहे. तरी देखील त्यांत अनेक तऱ्हेच्या चुका राहण्याचा संभव आहे. शुद्धाशुद्धासारख्या सहज लक्षांत येणाऱ्या चुका यांत पुष्कळच आहेत. पण आतां त्यास इलाज नाहीं. त्या सर्वांबद्दलचा दोष मजकडे आहे, इतकें ह्मटलें ह्मणजे पुरें. यांतील दाखल केलेल्या माहितीसंबंधीं चुका व आणखी कवींची माहिती कोणी मजला कळविल्यास मी फार फार उपकारी होईन. वास्तवीक पाहतां एक मोठा व विस्तृत निबंध या विषयासंबंधीं असणें फार जरूर आहे. परंतु त्यास योग्य व अवश्य अशी बुद्धिमत्ता व फुरसत हीं दोन्हीं साधनें मजजवळ नाहींत असा लेख कोणी विद्वानानें लिहिल्यास त्याचे भाषेवर अनंत उपका होतील यांत शंका नाहीं. हा निबंध लिहितांना ज्या माझ्या मित्रां मजला मदत केली, त्यांचा मी फार अभारी आहे.

आतां ग्रंथमालेच्या चालकांस व आश्रयदात्यांस धन्यवाद न महाराष्ट्र भाषेचा इतिहास लिहिण्याची प्रेरणा कोणा विद्वानास्ते बुद्धीचा प्रेरक सविता करो, येवढीच प्रार्थना करितों.

वि० ल० भावे.

महाराष्ट्र सारस्वत.

या आपल्या हिंदुस्थान देशांत, सर्वांत मनुष्याची वसति अगोदर झाली असावी असा पुष्कळांचा अंदाज आहे. तसेंच भाषेला येणारी स्थिरता, व ती लिहिण्याची कला, यांही गोष्टी इकडे फार पूर्वीपासून असाव्यात आणि तसेंच भाषेंत पद्यांची योजना होण्यास अवश्य ती सुधारणा ही फारच प्राचीन कालीं झाली असावी अशी अटकळ आहे. या देशांतले मूळचे रहिवासी महार, मांग, भिल्ल व कोणाकोणाच्या-मतें कोळी, मऱ्हाटे वगैरे लोक असावेत. हे अगदीं रानटी स्थितींत असून 'श्वपच' ह्मणजे कुत्रे लांडगे वगैरे प्राण्यांचे व मेलेल्या जनावरांचें मांस भक्षण करीत. हे अशा स्थितींत असतां या देशांत आर्य लोक आले. त्यांनीं या मूळच्या रहिवाशांस जिंकून येथें आपला कबजा चालू केला. आर्य लोक हे जात्याच बुद्धिमान असल्यामुळें व त्यांस या हिंदुस्थानासारखा उत्तम प्रदेश मिळाल्यामुळें, त्यांची स्थिति फार सुधारत चालली, व या देशाची एकंदर भरभराट होऊं लागली. इतिहासाच्या दृष्टीस गोचर असा या देशाचा पहिला काळ, ज्याकाळीं **भारतीय** युद्ध झालें तो होय. या कालापलीकडे सर्व अगदींच अंधारं आहे. भारतीय युद्धाचा शेवट होऊन **युधिष्ठिरास** राज्याभिषेक झाला, आणि 'युधिष्ठिराचा शक' सुरू झाला. हा शक सुमारें पंचवीसशें वर्षे चालल्या नंतर, **शालिवाहन** राजा राज्य करूं लागला, आणि नंतर त्याच्या शकास आरंभ झाला. शालिवाहनाचा काल हा दुसरा उत्कर्षकाल ह्मटल्यास चालेल. शालिवाहन राजाच्या सुमारास या देशांत निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या अशा चार भाषा प्रसिद्ध होत्या. त्यांचीं नावें 'शौरसेनी,' 'महाराष्ट्री' 'मागधी' व 'पैशाची'. यांपैकींही मागधी व पैशाची या दोन्ही शौरसेनीच्याच

कन्या समजतात, व महाराष्ट्री हीहि कालांतरानें शौरसेनीपासूनच निघाली असून तिचीच एक प्रकृति होय, असें कात्यायनाचें मत आहे.[1] ह्मणजे यावरून 'शौरसेनी' हीच या देशाची अगदीं जुनाट व मुळची भाषा असावी असें दिसतें. 'शौरसेनी' ही भाषा 'शूरसेन' या प्रदेशांत ह्मणजे ज्या भागाला हल्लीं आपण 'मथुरामंडळ' ह्मणतों, त्या भागांत चालू होती. 'मागधी' ही भाषा 'मगध' देशांत चालू होती. हल्लींच्या गयेच्या आसपासचा सर्व मुलूख पूर्वी मगध देशांत मोडला जात असे. तेव्हां या मुलखांत 'मागधी' भाषा होती. 'पैशाची' ही भाषा 'पिशाच, किंवा 'पैशाच' या नांवाच्या प्रदेशांत चालत असली पाहिजे. 'पंजाब' 'बुखारा' वगैरे प्रदेशांतील 'बाल्हिक' लोक हे 'पिशाचांची संतति' होत, असें कर्णपर्वांत सांगितलें आहे. यावरून यांच्या देशाचें ह्मणजे 'पंजाब' 'बुखारा' वगैरे प्रांतांचें नांव 'पैशाच' किंवा 'पिशाच' असून, यांची जी भाषा तिलाच 'पैशाची' अशी संज्ञा असावी. 'महाराष्ट्री' ही भाषा या नांवावरूनच 'महाराष्ट्र' या प्रांताची असावी असें वाटतें. 'पैशाची' या भाषेला 'बाल' भाषा अथवा 'प्राकृत' भाषा अशीही संज्ञा आहे. तसेंच 'महाराष्ट्री' याचेंही 'मराठी' हें एक रूपांतर असावें.

वर 'शौरसेनी', 'महाराष्ट्री', 'मागधी' व 'पैशाची' ह्मणून ज्या चार भाषा सांगितल्या, त्या सर्व मूळ येथल्याच असाव्या असें कांहीं ग्रंथकार ह्मणतात, व कांहींच्या मतें या सर्व, संस्कृत भाषेमध्यें फेरफार होऊन झालेल्या असाव्या. प्राकृत—या शब्दांत 'शौरसेनी' वगैरे सर्वांचा समावेश कांहीं ग्रंथकार करतात—भाषा या देशाच्या मुळच्या नव्हत. ह्या देशाची मुळची भाषा, रूपांतरानें डोंगरावर राहणाऱ्या भिल्ल, कोळी, खोंड वगैरे लोकांत, आणि मद्रास, कर्नाटक, मलबार वगैरे कृष्णा नदीच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेशांत चालू आहे.

---

१ रा० रा० भागवत.

मुळच्या भाषेस ' द्राविडी ' भाषा असें ह्मणतात. तेव्हां असें ह्मणणारांच्या मतें आपल्या ' मराठी ' भाषेचें जननीत्व ' द्राविडी '-भाषेकडे जातें हें उघड आहे. या मतास विद्वान् लोक संमति देत नाहींत. ' शौरसेनी ' इत्यादि करून सर्व ' प्राकृत ' भाषा संस्कृतापासून निघाल्या असाव्या हें पुष्कळ जणांस मान्य आहे; परंतु यांखेरीज मराठीची उत्पादक ह्मणून निराळीच भाषा असावी असें ते ह्मणत नाहींत. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, ' महाराष्ट्री 'मध्यें अंतर पडतां पडतां सांप्रतची मराठी भाषा झाली आहे, व मराठीमध्यें पुन्हां संस्कृत, आरबी, फार्सी वगैरे शब्द मिसळले आहेत; परंतु या वेगळे कित्येक निव्वळ ' देशी '[२] ह्मणून जे शब्द आहेत, त्यांच्या उगमाचा अद्यापि पत्ता लागला नाहीं.

या सर्वांस, ' शौरसेनी ', ' महाराष्ट्री ', ' मागधी ' व ' पैशाची ' या चारी भाषा संस्कृतापासूनच निघाल्या हें ह्मणणें मान्य आहे. तेव्हां आतां ' संस्कृत ' या भाषेसंबंधानेंच थोडा विचार करूं. ' संस्कृत ' ही भाषा कोणच्या देशाची व ती कधीं आणि कोणत्या लोकांत चालू होती? वर ज्यांचीं मतें दाखल केलीं आहेत, त्यांपैकीं या प्रश्नाचा कोणीच विचार केला नाहीं. भाषेचें नांव बहुतकरून लोकांच्या अगर देशाच्या नांवावरून पडतें. ' ग्रीक ' भाषा ' ग्रीस ' देशाची व ती बोलणारे लोक ' ग्रीक ' होत. तसेंच ' लॅटिन ' ' हीब्रू ' वगैरे भाषांचेसंबंधानेंही तसल्याच सारख्या शब्दाचे वाचक ' लोक ' व ' देश ' आहेत. बहुतेक जुन्या भाषांची ही पद्धत आढळते; परंतु देशाची जर जुनी व मुळची भाषा बदलून,

---

१ कृष्णशास्त्री गोडबोलेकृत व्याकरण.

२ रामचंद्रकृत सुबोध व्याकरण.

देशी होका मऱ्हाठी । परि उपनिषदाची राहटी ।
तरी हा अर्थु जिवाचिये गांठीं । कां न बांधावा ॥

या विवेकसिंधूतील ओवीवरून मुकुंदराजाचे वेळीं मराठीखेरीज ' देशी ' ह्मणून निराळे शब्द किंवा भाषा असावी असा संशय येतो.

[illegible] मी ' भाषा ' योजिली असेल, तर हा संबंध त्या ठिकाणीं
क[illegible] येणार नाहीं. [illegible] मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या होऊन,
ते थोडथोडे वसाहत करूं लागले, त्यावेळीं त्यांची व येथील लोकांची
भाषा अगदीं निराळी असल्यामुळें, व्यवहाराला पंचाईत पडूं लागली.
ही अडचण दूर करण्यासाठीं दोघांना सोयीची पडेल, अशी नवीच
' ऊर्दू ' भाषा तयार करावी लागली. तेव्हां या अशा ' ऊर्दू '
सारख्या भाषेच्या वाचक अशा शब्दाचें ' लोक ' किंवा ' देश '
सांपडणें अशक्य आहे. तसेंच ' संस्कृत ' हा शब्द भाषावाचक
सर्वत्र आढळतो ; ' परंतु ' किंवा अशाच अर्थाचे वाचक ज्यांस शब्द
लावतात असे ' लोक ' किंवा ' देश ' कोठेंही असल्याचें आढळत
नाहीं. यावरून ' संस्कृत ' हें नांव कोणत्याही ' देशाचें ' किंवा
' लोकांचें ' नसून ह्या नांवानें प्रसिद्ध जी भाषा, तीही कधीं व
कोठेंच ' चालू ' अगर ' व्यवहारांतली ' नसावी असें पुष्कळांचें
मत आहे. याखेरीज ' संस्कृत ' या शब्दाच्या अर्थावरूनही हा
शब्द एखाद्या देशच्या मुळच्या भाषेस लावला असेल, किंवा लावीत
असतील असें दिसत नाहीं. कोणत्या तरी मूळ भाषेवर ' संस्कार '
होऊन, व तींत ' सुधारणा ' होऊन जी सफाईदार भाषा बनविली,
तिलाच ' संस्कृत ' अशी संज्ञा मिळणें जास्त सयुक्तिक दिसतें.

हा दाखल केलेला विचार खरा ठरला आणि तो एकदां
मान्य झटला, झणजे वर निर्दिष्ट केलेल्या, ' संस्कृता 'स इकडील
सर्व भाषांचें ' मातृत्व ' देणाऱ्या ग्रंथकारांचे विचार एकीकडे सारावे
लागतात. इतकेंच नव्हे, तर ' शौरसेनी ' पासून ' महाराष्ट्री ' व
इतर भाषा निघाल्या, हेंहीं असयुक्तिक दिसतें. ' महाराष्ट्री ' व
' मराठी ' या दोन्ही शब्दांचा संबंध अगदीं उघड व स्पष्ट आहे.
' महाराष्ट्र ' हा देशवाचक शब्द आहे हेंही निर्विवाद आहे, व
ज्या प्रांतास हा शब्द हल्लीं आपण लावतों, त्याच प्रांतास तो
पूर्वींही लावीत असत हें पण ' सिद्ध ' आहे. आतां ' महाराष्ट्री '
अगर ' मराठी ' ही भाषा, 'महाराष्ट्र ' हा देश व ' महाराष्ट्र ' अगर

'मराठे' हे लोक ही त्रयी, किंवा यांपैकीं एखादा घटक किती जुना आहे याबद्दल पाहूं.

नंदाचें राज्य मगध देशांत असतां, ह्मणजे शालिवाहन शकाचे पूर्वीं सुमारें सव्वाचारशें वर्षें **वररुचि** नांवाच्या विद्वानानें 'प्राकृत-प्रकाश' या नांवाचें एक प्राकृत अगर 'बाल' भाषेचें व्याकरण रचलें आहे. त्यांत त्यानें 'शेषं महाराष्ट्रीवत्' हें सूत्र दाखल केलें आहे. यावरून वरील ग्रंथकाराच्या वेळीं 'महाराष्ट्री' ही भाषा, ज्या भाषेचें तो व्याकरण लिहित होता, तीपेक्षां जास्त 'व्यवहारांतली' असावी असें दिसतें. 'महाराष्ट्र' हा देशवाचक शब्दही असाच फार जुना दिसतो. **अशोकानें** आपल्या **बुद्ध** धर्माचा प्रसार करण्यासाठीं आपले चेले 'महाराष्ट्रांत' पाठविले होते. तेव्हां हा देशही पूर्वींचाच असला पाहिजे. आतां 'महाराष्ट्र' लोक हे केव्हांचे याबद्दलही संशय घेण्याचें कारण नाहीं. कारण 'भाषा' व 'देश' हीं दोन्ही जर फार प्राचीन तर लोक तेवढे अर्वाचीन कसे मानतां येतील? तेही प्राचीनच ह्मटले पाहिजेत. पण 'महाराष्ट्र' याच मूळ शब्दाच्या उत्पत्तीविषयीं अगदीं निरनिराळीं मतें दाखल केलेलीं आढळतात. 'राठोड' नांवाचे रजपूत लोक मारवाडांत आहेत. यांचेच पूर्वज 'महाराठोड' अगर 'मोठे राठोड' समजावे. 'महाराठोड' या शब्दापासून अपभ्रंश होऊन त्याचा 'महाराष्ट्र' असा शब्द झाला ही एक व्युत्पत्ति.[1] 'महाराष्ट्र' हा शब्द 'महारठ' या शब्दापासून निघाला असावा. व 'महारठ' हा 'महारथ' ह्या शब्दाचें रूपांतर. 'महारथ' ह्मणजे 'मोठा' व 'बलवान् योद्धा.' ही दुसरी. कोणी[2] 'महाराष्ट्र' हा मूळ 'मराठा' अगर 'मऱ्हाठा' या शब्दाचें संस्कृतरूप मानतात. व 'मराठा' अगर मऱ्हाठा याची, 'मरेंगे जब हटेंगे' अशी व्युत्पत्ति करतात. या तिसरीपेक्षांही चौथी एक

---

१ म० सं० चार उद्गार. २ व्युत्पत्तिप्रदीप.

व्युत्पत्ति करण्याची चाल आहे. महा ह्मणजे मोठें व राष्ट्र. हा अगदीं सोपा व उघड मार्ग आहे. याहीपेक्षां महार आणि राष्ट्र अशीं पदें पाडून महाराष्ट्र ह्मणजे महारांचें राष्ट्र असा अर्थ केला आहे. या सर्वांत तिसरी पुष्कळांना मान्य दिसते. तें कसेंही असो; पण या निरनिराळ्या उत्पत्तींवरून हा शब्द बराच प्राचीन आहे असें दिसतें.

वर लिहिलेलें सूत्र, संस्कृत शब्दाच्या संबंधीं विचार व महाराष्ट्रत्रयी इत्यादिकांवरून मराठी अगर या अर्थाचा वाचक असा प्राचीन शब्द संस्कृत अगर शौरसेनी भाषांच्या पूर्वींचा दिसतो, व या सर्व भाषांपेक्षां महाराष्ट्री अगर मराठी ही फार प्राचीन भाषा असावी असें दिसतें. कांहीं विद्वान् लोक प्राकृत हा शब्द ' पाअड ' ह्या शब्दापासून निघालेला मानतात, व पाअड किंवा प्राकृत ह्मणजे व्यवहारांतली चालू भाषा असा अर्थ घेऊन प्राकृत ह्मणजे सर्वांत जुनी व्यवहारांतली अशी महाराष्ट्री भाषा समजतात. आणि या जानपद किंवा व्यवहारांतल्या महाराष्ट्री भाषेपासून शौरसेनी वगैरे इतर प्राकृत भाषा व त्यांपासूनच पुढें संस्कृत ही भाषा निघाली असें मानतात.

महाराष्ट्री किंवा मराठी ही भाषा फार प्राचीन व अगदीं प्राकृत ह्मणजे जानपद किंवा प्रचारांतली अशी असल्यामुळें, मागून तींत कितीही भर पडली, किंवा कसाही बदल झाला तरी अगदीं घरगुती व बायकामुलांच्या प्रचारांतले शब्द न पालटतां, तसेच राहतील हें उघड आहे, व असे अगदीं शुद्ध मराठी किंवा देशी शब्द आपल्या भाषेंत अजूनही पुष्कळ आहेत. जसें:—डोळा, पोट, ढोंपर, आणि, देखील, अगर, खालीं, हाड, वाट, आई, बाप, दोरी, थेंब गवत इ० इ०. संस्कृत, आरबी, फार्सी, वगैरे कोणत्याही भाषेशीं यांचा संबंध असेल असें दिसत नाहीं. तसेंच आपल्या हल्लींच्या प्रचारांतलीं सर्वनामें

१ व्युत्पत्तिप्रदीप. २ मोलस्वर्थकृत कोश.

कांहीं विभक्तिप्रत्यय आणि सर्वनामांचीं व विभक्तींचीं रूपें हींहि अगदीं स्वतंत्र दिसतात. यांचाही कोणत्या दुसऱ्या भाषेंतल्या त्या त्या वाचक शब्दांशीं संबंध दिसत नाहीं. यावरून हे सर्व अगदीं जुन्या मराठीचे तसेच राहिलेले अवशेष समजावे.

फार प्राचीन काळच्या मराठींत अगर महाराष्ट्रींत रचलेले ग्रंथ हल्लीं उपलब्ध नाहींत. शालिवाहनाच्या काळचा व शालिवाहनानेंच इतर पंडितांच्या सहाय्यानें रचलेला असा **सप्तशती** नांवाचा एक गाथामय ग्रंथ आहे. या ग्रंथाची भाषा महाराष्ट्री समजतात. पण ही इतकी जुनी आहे कीं, हल्लींच्या मराठी अगर महाराष्ट्री भाषेचें रूप यांत बिलकुल दिसत नाहीं. शालिवाहनानंतर जवळ जवळ हजार वर्षें-पर्यंत मराठीचें स्वरूप कसें होतें हें कळण्यास मार्ग नाहीं. या नंतरच्या काळांतले शिलालेख व ग्रंथ हल्लीं उपलब्ध आहेत. या काळीं ह्मणजे शालिवाहन शकाच्या अकराव्या किंवा बाराव्या शत-कांत **जाधव** किंवा **यादव** कुळांतले राजे राज्य करीत होते. या राजांनीं दिलेले ताम्रपट हल्लीं उपलब्ध आहेत. यांपैकीं इ० सन ११८१ मधला एक शिलालेख **परळ** येथील गव्हरनरसाहेबांच्या बंग-ल्याचा पाया खणीत असतां, त्यांत सांपडलेला आहे. यांत एका मनुष्याला कांहीं जमिनीची देणगी दिल्याबद्दलचा लेख आहे. या लेखाची भाषा मराठी आहे. असेच भगतपणाबद्दलच्या वतनांचे कांहीं ताम्रपट जाधवांच्या वेळचे आहेत असें ह्मणतात.

जाधवांच्या गादीची प्राणप्रतिष्ठा शके १११२ चे सुमारास झाली. **बल्लाळ** नांवाचा राजा हा या गादीचा मूळ पुरुष होय. यांची गादी ‘ बाण गंगेच्या तिरीं । मनोहर अंबानगरीं । ’ येथें होती. बल्लाळाचा मुलगा **जयंतपाळ** हा गादीवर असतां, आरंभीं लोकांना फार त्रास देत असे. कोणी संत, विरक्त पुरुष भेटला कीं, त्याला देव दाखीव असें यानें ह्मणावें, व त्या पुरुषाकडून तसें घडलें नाहीं, ह्मणजे त्याला कैदेंत टाकावें, व त्याचा छळ करावा. असें होतां होतां एके दिवशीं **मुकुंदराजा**ची व याची गांठ पडली, व राजाला मुकुंदराजांनीं प्रत्यक्ष

स्वरूपाचें दर्शन घडविलें. त्या दिवसापासून जयंतपाळानें मुकुंदराजाचा गुरूपदेश घेतला, व कोणालाही पुनरपि असा प्रश्न करावयाचें सोडून देऊन त्यानें आपलें चित्त ईश्वराकडे लाविलें. मुकुंदराजानें जयंतपाळास गुरूपदेश दिला, यावरून हा ११९० चे सुमारास विद्यमान असावा. मुकुंदराजाची इतर माहिती कोठेंच आढळत नाहीं. त्यानें आपल्या विवेकसिंधु ग्रंथांत 'आदिगुरू श्रीआदिनाथ । तेथूनि श्रीहरीनाथ । तयाचा शिष्य रघुनाथ । जो गुणसिंधु ॥ अशी आपली गुरुपरंपरा सांगितली आहे, व थोडक्यांत आपल्या गुरूचें वृत्तही दिलें आहे. त्यांत—माध्यंदिनीशाखें । अवतार केला परमपुरुषें । चांपे गोराना वंशे । अतिमनोहर ॥ असें ह्मटलें आहे. हल्लीं मुकुंदराजाचे परमामृत व विवेकसिंधु असे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पैकीं परमामृत हा ग्रंथ आधीं रचिला असावा. हा रा० **माठे** यांनीं छापला आहे. यांच्या प्रस्तावनेंत मुकुंदराज हा मोंगलाई राज्यांत असून, **अमृतराया**चा समकालिन होता असें लिहिलें आहे; परंतु हें लिहिणें अगदीं चुकीचें दिसतें. **ज्ञानेश्वर** वगैरे चार भावंडांच्या वेळच्या अभंगांत याचा उल्लेख आहे, यावरून, व हा जयंतपाळाचा गुरु होता, यावरून हा ११९० चे सुमारासच होता, हें उघड आहे. रा० माठे यांनीं परमामृत हा ग्रंथ पूर्वीं सन १८७७ सालीं छापलेल्या एका पोथीवरून छापला आहे. या पोथीची रा० माठे यांस मिळालेली प्रत अगदींच जीर्ण व अपुरी अशी होती. खेरीज ती बऱ्याच ठिकाणीं फाटली असल्यामुळें, रा० माठे यांनीं कांहीं ओंव्यांची समस्या पूर्ण करण्यासाठीं स्वतःच चरण रचून घातले आहेत. असे नवीन घातलेले चरण एकंदर ९२ आहेत. याखेरीज मधून मधून मजकुराच्या जुळणीसाठीं ह्मणून ६२ ओंव्या अगदींच नवीन रचून घातल्या आहेत. हा फेरबदल कांहीं विवक्षित चिन्हांनीं ग्रंथांत दाखविला असल्यामुळें, यांत कांहीं विशेष गेलें असें नाहीं; परंतु एकंदर ग्रंथभर शब्द फाटून गेल्याठिकाणीं नव्या शब्दांची योजना केली आहे, व जुनाट शब्दार्थीं सांप्रतचे प्रचारांतील

१ नवनीतांत मुकुंदराजाचा शक ९०० असा दिला आहे.

शब्द योजले आहेत, व ही योजना कोठें कोठें केली आहे हें दाखविलें नाहीं. यामुळें एका दृष्टीनें पाहतां, हा ग्रंथ जरा निरुपयोगी झाला आहे. परमामृताची एक अस्सल लेखी प्रत मिळाली, तीवरून ताडून पाहतां, यांत बराच फरक दिसतो. परमामृताची एकंदर चौदा प्रकरणें आहेत, व त्या सर्वांत मिळून ग्रंथसंख्या ३३८ आहे. यांत सर्व वेदांत विषयावर चर्चा आहे. मुकुंदराजाचा दुसरा ग्रंथ ' विवेकसिंधु ' हा होय. या ग्रंथाची रचना त्यानें ' जयंतपाळास ' ब्रह्मज्ञानाचा उपदेश होण्याकरितां केली असें, ' नृसिंहाचा बल्लाळ त्याचा कुमार जयंतपाळ । तेणें करविला हा रोळ । ग्रंथरचनेचा ', या त्यांतील ओंवीवरून होतें. या ग्रंथाचे पूर्वार्ध व उत्तारार्ध असे दोन भाग करून, पहिल्यांत सात व दुसऱ्यांत अकरा मिळून अठरा प्रकरणें आहेत. एकंदर ग्रंथसंख्या १६७० आहे. यांत गुरुशिष्य संवादरूपानें विषय प्रतिपादन केला आहे. **शांकरदर्शन** यांचें प्रधान मत होतें, व वरील दोन्ही ग्रंथ यानें त्याचा आधार धरून लिहिले आहेत[2]. याविषयीं ' श्री शांकरोक्तीवरी । मी बोलिलों मराठी वैखरी । ह्मणोन येथ धरावी चतुरीं । शास्त्रबुद्धी ॥ म्या आपुली निजवाणी । पवित्र केली ती ही वचनीं । ते प्रीति पावो पिनाकपाणी । श्री मुकुंद ह्मणे ॥ '. वरील दोन्ही ग्रंथांतील विषय व विचार गहन आहेत. यामुळें हें ग्रंथ फारसे प्रचारांत नाहींत असें दिसतें. यांची भाषा मुकुंदराजाचे मागून बऱ्याच वर्षांनीं रचलेल्या ज्ञानेश्वरीपेक्षां सोपी आहे. यांत जुनाट व अप्रसिद्ध शब्दही ज्ञानेश्वरीच्या मानानें पाहतां बरेच कमी आले आहेत. विवेकसिंधु हा ग्रंथ रचण्यांत कवीला बरेच श्रम पडले असावेत असें दिसतें[3]. मुकुंदराज हा राजगुरु होता. यावरून जाधवांचें आपल्या भाषेवर बरेंच प्रेम असावें व त्या काळीं मराठी ग्रंथकारांनाही चांगलें उत्तेजन असावें असें

---

१ परमामृत. २ भा० अ० कोश.

३ मज श्वास निमिषेचाश्रम । तेथें कायसा या ग्रंथाचा उगम । परी फळला मनोधर्म । सद्दैवाचा ॥ ... उपजण्याचा श्रम नेणे बाळ । तयाचें मुखीं मिष्टान्न कवळ । सुयें जेवी जननी कृपाळ । अपत्यविषयीं ॥

मानण्यास हरकत नाहीं. परमामृताच्या आधींचा ग्रंथ हल्लीं उपलब्ध नाहीं, याकरितां परमामृत हाच मराठी भाषेंतील आद्य ग्रंथ व मुकुंदराज हा आद्य कवि मानला पाहिजे. कोणी कोणी **चांगावटेश्वर** हा आद्य कवि होय असें मानतात. परंतु याचा एकही ग्रंथ हल्लीं प्रसिद्ध नाहीं; किंवा नुसता याचा अमुक एक ग्रंथ असल्याबद्दलही कोठें उल्लेख नाहीं. खेरीज याचा काळही निश्चयानें सांगतां येत नाहीं. आणि अदमासानेंच काळ ठरवावयाचा तर हा फार तर, ज्ञानेश्वराच्या थोडा आधींचा असावा असें दिसतें. ज्ञानेश्वरचरित्रांत याला ज्ञानेश्वरानें उपदेश केला, वगैरे अख्यायिका दिल्या आहेत. तेव्हां तो ज्ञानेश्वराच्या आधीं साठसत्तर वर्षें होऊन गेलेल्या मुकुंदराजाच्याही पूर्वीचा असेल असें संभवत नाहीं. यामुळें आणखी कांहीं जास्त माहिती प्रसिद्ध होईपर्यंत तरी मुकुंदराजास आद्य कवि ह्मणणें भाग आहे. याची समाधि आंबे येथील डोंगराचे अतिशय अडचणीचे जागीं आहे. लोक अजूनही तेथें दर्शनास जातात. याचा समाधिशक कोठेंही दिलेला आढळत नाहीं. तरी हा जयंतपाळाचे कारकीर्दीतच समाधिस्थ झाला असावा.

जयंतपाळाच्या पश्चात्, जाधवांनीं आपली गादी **देवगिरी** येथें नेली. या देवगिरीलाच हल्लीं **दौलताबाद** असें ह्मणतात. येथें श० १२०३ चे सुमारास **रामदेवराव** राज्यपदावर होता. हा जयंतपाळापासून चौथा पुरुष. याचे पदरीं **हेमाद्रि** किंवा **हेमाड** पंत[१] या नांवाचा एक विद्वान् ब्राह्मण होता. हा ब्राह्मण राज्याची सर्व व्यवस्था पाहत होता. याचा मराठी भाषेस बराच आश्रय असावा असें दिसतें. यानें दक्षिणेंतून तीन जिनसा आणल्या. खाण्यांत बाजरी, राहण्यांत बिनचुन्याचीं घरें व लिहिण्यांत मोडी लिपी. यावरून ही मोडी–हिलाच राक्षसी ह्मणतात — लिपी पूर्वीं

१ क० च०. शि. छ. च०. २ भा. अ. कोशकारानीं हेमाडपंत हा पैठणांत चंद्रसेन राजाचे पदरीं शके ११२५ त दिवाण होता असें लिहिलें आहे.

इकडे नसावी असें दिसतें. परंतु ही लिपी अगदीं निव्वळ परक्या देशांतून इकडे आणली असावी, हें अगदीं संभवत नाहीं. ह्या लिपींत **ग, म, त, र, अ, ण** वगैरे, ज्या चिन्हांनीं दर्शविले जातात, त्या चिन्हांचें **देवनगरी** लिपींतल्या चिन्हांशीं किती साम्य आहे हें लक्ष्यांत आणलें ह्मणजे, ही लिपी स्वतंत्र नसावी असें वाटतें. या काळच्या देवनगरी अक्षरांत व मोडी अक्षरांत तर फारच साम्य आहे. यावरून ही लिपी **हेमाडपंतानें** देवनगरी-वरून स्वतःच बसविली असेल असें वाटतें. याचे संस्कृतांत एक दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत, व मराठींतही **लेखनपद्धति** नामक याचा एक ग्रंथ असल्याचें याचे चरित्रकार सांगतात. अ० कोश-कर्त्यांनीं हा ग्रंथ सांपडला नाहीं असें ह्मटलें आहे. परंतु ऐकीव माहितीवरून त्यांतील पुढील एक मायना दिला आहे.

" विज्ञापना अशी कीं, राजश्री **देवरावदादानीं** मजला विनंति केली कीं, आमच्या सर्व भाउबंदांनीं **दीक्षित** यांचा आश्रय करून समाईक जो इनाम आहे, तें क्षेत्र पितृसंपादित तेव्हां भागिलें असावें, हें विहित असून विभाग न देतां उत्पन्न तेच घेतात; यास्तव आलों आहों. तरी, कृपाकरून त्या इनामांत आह्मांस भाग येईल असें दीक्षित यांस स्नेहितकीचें एक पत्र द्यावें, याकरितां लेखनांत येतें कीं, दादानीं जो वाका मज समजाविला असे तो सत्य रीतीनें ध्यानीं आणाल, विशेष लिहिणें नकोच हे विनंति. " हाच मायना **पुणेवैभव** छापखान्यांतल्या ज्ञानेश्वर महाराज यांचें चरित्रांतही दिला आहे. तसाच इतरत्रही हाच आढळतो. हेमाद्रिकृत लेखनपद्धति हा ग्रंथ पुष्कळ शोध करूनदेखील मिळाला नाहीं, व तो प्रत्यक्ष पाहिल्याबद्दलही कोणी खात्रीनें सांगत नाहीं. तथापि हेमाद्रिकृत लेखनकल्पतरू या नांवाचें एक फार जुनें पुस्तक पाहण्यांत आलें आहे. हें शके १७७४ मध्यें

---

१ कविचरित्र, व भा० व० अर्वाचीन कोश.

गणपत कृष्णाजीचे छापखान्यांत छापिलें आहे. कविचरित्र वगैरेवर ज्यांत या ग्रंथाचा उल्लेख आहे ह्मणून ह्मटलें आहे, ती सर्व यानंतरची आहेत. तसेंच कल्पतरूमध्यें वरील उताऱ्यांतला मायना दिला आहे. यावरून कदाचित् ‘ कल्पतरू ’ याचेऐवजीं ‘ पद्धति ’ हें नांव कविचरित्रांत चुकून पडलें असावें व मग त्याची पुनरावृत्ति होत गेली असावी असें वाटतें. हें खरें असेल तर, हेमाद्रिकृत लेखनकल्पतरू, हाच या हेमाडपंताचा ग्रंथ मानला पाहिजे. या ग्रंथांत लिहिण्याच्या, शुद्धरीति, सात्विकरीति व रहस्यरीति अशा तीन रीती कल्पून त्यांचे नियम वगैरे दिले आहेत. ग्रंथांत हेमाद्रिपंताचे ह्मणून मूळ श्लोक, व त्याखालीं स्पष्टीकरणार्थ टीकाकारानें लिहिलेले मायने वगैरे दिले आहेत. यांत दिलेले मायन्यांत बरेच मायने, वरील उताऱ्याप्रमाणें नीट गद्याप्रमाणें व पुन्हां आर्या, गीती, अभंग वगैरे पद्यांप्रमाणें, कांहीं ठिकाणीं थोडी ओढाताण करून, वाचतां येतात. परंतु हे स्पष्टीकरणार्थ दिलेले मायने हेमाद्रीचे नव्हत असें यांत सांगितलें आहे, ह्मणून त्याबद्दल जास्त लिहिणें नको. आतां यांत दिलेल्या मूळ श्लोकां संबंधानें पूर्वी हेमाद्रिपंत याणीं सर्व लिहिणारांचे उपयोगी ह्मणून, हा लेखनकल्पतरू ग्रंथ नानाछंदांत श्लोकबद्ध केला असें त्याच्या प्रस्तावनेंत ह्मटलें आहे. त्यांत लहानथोर, धनीनोकर, राजाप्रधान, नवराबायको, रक्षायजमान, वगैरे सर्वांनीं एकमेकांस लिहावयाचे माने सांगितले आहेत. त्यांतील उदाहरणार्थ खालीं देतों.

“ श्रीमंत स्वप्रभुला, श्रीयामंडित दिवाण लोकांस ।
श्रीयाविराजित असें, प्रभुच्या सर्वांहि बंधुवर्गास ॥
श्रीयामंडित तैसे, श्रिया विराजित समान हा अर्थ ।
स्थूलत्वें दिसतो परि समर्थ सूक्ष्म जया विचारार्थ ॥

हा यजमान व त्याचे बंधु, दिवाण वगैरेसंबंधीं व

श्रीमंता सुगुणेश्वरा, नरवरा चातुर्यरत्नाकरा ।
मद्भर्त्या, मधुरोत्तरा, श्रमहरा, सौंदर्यविद्याधरा ॥

शास्त्रज्ञा सुखसागरा, शुभतरा सौभाग्यभाग्याकरा ।
माझ्या पूज्य सुरा, सदा प्रियकरा, भर्तार, प्राणेश्वरा ॥

हा स्त्रीनें पुरुषास लिहावा असें सांगितलें आहे. ग्रंथाचे शेवटीं एक ' हिंदुस्थानी आणि मराठी भाषेचा कोश ' ह्मणून सुमारें चारशें शब्दांचा कोश दिला आहे, व मलपृष्ठावर हा **मुनशी गणपतराव सातारकर** यांणीं मूळ ग्रंथावरून तपासला, व **रखमाजी देवजी मुळे** यांणीं छापविला असें लिहिलें आहे; पण या एकंदर ग्रंथावरून हा ग्रंथ **हेमाद्रीपंताचा** नसून त्याच्या नांवावर उगाच कोणी लबाडानें रचला असावा असें खास वाटतें. कारण, यांत अगदीं पहिल्याच श्लोकांत, पहिलेच चरणांत, पहिलाच शब्द ' चिटणिशी ' असा आहे, व असेच मुसलमानी वगैरे शब्द मधून मधून पुष्कळ आढळतात. तसेंच ज्या जागाच मुळीं **शिवाजीनंतर** मराठी राज्यांत निर्माण केल्या, त्यासंबंधींही यांत उल्लेख आलेले आहेत, व या पद्यांत गीति, आर्या, शार्दूलविक्रीडित, द्रुतविलंबित वगैरे बरींच वृत्तेंहीं आलीं आहेत. या व अशाच इतर सबल कारणांवरून हा ग्रंथ **हेमाद्रीचा** खास नसून, यानें आज बरींच वर्षे आमच्या ग्रंथकारांस चकविलें असें दिसतें.

मुकुंदराजानंतर—ज्यांची कृति उपलब्ध आहे, असे—ज्ञानेश्वर महाराज कवी झाले. यांच्या बापाचें नांव **विठ्ठलराव** व आईचें नांव **रखमाबाई**. विठ्ठलपंत हा चांगला वृत्तिवंत ब्राह्मण असून, फार विद्वान् होता. याला एकंदर चार अपत्यें झालीं. **निवृत्तिनाथ, ज्ञानदेव,** व **सोपानदेव** हे मुलगे आणि **मुक्ताबाई** ही मुलगी. हे **ओप** गांवचे राहणारे असून यांचें आडनांव महिषे[1] किंवा ह्मसे असावें. निवृत्तिनाथ यांचा जन्म शके ११९० मध्यें झाला, व यानंतर तीन तीन वर्षांनीं बाकी भावंडें झालीं. ह्मणजे ज्ञानदेव ११९३ त, सोपानदेव ११९६ त व मुक्ताबाई ११९९ तें[2]. एका ज्ञानदेव चरित्रांत हेंच शक अनुक्रमें

१ हिंदुधर्मविवेचक. २ पारखकृत ज्ञा. म. च व भागवतकृत च.

१२००, १२०२, १२०४ व १२०६ असे दिले आहेत. कोशांत हेच अनुक्रमें ११९२, ११९४, ११९६ व ११९८ असे आहेत- एका बखरकारानें हे विजयानगरच रामराजाचे वेळीं झाल्याचें लिहिलें आहे, व एका चरित्रकारानें यांचा जन्म सन १२८० ह्मणजे शके १२१२त झाला असें ह्मटलें आहे. यांपैकीं पहिला व तिसरा हे आंकडे जास्त संभवतात. कारण, ज्ञानेश्वरीचे शेवटीं, 'शके बाराशें बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें। सच्चिदानंद बावा आदरें। लेखकु जाहला'॥ अशी ओंवी आहे. यावरून ज्ञानेश्वरी १२१२त लिहिली हें खास आहे. तेव्हां पु० वै० चरित्रकारांप्रमाणें, दहावे वर्षीं व वि० प०कारांचेप्रमाणें जन्माचेच वर्षीं ग्रंथरचना झाली असें होतें. अर्थात् दोन्ही शक चूक आहेत हें उघड आहे. बखरीकारांचें ह्मणणें बरोबर नाहीं; कारण, ज्ञानेश्वरींतच 'ते यदुवंशविलास। जो सकळ कळा निवास। न्यायातें पोषीं क्षितीश। श्रीरामचंद्र॥' अशी ओंवी आहे. यावरून वर दिल्यापैकीं पहिलेच शब्द खरे ठरतात. ज्ञानेश्वराचे भावंडांपैकीं वडील भावाचें नांव निवृत्तिनाथ. यानीं एक निवृत्तिबोध या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे असें ह्मणतात; पण तो हल्लीं उपलब्ध नाहीं. यानीं केलेलें परमप्रकाश नांवाचें ८९ ओंव्यांचें प्रकरण हल्लीं प्रसिद्ध आहे. खेरीज यांचे अभंग मात्र कोठें कोठें आढळतात. यांनीं, 'आदिनाथ उभा। बीज प्रगटलें। मिच्छिंद्रा लाधलें। सहजस्थितीं॥ तेंचि प्रेममुद्रा गोरक्षी दिधली। पूर्ण कृपा केली। गहिनीनाथा॥ निवृत्ति गहिनीं। कृपाकेली पूर्ण। कुळ हें पावन। कृष्णनामें॥' अशी आपली गुरुपरंपरा सांगितली आहे. वरील नांवांत कोणी मराठींत ग्रंथकार असण्याचा संभव आहे. पण हल्लीं त्यांपैकीं कोणाचेंही कांहीं उपलब्ध नाहीं. ज्ञानेश्वर महाराजांचे ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व स्वात्मानुभव, पंचीकरण वगैरे ग्रंथ आणि कांहीं अभंग हल्लीं उपलब्ध आहेत. अमृतानुभव

---

१ पु. वै. ज्ञा. च. २ रघुनाथशास्त्री गोडबोले. ३ विविधज्ञान परिभाषा. ४ भा. अ. कोश.

हा ग्रंथ त्यानीं निवृत्तिनाथाचे सांगण्यावरून अगदीं स्वकल्पित असा शेवटीं लिहिला. व स्वात्मानुभव आणि ज्ञानेश्वरी हे दोन्ही आपले वयाचे एकोणिसाव्या वर्षीं लिहिले. ज्ञानेश्वरींतील उतारा वर आलाच आहे, व स्वात्मानुभवाचेही शेवटीं, ' शके बाराशें बारा। तैं ग्रंथ केला उभारा। पारिसावया चतुरा। ह्मणे निवृत्तिदास। अशी ओंवी आहे. अमृतानुभव या ग्रंथाचीं आठ प्रकरणें असून एकंदर ओवीसंख्या ८०३ आहे. हा ग्रंथ जसा शेवटीं उत्तम ह्मणून रचला, तसाच तो उतरलाही आहे. यावर **शिवकल्याण, निरंजन, रघुनाथ** वगैरे वृद्धमान्य टीका असून, या ग्रंथाचें, **प्रल्हाद बटवई** या नांवाच्या विद्वानानें संस्कृतांत भाषांतर केलें आहे. **स्वात्मानुभव** हा ग्रंथ या सर्वांत लहान आहे. यांत एकंदर २३२ ओंव्या आहेत. तिसरा ग्रंथ **ज्ञानेश्वरी.** ही गीतेवर टीका असल्यामुळें हिचेही अध्याय अठराच आहेत. यांत सर्व मिळून एकंदर नऊ हजार सदतीस ओंव्या आहेत. या ग्रंथाची भाषा फार जुनी आहे. हींत कऱ्हें (उंट), तुलग (प्रतिध्वनि), नाडर (डबकें), पर्या (झोंका) वगैरे फार प्राचीन अशा दुर्बोध शब्दांचा भरणा फार आहे. तशीच या ग्रंथाची विचारसरणीही अतिशय गहन आहे. यामुळें हल्लीं हा वाचावा तितका वाचला जात नाहीं; परंतु अध्यात्म विषयाची ज्यांना एकदां गोडी लागली, त्यांना ज्ञानेश्वराचा कोणताही ग्रंथ फार प्रिय वाटतो. त्याचे लिहिण्यांत उपमा, अलंकार वगैरेंची योजना इतकी सरस केली आहे कीं, वाचकांच्या मनांत कवीच्या सर्व कल्पना एकदम उभ्या राहतात, व विषयाशीं तादात्म्य पावून वाचक आनंदभरांत डोलूं लागतो. ज्ञानेश्वराच्या स्वात्मानुभवाची भाषा, इतर ग्रंथांतील भाषांइतकी जुनाट दिसत नाहीं. हल्लीं प्रसिद्ध असलेल्या कांहीं अभंगांची भाषा तर स्वात्मानुभवापेक्षांही सोपी दिसते. ' नामदेवकृत तीर्थावळीचे अभंग ' ह्मणून जे अभंग सध्यां प्रसिद्ध आहेत, त्यांतही कित्येक अभंगांचें शेवटीं ज्ञानदेवाचें नांव आहे, व अगदीं शेवटच्या अभंगाचे शेवटीं ' हें सात्विकाचें धन। भोक्ते संतजन। ज्ञानदेवें पूर्ण। ग्रंथ केला॥ '

असें लिहिलें आहे. चांगदेव पासष्टी ह्मणून ज्ञानदेवाच्याच पासष्ट ओंव्या हल्लीं प्रसिद्ध आहेत. याखेरीज समास व योगवासिष्ठ असे आणखी दोन ग्रंथ ज्ञानदेवानें लिहिले आहेत असें ह्मणतात[1]. ज्ञानेश्वरी ह्मणून जी टीका सांगितली तिचें नांव भावार्थदीपिका. पण तिच्या कर्त्यावरून तिला ज्ञानेश्वरी असें ह्मणत. पंढरीचे वारकऱ्यांत हिला फार मान आहे. त्यांच्यांत तिला 'आई', असें ह्मणतात. ज्ञानेश्वरी ही श्रीमत् भगवत्गीतेवरील सर्वांत श्रेष्ठ अशी टीका आहे. हींत जो जो विषय पहावा, तो तो लोकोत्तर असून सुबोध व सरळ प्रतिपादन केला आहे. कर्मोपासना व ज्ञान हीं आत्मसंतोषाचीं मुख्य साधनें यांत फार स्पष्ट सांगितलीं आहेत. केवळ लोकोद्धारार्थ प्रतिपादन केलेल्या या ज्ञानेश्वरीचें कोणीही प्रेमभावानें पूर्ण विश्वास ठेवून, रात्रदिवस परिशीलन करील, तर तो अनायासें ईशकृपेस पात्र होऊन दुस्तर भवसमुद्र पार होईल[2]. या टीकेचें माहात्म्य त्याचवेळीं लोकांत फार होतें असें दिसतें. ज्ञानेश्वराच्या समकालिन जनाबाईनें 'माझ्या ज्ञानिया वांचुनी गीतेवरील सर्व टीका, रत्नताटांत ठेवलेल्या कांजीप्रमाणें होत' असें लिहिलें आहे. तसेंच पुढें, 'श्रीशकेपंधराशें बारोत्तरीं। तारणनाम संवत्सरीं। येका जनार्दनीं अत्यादरीं। गीता ज्ञानेश्वरी। प्रतिं शुद्ध केली॥ तेव्हां तीजसंबंधें। ज्ञानेश्वरी पाठीं। जो ओंवी करील मऱ्हाटी। तेणें अमृताचे ताटीं। जाण नरोटी ठेविली॥' अशा लाक्षणिक शब्दांनीं आपलें मत लिहून ठेवलें आहे. ज्ञानेश्वराचे धाकटे बंधु सोपानदेव यानीं थोडे अभंग मात्र रचले. पण याखेरीज यांची ग्रंथरचना नाहीं. या सर्वांची बहिण मुक्ताबाई हिचे अभंग बरेच आहेत. मृत्युसमयीं ही अवघी सोळा वर्षांची होती. हिनें लग्न मुळींच केलें नाहीं[3].

---

१ त० वि० मं० ज्ञा० च०. ज्ञानदेव आपले ग्रंथ कोळशानें एका खांबावर लिहीं असें सांगतात, व हा खांब अजूनही लोक दाखवितात. **हिंदुस्थानकथारस** कर्त्यांनीं आपण स्वत: हा खांब पाहिल्याचें लिहून ठेविलें आहे.

२ कुंटेकृत ज्ञानेश्वरी. ३ सन्मणिमालेवरील टीपा.

ही परम भाविक असून ज्ञानी होती. एक दिवस ज्ञानदेव मुक्ताबाईवर रुसून खोलींत जाऊन बसले, व खोलीचें दार उघडून मुक्ताबाईस आंत घेत ना. या वेळीं ताटी उघडून आंत येऊं देण्याविषयीं तिनें विनंति केली. ते अभंग, ताटीचे अभंग या नांवानें प्रसिद्ध आहेत. त्यांतील नमुन्यासाठीं एक दोन येथें देतों.

मजवरी दया करा । ताटी उघडा **ज्ञानेश्वरा** ॥
संत जेणें व्हावें । जगबोलणें सोसावें ॥
तरीच अंगीं थोरपण । जया नाहीं अभिमान ॥
थोरपण जेथें वसे । तेथें भूतदया असे ॥
रागें भरावें कवणासी । आपण ब्रह्म सर्वदेशी ॥
ऐसी समदृष्टी करा । ताटी उघडा **ज्ञानेश्वरा** ॥
योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा ॥
विश्व झालें वन्ही । संतमुखें व्हावें पाणी ॥
शब्दशस्त्रें झाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥
विश्व परब्रह्म दोरा । ताटी उघडा **ज्ञानेश्वरा** ॥
लडीवाळ **मुक्ताबाई** । बीज मुद्दल ठाईं ठाईं ॥
तुह्मी तरोनि विश्वतारा । ताटी उघडा **ज्ञानेश्वरा** ॥

मुक्ताबाईचे अभंग पाहिले ह्मणजे मन अगदीं थक्क होऊन जातें. एवढीशी चौदा पंधरा वर्षांची पोर, हिनें ही रचना केली कशी? ज्या वयांत पोरींचा अल्लडपणादेखील पुरा जात नाहीं, त्यांत हिला जगाचा वीट येण्यापुरतें ज्ञान प्राप्त झालें कसें व हिच्याठायीं इतकी प्रेमळ भक्ती आली कशी? याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. **निवृत्तिनाथ** आपल्या वयाच्या २६ व्या वर्षी समाधिस्थ झाले; **ज्ञानदेव** अवघे २२ व्याच वर्षी समाधिस्थ झाले; व **सोपानदेव** आणि **मुक्ताबाई** हींतर अनुक्रमें १९ व १७ या वयांतच मृत्यु पावलीं. तेव्हां या चारी भावंडांनीं

१ यांचे मृत्युशक व मित्या येणेंप्रमाणें—**निवृत्तिनाथ** ज्येष्ठ वद्य १३ शके १२१६ त्र्यंबकेश्वरी. **ज्ञानदेव** कार्तिक वद्य १३ शके १२१९ अळंदीस. **सोपा-**

आपल्या अल्प आयुष्यांत एवढालीं कृत्यें केलीं, याबद्दल कोणालाही अभिमान वाटेल. **ज्ञानदेव** व **सोपानदेव** एक महिन्याच्या अंतरानें गेले, व पुढें लौकरच **मुक्ताबाई**ही गेली. धाकटीं तिन्ही भावंडें गेल्यावर **निवृत्तिनाथां**नींही दोन महिन्यांतच देह ठेविला! या चारी भावंडांचे आपल्या भाषेवर अनंत उपकार आहेत. त्यांनीं हिचें खरें स्वरूप जगांत प्रगट केलें, व गीतार्थासारखे महान् महान् विचारदेखील तिच्यायोगें व्यक्त करितां येतात, असें स्पष्ट दाखविलें. ज्या मातेच्या पोटीं हीं असलीं चार भावंडें आलीं, ती माता खरोखरीच धन्य मानिली पाहिजे. आधींच ब्राह्मणाचें कुळ, आणि त्यांत **विठ्ठलपंता**सारखा वृत्तिवान्, प्रेमळ, हरिभक्त पिता; यामुळें हीं मुलें जात्याच चलाख निपजलीं, व त्यांच्यावर आलेल्या संकटामुळें खचून न जातां, आगींत वारंवार तावलेल्या सोन्याप्रमाणें, जास्त जास्त तेजास चढलीं. या चार भावंडांच्याच वेळीं, **पंढरपूर** येथें **नामदेव** या नांवाचा एक भगवद्भक्त राहत असे. हल्लीं **नाभिकपुराण** या नांवानें १४ अध्यायांचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. तो कोणी **भारती विश्वनाथ** या नांवाच्या कवीनें लिहिला असें त्यांत ह्मटलें आहे, व शेवटीं,

शके बाराशेंसाठांत । **बहुधान्य** संवत्सरांत ।
श्रावण शुक्ल पंचमी तीथ । ते दिनीं ग्रंथ संपविला ॥

असा ग्रंथाचा समाप्तिकाल दिला आहे; परंतु हा ग्रंथ इतका जुना खास नाहीं, असें त्यांतील अनेक प्रमाणांवरून वाटतें. **विश्वनाथ** या नांवाचा एक कवि पुष्कळ पुढें होऊन गेला; परंतु हा ग्रंथ त्याचाही असेल असें वाटत नाहीं. अगदीं आलीकडे हा ग्रंथ लिहून कोणी तरी **जुनें पुराण** ह्मणून याची प्रसिद्धि करण्याचा यत्न केला असावा.

[मागील पृष्ठावरून पुढें चालू.]

नदेव माघ वद्य १२ शके १२१५ सासवडास. **मुक्ताबाई** चैत्र वद्य १२ शके १२१६ एदलाबाद (खानदेश). हिं० ध० वि०. यापैकीं **निवृत्तिनाथ** व **सोपानदेव** यांच्या मित्या अनुक्रमें पौष वद्य ११ शके १२२० व शके १२२२ अशा, रा० रा० **जनार्दन बाळाजी मोडक** यांनीं दिल्या आहेत.

नामदेव हा **दामाशेट** या नांवाच्या शिंप्याचा मुलगा.[1] कोणी ह्मणतात तो **दामाशेटी**ला नदींत वाहत आलेला, अगर नदीचे कांठीं पडलेला सांपडला.[2] **दामाशेटी**च्या बायकोचें नांव **गोणाई**; ही सवदागीरकरांची मुलगी. हिचा **नामा** हा मुलगा खरा असला, तर त्याखेरीज **आऊ-बाई** ह्मणून एक मुलगी होती. **नामदेवा**चा जन्म व समाधिशक अनुक्रमें कार्तिक शुद्ध ११ शके ११९२, व आषाढ वद्य १३ शके १२७२ होतें.[3] **कविचरित्रांत** हे शक १२०० व १२५० असे आढळतात. **भारतीय अर्वाचीन कोश**कर्त्यांनीं, हे शक अनुक्रमें १२०० व ११६८ असे दिले आहेत; पण हे दोन्ही ग्रंथकार बरोबर नाहींत. कारण,

माझें जन्मपत्र । **बाबाजी** आपण । लिहिलें त्याची खूण । **नारु** एक ॥
अधिक ब्याण्णव । गणित अकराशेंत । उगवतां आदित्य । तेजोराशी ॥
शुक्र एकादशी । कार्तिकी रविवार । **प्रभव** संवत्सर । **शालिवाहन** शक ॥
ऐशीं वर्षें । आयुष्यपत्रिका प्रमाण । नामसंकीर्तन । **नामयाबुद्धि** ॥

हा अभंग याच्या जन्मतिथीबद्दल सबळ पुरावा आहे. खेरीज अभंगांत तो निदान ऐशीं वर्षेंपर्यंत तरी जगला असें स्पष्ट होतें. **कविचरित्र** व **अर्वाचीन कोश** यांचे शकावरून तो ऐशीं वर्षें जगला असें होत नाहीं. तेव्हां वर दिलेलेच शक खरे मानले पाहिजेत. खेरीज **लाडाई**चा

द्वादश बहात्तरीं कृष्ण त्रयोदशीं । आषाढ हे मासीं । देवद्वारीं ॥
सर्वांनीं देह । अर्पिला विठ्ठलीं । मज कां ठेविली । पापिणीसी ॥
लाडाई ह्मणे । देह अर्पिन विठ्ठला । ह्मणोनी आदरिला । प्राणायाम ॥

---

१ लाहो लागला **अंबेचा** । **विठाबाई** आनंदीचा ॥
अधिष्ठान पंढरपूर । नांदे **कन्हाई** सुंदर ॥
गोणाईनें नवस केला । देवा पुत्र देई मला ॥
देखोनिया शुद्ध भाव । पोटीं आलें **नामदेव** ॥
दामाशेटी हरुषला । दासी **जनी**स आनंद झाला ॥

२ भारतीय अर्वाचीन कोश व नवनीत.

३ नामदेवचरित्र.

हा अभंग समाधीचे मितीसंबंधीं प्रसिद्ध आहे. तेव्हां आतां संशयाचें मुळींच कारण नाहीं. **मोलस्वर्थ**कृत कोशांत, **नामदेव** हा महाराष्ट्र भाषेंतील आदिकवि होय असें ह्मटलें आहे, व हा ब्राह्मण नसतांही आद्यकवि आहे, हें लक्षांत धरण्याजोगें आहे, अशा अर्थाचा शेरा मारला आहे. यांत **मुकुंदराज** व **ज्ञानदेव** यांचे ग्रंथ व **ज्ञानदेवाचा** सन दिला आहे, तोही बरोबर आहे. मग ही एवढीच चूक कशी झाली हें कळत नाहीं. **नवनीतां**त प्रत्येक कवीच्या पद्यारंभीं लहानसा चरित्रात्मक लेख आहे. त्यांत **नामदेवा**च्या अभंगांपूर्वीं दिलेल्या लेखांत, याच्या जन्ममृत्यूसंबंधानें ' **नामदेव** कधीं जन्मला व कधीं मेला ह्याचा अद्यापि शोध लागला नाहीं. ' असें वाक्य घातलें आहे. **नवनीताची** प्रथमावृत्ति सन १८९४ त छापिली, व त्यानंतर आजपर्यंत त्याच्या पुष्कळ आवृत्ती निघाल्या ; मध्यंतरीं **नामदेवा**ची पांच सहा चरित्रें होऊन गेलीं, व कांहीं लेखही येऊन गेले ; पण **नवनीत**प्रकाशकांस त्याच्या जन्ममृत्युकाळाचा शोध अद्यापि लागला नाहीं तो नाहींच !

नामदेव हा **ज्ञानदेव** वगैरे चार भावंडांबरोबर तीर्थयात्रा करीत असे, व त्यांच्या अगदीं सेवेंत असे. हाही त्यांच्याप्रमाणेंच **विठ्ठलभक्त** होता ; व नेहमीं **पंढरीची** वारी करी. त्यानें स्वतंत्र ग्रंथरचना कांहींच केली नाहीं. त्याचे अभंग मात्र फार आहेत. ते रचण्याला त्याला प्रयास अगदींच पडत नसत. तो, सहज बोलतात त्याप्रमाणें अभंग ह्मणत जाई. हा, घरीं, दारीं, बसतां, उठतां, सर्व काळ भजन करी व तोंडानें अभंगांचा सपाटा चालूच असे. **विठ्ठला**विषयीं याची निस्सीम भक्ति व याचें सहृदय कवित्व, यांमुळें, याच्या सहवासानें कोणासही प्रेमपान्हा फुटे. याचें गणगोत बरेंच असे.

गोणाई राजाई दोघी सासूसुना । **दामा नामा** जाणा । बाप लेक ॥
नारा महादा गोंदा । **विठा** चौघे पुत्र । जन्मले पवित्र । त्याचे वंशीं ॥
लाडाई गोडाई । **येसा साखराई** । चौघी सूना पाही । **नामयाच्या** ॥
लिंबाई ती लेकी । **आउबाई** बहीण । दासी वेडी **जनि** । **नामयाची** ॥

ही सर्व मंडळी, **विठ्ठलाची** भक्ती करून वारी करीत. **ज्ञानेश्वराच्या** भक्तीच्या मशालीचा उजेड, जसा **नामदेवावर** तसाच या सर्वां वरही पडलेला दिसतो. या सर्वांना कवित्वशक्ति चांगली होती. **जनाबाई** हीं यांची कोणी नाहीं. ही **नामदेवाला** सांपडलेली एक मुलगी. हिचें पालनपोषण त्यानें चांगलें केलें, व तीहि पुढें भक्तिमार्गात शिरली, आणि अभंग करूं लागली. सत्संगतीचा परिणामच असा विलक्षण आहे. कदाचित् **मुक्ताबाई**पासून हिला हें ज्ञान झालें असेल. कारण, हें अगदीं संभवनीय आहे. जसे मुक्ताबाईचे तसेच जनाबाईचेही अभंग फार प्रेमळ आहेत. **गोणाई** ही वारी करी; पण ती संसार संभाळून असे. **दामाशेट विठ्ठलाचे** चरणीं वाहिलेले. एक मुलगा **नाम्या** तोही तसाच निघाला. हें पाहून **गोणाई**ला वाईट वाटे, ती,

नाम्या सोडी देवपिसें । बळे घर कैसें । बुडविसी ॥
जनाचीं लेकुरें । वर्ततातीं कैशीं ॥ तूं मज झालासी । कुलदिपु ॥
याची भक्ती कैशी । लौकिका वेगळी । संसाराची होळी । केली यानें ॥
नाम्या हे रे नव्हे भलें । घर त्वां बुडविलें । कुळासहित ॥

असा त्याला उपदेश करी. **नाम्या**ची बायको **राजाई** हींदेखील **विठ्ठल**-भक्ति करी, व अभंग रची. पण नवऱ्यानें सारा वेळ टाळ कुटीत बसावें व संसारधंदा काडीमात्र पाहूं नये हें तिला आवडत नसे. सारा वेळ घरीं इतर वारकरी येऊन भजन करीत, हेंही तिला खपेना; तिला याचें वाईट वाटे, पण ती घरची सासुरवासीण, यामुळें तिला बोलतां येत नसे. तरी **विठोबारखमाई** यांचे पायीं तिचाही भाव दृढ असे. ती त्यांस आपले आईबाप समजे. शेवटीं तिनें

' अहो **रखुमाबाई** । **विठोबासी** सांगा ॥
भ्रतारासीं कां गा । वेडें केलें ॥
वस्त्र पात्र नाहीं । खाया जेवायासी ॥
नाचे अहर्निशीं । निर्लज्जसा ॥
मंत्र घेतलासे जैसा ॥ घरीं संतांचा बोळसा ॥
वोस पडो या हरीदासा ॥ गेले न येती । मागुती ॥

एकमेकांच्या पडती पायां । लौकिकांतून गेले वायां ॥
अवघे भांबरभुते होती । नाचताती । आनंदें ॥

असें आपलें गाऱ्हाणें **रखमाईच्या** पायापाशीं सांगितलें. **गोंदोबा** वगैरे **नाम्याचीं** चारी मुलें, व त्या चौघांच्याही बायका भजन करून अभंग करीत. हें एवढें सगळें कुटुंबच्याकुटुंब भगवद्भक्तांचें आणि त्यापैकीं प्रत्येकजण नेहमीं भजन व अभंग करी. **नामदेवानें**

करीन मी तूझे । शतकोटी अभंग ॥

अशी ईश्वरापाशीं प्रतिज्ञा केली होती, व

जरी न होती पूर्ण । जिव्हा उतरून ठेवीन मी ॥

अशी शपथ वाहिली होती. यामुळें तो आपला वेळ क्षणभरदेखील वायां दवडींत नसे. कोणापाशीं कांहीं मागणें झालें तरी अभंगच; कांहीं सांगणें झालें तरी अभंगच. सहज बोलावें तरी ज्याच्या तोंडांत अभंग यावे, त्याची ग्रंथरचना केवढी मोठी असेल, याची कल्पनाही होणार नाहीं. त्याचें घर व घराचे वासेदेखील अभंग ह्मणूं लागले असतील. या **विठ्ठलभक्त** कुटुंबानें कसे कसे व किती अभंग रचिले याविषयीं :—

पिता **दामाशेटी** । अभंग दोन कोटी ।
भक्तिभावें ताटीं । निवेदी **देवा** ॥
तीन कोटी अभंग । **गोणाईचा** वाद ।
स्वात्मसुख बोध । सुखाचा तो ॥
तीन कोटी अभंग । **नारोबाची** कविता ।
उगवि स्वात्महिता । दिवस रजनी ॥
तीन कोटी अभंग । **विठाचा** झगडा ।
प्रेमरस गोडा । प्रेमाचा तो ॥
महादा आणि **गोंदा** । अडीच अडीच कोटी ।
प्रेमरस पोटीं । प्रेमळ तो ॥
एक कोटी अभंग । लक्षवरती साळा ।

प्रेमरस जिव्हाळा । **आऊबाईचा** ॥
चौऱ्याण्णव लक्ष । **रंगाईची** करुणा ।
प्रेमें **नारायणा** । आळविलें ॥
दोन कोटी अभंग । **राजाईची** वाणी ।
प्रेमें **चक्रपाणि** । आळवीलें ॥
लाडाई गोडाई । **येसा साखराई** ।
कवित्व हें पाही । दीड दीड कोटी ॥
एक कोटी **देव** । पन्नास लक्ष **रुक्मिणी** ।
कोटी दासी **जनी** । साडे बारा ॥
एकुणहत्तर लक्ष । चौपन्न कोटी ।
कविता गोमटी । **नामयाची** ॥

असें **तुकाराम** स्वामींनीं लिहून ठेविलें आहे. यावरून या कुटुंबानें केलेली ग्रंथरचना फारच अवाढव्य होती असें दिसतें. चारी भावंडांचे कांहीं दिवस मागून, परंतु **नामदेवाचे** वेळीं आणखी बरीच संतमंडळी झाली. **परळी वैजनाथचा** ब्राह्मण **नागा जगमित्र** व **सांवत्या-माळी**[1] हे त्याच वेळचे. **परिसा भागवत** व **गोरा कुंभार** हेही **नाम्याचेच** समकालीन असून, एके ठिकाणीं नाचत. या सर्वांनीं अभंग रचिले आहेत. **परिसा भागवत** हा ज्याला त्याला 'भागवत परिसा' असें ह्मणे; ह्मणून त्याला हें नांव पडलें[2] असें ह्मणतात. परंतु यापेक्षां त्याचें आडनांवच **भागवत** असावें; व **नामदेवानें** त्याचा **परिस**,

विरक्त ह्मणविसी आपणास । आणि परिसाचा केला अभिलाष ॥

असें ह्मणून

चंद्रभागेचे डोहीं । टाकुनी दिला लवलाहीं[3] ॥

---

१ बारा दिवसांचा । हा भक्तवत्सरा । माये सांडियेला । वेणूनदी ॥
ह्मणवितो माझा त्या दिवसापासोनी । नेणे मजवांचूनी । आणिक कांहीं ॥
असें याजबद्दल **नामदेवानें** ह्मटलें आहे.

२ सन्नामगर्भ रामायण टीपा. ३ भक्तविजय अ० १७.

यासाठीं त्याला नंतर सर्व संत '**परिसा भागवत**' ह्मणूं लागले असावे, हें जास्त सयुक्तिक दिसतें. या दोघांचेहि अभंग प्रसिद्ध आहेत. याखेरीज **मुक्ताबाईचा** गुरु **विसोबा खेचर** व **जोगा परमानंद** हेही याच वेळचे. त्याप्रमाणेंच **कूर्मदास** व **नरहरी-सोनार** हेही या मंडळीच्या वेळचेच असावेत. ही सर्व संत मंडळी अभंग करी. हे कडकडीत वैष्णव नेहमीं पंढरीची वारी करीत, व सारा वेळ भजनांत घालवीत. यांच्यामध्यें लोभमत्सरा-दिकांचा विटाळही नसे. हे एकमेकांच्या पायां पडत व एकाच ठिकाणीं **पंढरीनाथाचें** भजन करीत. या सर्वांमध्यें **ज्ञानेश्वर महाराज** श्रेष्ठ असून, त्यानींच या पंथाचा पाया घातला असें ह्मटलें पाहिजे. मराठी ग्रंथांत जसा त्यांच्या ग्रंथास जास्त मान, तसाच सर्व पंथांत त्यानीं घालून दिलेल्या या पंथास जास्त मान दिला पाहिजे. या पंथांत उच्चनीच हा फरक मुळींच नाहीं. जातीनें कितीही निकृष्ट असला, तरी उत्कृष्टपणा आणणारा भक्तिरूप **चिंतामणि** मराठी मंडळांत सर्वांच्या हातीं लागावा, हा **ज्ञानेश्वरी** अवताराचा मोठा हेतु होता. व हा मोठा हेतु सहज सिद्ध होईल, अशीच व्यवस्था **ज्ञानेश्वरांनीं** आरंभापासून चालविली. चौफेर संतांची मंडळी माळेसारखी बसून, मेरूचे स्थानीं **निवृत्ति-नाथ** असत. आणि चौफेर पसरत गेलेल्या वर्तुळाच्या मध्यभागीं **निवृत्तिनाथाकडे** तोंड केलेले **ज्ञानेश्वर** बसून, **भागवती** धर्माचा जीर्णोद्धार मराठी भाषेंत करीत; व संत मंडळी फिरती असल्यामुळें, जिकडे जिकडे संत जात तिकडे तिकडे **ज्ञानेश्वरांनीं** पाजळलेली मशाल नेत. या मशालीची ज्योत जी एकदां **ज्ञानदेवांनीं** पाजळली, ती पुन्हां कधीं विझालीच नाहीं. आपणा प्रत्येकाच्या अंतःकरणांमध्यें भक्तीची मशाल ही आहेच. पण ती पाजळण्याइतकें तेज कोणांमध्यें नसतें. यामुळें ज्ञानेश्वरांसारख्या भगवद्भक्तांच्या समागमानें ती पाजळावी लागते. व एकदां पाजळूं लागली ह्मणजे ती कधीं विझत नाहीं.

---

१ महाराष्ट्रधर्म.

यामुळेंच ज्ञानदेवाचे पाठोपाठ एकदम इतके भगवद्भक्त व ग्रंथकार झाले. व या सगळ्यांच्या मशालीचा उजेड सर्व महाराष्ट्रास प्रफुल्लित करूं लागला. ब्राह्मणापासून तों अतिशूद्रापर्यंत सर्वांत भक्तिरसाचा ओघ सारखा वाहूं लागला. ब्राह्मणांत जसे **ज्ञानदेव, सोपानदेव** झाले, किंवा शूद्रांत **नामदेव, गोराकुंभार** हे झाले, तसेंच अतिशूद्रांतही चोख्यामेळ्यासारखे **विष्णुदास** नांवास आले. जसे **ज्ञानदेवाचें** व **नामदेवाचें** तसेंच **चोख्याचेंही** सर्व कुटुंब भजन करी, आणि अभंग ह्मणे. **चोख्या** आणि **चोख्याची** बायको या दोघांचीही रचना रसाळ होती.

टाळी वाजवावी । गुडी उभारावी ॥
वाटही चालावी । **पंढरीची** ॥
पंढरीच्या हाट । कवलाची पेठ ॥
मिळाले चतुष्ट । वारकरी ॥
पताकांचे भार । मिळाले अपार ॥
गर्जे **भीमातीर** । जयजयकार ॥
खटनट यावे । शुद्ध होवोनीयां जावे ॥
दंवडी पीटी भावें । **चोख्या** मेळा ॥

हा **चोख्याचा,** आणि

पुढें ठेविलें पान । नाहीं कुटुंबीं भोजन ॥
तुह्मां योग्य नाहीं देवा । गोड करोनीया घेवा ॥
द्रौपदीच्या पाना । भूललेती **नारायणा** ॥
येथ नाहीं ऐसी परी । बोले **चोखयाची** नारी ॥

हा **चोख्याच्या** बायकोचा. हे दोन्ही अभंग **नामदेवाच्या** आणि **मुक्ताबाईच्या** तोंडीं घातले, तरीदेखील सहज शोभतील असे आहेत. या **विठ्ठलभक्तीचा** महिमाच असा दिसतो कीं, तिच्या योगानें जाति-जातिमधील अंतर सहज नाहींसें होतें, व सर्व भक्तांना मग ते कोणत्याही जातीचे असोत, सारखेच प्रेमपाझर फुटूं लागतात. **ज्ञानदेवाचे** ग्रंथ **सच्चिदानंद** बावा[1] व **कूर्मदासाचे** अभंग **सुदेव** हे

१ ज्ञानेश्वरी.

लिहीत. **विसोबा खेचर** अळंदीकर ब्राह्मण हा **जोगापरमानंदाचे** अभंग लिहून ठेवी. तसेंच **चोख्यामेळा** अतिशूद्र, पण त्याचे अभंग लिहिण्याचें काम, **अनंतभट्ट** हा फार प्रेमानें व आवडीनें करी. यासाठीं या काळच्या ग्रंथसंपत्तीबद्दल, जसे या **विष्णुदासांचे** तसेच त्यांच्या लेखकांचेही आपणांवर फार उपकार आहेत.

या मंडळीच्या नंतर **उद्धवचित्घन** स्वामी झाले असें त्यांच्या ठिकठिकाणीं दिलेल्या शकावरून होतें. या **उद्धवचित्घनां**संबधानें बराच घोंटाळा आहे. ह्मणून यांची माहिती कोठें कशी दिलेली आढळली, तें सांगून नंतर त्या संबंधानें विचार करूं. आपण कोणत्या कोणत्या संतांचीं चरित्रें लिहिलीं हें सांगतांना **महिपति** बावानीं, **भक्तविजय** ग्रंथांत,

> **उद्धवचित्घन** भक्त थोर । ज्यानें संतचरित्रें वर्णिलीं फार ॥

असा उल्लेख **भक्तलीलामृत** ग्रंथाचे एकावनाव्या अध्यायांत केला आहे. **भक्तविजय** ग्रंथांत आरंभींच

> **मान** देशीं **उद्धवचित्घन** । त्यानीं भक्तचारित्रें वार्णिलीं जाण ।
> दोहींचें संपत एक करून । **भक्तविजय** आरंभिला ॥

असें ह्मटलें आहे. व **भक्तविजय** ग्रंथांत अगदीं शेवटीं शेवटीं **उद्धवचित्घनाचें** चारित्र दिलें आहे. यांत 'रामनवमीचे दिवशीं कीर्तन करीत एका मशीदीवरून जात असतां, **उद्धवचित्घनाला** मुसलमानानीं शेणमार केली. यामुळें तो हिरमुसला होऊन आपला उत्सव त्यानें बंद ठेवला. हें **मारुतीला** कळल्यावर **मारुतीनें** वानररूपानें त्या मशीदीवर जाऊन मशीदीचा विध्वंस केला आणि यवनांस ठार मारिलें,' अशी कथा सांगितली आहे. कविचरित्रांतही **उद्धवचित्घनाचें** एक चारित्र दिलें आहे. त्यांत, तो **मान** देशांत सुमारें शके १२५० मध्यें राहत असे असें सांगितलें आहे, व पुढें वर सांगितलेल्या **भक्तविजयांतल्या** गोष्टींचा सारांश दिला आहे. आणि शेवटीं, 'यानें **भक्तचरित, गोऱ्याकुंभाराचें** चरित्र व **द्रौपदीचा** धांवा, हे लहान ग्रंथ केले आहेत' असें ह्मटलें

आहे. हें चरित्र कविचरित्रांत **जनाबाई** आणि **गोराकुंभार** यांचेनंतर लगलेंच घातलें आहे. ' काव्येतिहाससंग्रह ' या ग्रंथांत ' अनेक कविकृत कविता ' ह्या प्रकरणांत पहिल्या भागांत ' **उद्धवचित्‌घन**कृत भगवद्गीता ' अठरा अध्याय सवाईबद्ध रचलेली दिली आहे. दुसऱ्या भागांत साकीबद्ध **नागनाथ** चरित्र व ' **मृत्युंजय** चरित्र ' आणि दिंडी वृत्तांत रचलेला ' **शुकरंभासंवाद** ' दिला आहे, व तिसऱ्या भागांत **श्रियाळ**चरित्रावरील दिंड्या आहेत.

मराठीभाषेंत अनेक वृत्तात्मक काव्यें रचण्याचा प्रघात **वामनानें** प्रथमत: सुरू केला असें **निबंधमाला**कर्त्यांनीं लिहिलें होतें. त्यासंबंधानें त्याच मासिकपुस्तकांत पुढें **वामन दाजी ओक** यांनीं एक लांबलचक पत्रव्यवहार केला आहे, व त्यांत मराठींत निरनिराळीं वृत्तें सुरू करण्याचें श्रेय **वामनास** न देतां, तें **बिडकर** कविस देणें जास्त योग्य आहे असें ह्मटलें आहे. त्यानंतर **निबंधचंद्रिकेंत उद्धवचित्‌घनानें** प्रथम ' अक्षरगणकात्मक वृत्तें ' मराठींत आणलेलीं दिसतात, असें लिहिलें आहे. **भारतीय अर्वाचीन** कोशांतही या ग्रंथकर्त्याचें एक चरित्र दिलें आहे; पण तें निव्वळ कविचरित्रांतून उतरून घेतलें आहे. याखेरीज कित्येक ठिकाणीं टीपांत व पत्रव्यवहारांत **उद्धवचित्‌घना**चा उल्लेख आढळतो; पण त्यांतही वरील माहितीच दिली आहे.

आतां वरील माहितींत कोठें तरी चूक आहे असें वाटतें. कारण, **उद्धवचित्‌घन** हा खरोखरीच १२५०त होता असें धरलें तर, या पुढील झालेल्या संतांचें वर्णन त्यानें केलें नसतें. **महिपतीच्या** ग्रंथावरून त्यानें पुष्कळ पुढल्या काळांतल्या संतांचीं चरित्रें लिहिलीं असावींत असें दिसतें. त्यासंबंधानें कविचरित्रांत जें चरित्र दिलें आहे ह्मणून वर ह्मटलें आहे, त्या चरित्रास जी मूळ गोष्ट घडणें अवश्य दिसतें, ती या सुमारास संभवत नाहीं. कारण, अजून मुसलमानांचा

---

१ निबंधमाला.

अम्मल बसला नव्हता व ‘ फकीर ’ आणि ‘ मशिदी ’ इकडे झाल्या नव्हत्या. तिसरी गोष्ट : **महिपतीनें** आपल्या ग्रंथांत संतांची कालानुक्रमानेंच बरोबर चरित्रें लिहिलीं नाहींत हें खरें आहे. तरी त्यानें ग्रंथांत **तुकारामानंतर ज्ञानदेव** असा अगदींच घोंटाळा केला नाहीं, व **उद्धवचिद्घनाचें** चरित्र अगदीं शेवटीं शेवटीं घातलें आहे. **भक्तविजयांतल्या** हजारों चरित्रांत याच्या नंतर फक्त काय तें एक **विसोबा** सराफाचेंच चरित्र आहे. यावरून हा **महिपतीचा** समकालीन किंवा त्याच्या एक दोन वर्षें अगोदरचा असावा असें दिसतें. १२९०त या नांवाचा ग्रंथकार कोणी झालेला दिसत नाहीं व ही कविचरित्राची माहिती जरा चुकीची दिसते. मात्र हें खरें असेल तर, या चुकीनें **हेमाद्रीच्या** लेखनपद्धतीप्रमाणेंच बरेच जणांस घोंटाळ्यांत पाडलेलें दिसतें. तरी **उद्धवचिद्घन** या नांवाचा कोणी ग्रंथकारच झाला नाहीं असें नाहीं. हा पुष्कळ पुढें झाला असावा, व याचा संत-वर्णनात्मक एखादा चांगलासा ग्रंथही असेल असें **महिपतीच्या** उल्लेखावरून खास दिसतें. हल्लीं **उद्धवचिद्घनकृत** प्रसिद्ध असलेल्या प्रकरणांत ‘ **मृत्युंजयचरित्र** ’ ह्मणून एक प्रसिद्ध आहे. शिवाय यानें ‘ शाहामहंमद तो बामणीकरा बेदरची पाछाई ’ असें ह्मटलें आहे. यावरून **उद्धवचिद्घन** हा **मृत्युंजय** स्वामींचे नंतर सोळावे शतकाचे शेवटीं झाला असावा.

या सुमारास हिंदुस्थानावर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊन त्यांचा अंमल बसूं लागला, व **देवगिरीकरांच्या** गादीलाही उतरती कळा लागली. जोंपर्यंत **देवगिरीकारांची** गादी दणदणत होती, तोंपर्यंत **भागवती** धर्म आणि मराठी भाषा यांचीही वाढ फार झपाट्यानें चालू होती; पण पुढें **देवगिरीकरांच्या** राज्याबरोबरच भाषेची स्थितिही वाईट होत चालली. मुसलमानी अंमल इकडे सुरू झाल्यानंतर थोड्याच दिवसांत लोकांवर जुलूम होऊं लागला असें दिसतें, व शिवाय ते अगदींच परधर्मी पडल्यामुळें, त्यांच्यापासून या भाषेचें हित न होतां, अहितच होऊं लागलें. जिकडे जातील तिकडे आपली भाषा, आपला

धर्म व आपला रीतिरिवाज ही जबरीनें सुरू करण्याची मुसलमानांची पद्धतच दिसते. इतकेंच नव्हे; पण आपल्या गोष्टी सुरू करण्यासाठीं दुसऱ्याचा ते नासही फार करीत. ते जिकडे गेले तिकडे त्यांनीं दांडगाईच केलेली दिसते. केवळ लीलेसाठीं ह्मणून पृथ्वीवरील हजारों ग्रंथांचा आजपर्यंत त्यांनीं सहज नास केला असेल. नुसतें जानवें पाहिलें कीं, शरीर उभें दुभंगावें; देवालय मग तें कसेंही व केवढेंही असो, जाळून पाडून फस्त करावें व त्या ठिकाणीं श्वेतवर्णाची मशीद उभी करावी; ही ज्यांची रीत, आणि परधर्मी लोकांना हाल हाल करून त्रास द्यावा, व गांवच्यागांव बायकापोरांसुद्धां बाटवून टाकावे, हा ज्यांचा धर्म, अशा एका हातांत **कुराण** आणि एका हातांत समशेर घेऊन सर्व देश अविंधमय करूं पाहणाऱ्या या क्रूर लोकांपुढें, आमची संतमंडळी बरीच मावळली असें दिसतें. गादी मुसलमानी झाल्यामुळें, सरकार दरबारांत **मराठीचे** ऐवजीं **फारशी** भाषा सुरू झाली, व सरकार कामासंबंधाचे सर्व कागदपत्र **फारशींत** राहूं लागले. मुसलमानांबरोबर त्यांच्या देशांशीं इकडला संबंधही जास्त वाढला व व्यापार-उदीम देखील मुसलमान सौदागीरांच्या मार्फत होऊं लागला. सुमारें पांच पन्नास वर्षांत चोहींकडे **घटोत्कचाच्या** बाजाराची स्थिति झाली. जुनें होते तें सर्व गेलें, व त्याची जागा नव्यानें घेतली. आमच्या गृह-संसारांत नवे पदार्थ शिरून बसले. हिंगासारख्या पदार्थांनीं तर अगदीं चुलीपर्यंत मजल मारली. नव्या चिजा, नव्या वस्तू, नवे नवे खाण्याचे जिन्नस, नवे नवे पोषाख आह्मीं मुसलमानापासून उचलले. उचलले ह्मणण्यापेक्षां परिचयामुळें ते आमच्यावर लादले गेले असेंच दिसतें. ज्या वस्तूच आमच्या नव्हत, त्यांना शब्द तरी आमचे कोठून राहणार? तेही यवनांचेच आले. सरकारदरबारांत **फारशी** भाषा व **फारशी** पद्धत पडल्यामुळें, ‘ अर्जदारां ’च्या ‘ फिर्यादी ’ ‘ पाद-शहा ’पुढें जाऊन त्यांचा ‘ फैसला ’ किंवा ‘ इनसाफ ’ होऊं लागला. गडकऱ्यांचे ‘ नाईक ’, ‘ पाईक ’ ‘ पाटील ’ यांच्याऐवजीं किल्लेदार आपल्या ‘ हवालदार ’ ‘ शिलेदार ’ ‘ जमादारां ’ सह ‘ दरोबस्त ’ ‘ फौजेचा ’ अंमल करूं लागले. जे सुखवस्तु लोक होते व ज्यांचा

राजकीय बाबींशीं संबंध नव्हता, त्यांचे येथें देखील ' मेजवान्या ' व ' आतषबाजी ' होऊं लागली ; आणि किनखाबी ' रुमाल ' ' गुलाबी अत्तर ' ' मेवामिठाई ' त्यांस लागूं लागली. आमचीं ' आगरें ' होतीं त्या बागा झाल्या. हातचीं ' संबळ ' ' पांवा ' ' टिमकी ' वगैरे देशी वाद्यें जाऊन, त्यांच्या ऐवजीं ' ताऊस ' ' ढोल ' ' ताशे ' ' मर्फे ' हे आले. आह्मी ' समुद्राला ' ' दर्या ' व ' होड्यां ' ना ' तराफे ' ह्मणूं लागलों. एकंदर सर्वच मनु पालटला. व कांहीं वर्षें तर ' महाराष्ट्रधर्म ' ' महाराष्ट्रराज्य ' व ' महाराष्ट्रभाषा 'ही त्रयीच्यात्रयी रसातळाला जाऊन मिळण्याची वेळ आली. या शें दोनशें वर्षांत एकही ग्रंथकार किंवा साधुसंत नांवाजण्यासारखा झाला नाहीं. नुसता टाळांचा आवाज काढला, तर हात जावयाची पाळी; मग भजनाचा गजर करून, **पंढरीनाथा**चा जयघोष करणार कोण? अशी स्थिति आली. परंतु ही पहिली वावटळ ज्या वेगानें आली, तोच वेग पुढें टिकला नाहीं. वारा पडूं लागला व हवेंतही बदल होण्यास सुरुवात झाली. किंबहुना स्वराज्याचा पाया खंबीर करण्यासाठीं, प्रत्येक हिंदूस यवन करण्याचें मुसलमानांचें वेडच आपल्या उत्कर्षास कारण झालें, असें एका दृष्टीनें ह्मणावें लागतें.

आदिलशाहीची गादी स्थापणारा मुळचा खरा खरा अस्सल तुर्क; परंतु त्याचें मन इकडील सरदाराच्या एका खुपसुरत मुलींवर बसलें व त्यानें तिला बाटवून आपली राणी केली व पुढें त्याला तिजपासून एक मुलगाही झाला. मुलगी बाटली ह्मणून तिची आपल्या गणगोतावरील प्रीति जाते कीं काय? तिचा सर्व ओढा इकडेच वाहूं लागला. तिच्या मुलाच्याहि अंगांत तिचेंच ' मराठ्याचें ' रक्त वाहत होतें. त्याच्या कारकीर्दीत मराठ्यांचा छळ होण्याचें साहजीकच कमी झालें, व पुढें त्याचाही मुलगा गादीवर बसला, तेव्हां तर सर्वच दिशा बदलूं लागली. त्याच्या आजीच्या ह्मणजे त्या बाटवलेल्या मुलीच्या हातांत सर्व सत्ता आली, आणि दप्तरची भाषा पुन्हां मराठी झाली.

आणि जुन्याजुन्या मराठी चालींना पुन्हां थारा मिळूं लागला. असेंच निजामशाहींतही झालें. **निजामशाही**चा मूळ पुरुष **निजामुल्मुलुख** हा मुळचा मराठा ब्राह्मण; पण याला बेदरकरांनीं कैद करून बाटविलें व पुढें याचा नातू जेव्हां **निजामशाही**च्या गादीवर आला, तेव्हां याचे पूर्वींच्या घरचे सगेसोयरे, त्याजजवळ जाऊन, आपल्या वतनी मानांचें प्रकरणांत **बरीद्शहा**विरुद्ध त्याची मदत मागूं लागले. अंगांत कसें झालें तरी मुळचें मराठ्याचें रक्त सळसळत होतेंच त्यानें लागलीच आपल्या सोयऱ्यांस, मदत केली. व मुलमानांनीं बळकावलेला हिंदूचा गांव हिंदूस परत देवविला. अशी हळूहळू पालट होण्यास सुरुवात झाली; परंतु मुसलमानी राज्य आपणावर थोडे थोडके दिवस असतें, तर गोष्ट निराळी. ही साडेसाती एक सारखी जवळ जवळ दोनशें किंवा अडीचशें वर्षें आपणा मराठ्यांच्या पाठीस लागली होती. हिच्या फेऱ्यांत आपण सर्वस्व विसरलों. भाषा बहुतेक पालटली असें म्हणण्यास हरकत नाहीं. पंढरीचे वारकरी, कुडबुडे जोशी,किंवा कुणबीमाळ्यासारखे अगदीं अशिक्षित लोक व घरांतील बायका, यांखेरीज इतर ठिकाणीं मराठी शब्द फारसे ऐकूं येत असतील असें वाटत नाहीं. लिपी तर बहुतेक **फारशीच** झाली. सरकारी कागदपत्र तर राहोतच, पण खाजगत पत्रव्यवहार देखील हल्लींच्या इंग्रजीसारखा अविधांच्या भाषेंत होऊं लागला. कोठें कोठें लिहिण्याची लिपी मात्र **देवनगरी** किंवा **मोडी** राहिली; पण भाषा मात्र सगळी **फारशी** असे. याच्या उलट प्रकारही कांहीं प्रांतांत घडून आला[1]. जेथें लिपीच बदलली, तेथें इलाज नाहीं; पण आपल्या इकडे तसें कांहीं झालें नाहीं. **संस्कृत** वगैरे धर्मसंबंधी ग्रंथ मात्र जे राहिले, ते अगदीं सोंवळे राहिले. त्यांच्या लिपींत कांहीं एक बदल झाला नाहीं. आपल्या **देवनगरींत** देखील ‘ उकार ’ ‘ ऱकार ’ वगैरे ‘ डावरे ’ प्रकार याच वेळीं शिरले असावे असें ‘ वाव ’ ‘ रे ’ वगैरे **फारशी** अक्षरांवरून दिसतें. हे लिहिण्याची आपली यापूर्वीची पद्धति निराळी होती.

---

१ गोडबोलेकृत व्याकरण.

आतां आपल्या स्वदेशाभिमानी पूर्वजांत 'देशी' सर्व जाऊन त्याच्या जागीं 'यवनी' थाट कसा जमला, याचें कोणाला आश्चर्य वाटेल; परंतु तें अगदीं साहजिकच झालें असें दिसतें. हिंदुस्थानासारख्या जलमय प्रदेशांत, **लंडन**च्या **टेम्स** नदींत धुतलेली बंडी घालणाऱ्या व मीठदेखील विलायतेहून आणून खाणाऱ्या साहेब लोकांवर देखील, **सॅक्सन** लोकांचे ऐवजीं **नॉर्मन**लोक आले, तेव्हां असाच परिणाम झाला. राजसत्ता परकीयांच्या हातांत गेली ह्मणजे पूर्वीच्या लोकांच्या स्थितीवर त्यांची सांवली ही पडावयाचीच. मराठ्यांनीं **गुजराथ** जिंकली; यामुळें, गुजराथ्यांतही मराठ्यांच्या अनेक गोष्टी शिरल्या. दक्षिणी पागोटें घालणारे गुजराथेंत पुष्कळ नजरेस पडतात; पण गुजराथी पगडी कोणी दक्षिणी घालत नाहीं. मराठ्यांसारख्या मायावंत आणि इंग्रजांसारख्या सहिष्णु राज्यांतदेखील असा फरक पडतो; मग परकीयांस बाटवून आपला धर्म, आपली भाषा व आपला रिवाज या त्रयीचा प्रसार करण्याचा ज्यांनीं विडाच उचलला होता, त्यांच्या राज्यांत मराठ्यांचें स्वरूप पालटत चाललें यांत नवल काय? आतां या सगळ्या घडामोडींत आपला अगदींच फायदा झाला नाहीं, असें मात्र कोणी समजूं नये. मराठी भाषेंत दांडग्या हिंदुस्थानी व अरबी भाषेची मिसळ झाली, व या मिश्रणापासून पुढें जी भाषा तयार झाली, ती पहिलीपेक्षां जोरदार झाली. 'समशेर', 'मगदूर' यांसारखे उग्र शब्द नेहमींच्या प्रचारांतही बरेच येऊं लागले. हा प्रकार असाच आणखी पुढेंही चालू राहता, तर कदाचित हळूहळू आपली लिपीही बदलली असती; परंतु मराठ्यांच्या रक्तानें यावेळीं पुन्हां उचल घेतली, आणि देशांत सर्व प्रकारांनीं चळवळ दिसूं लागली. शके १४७० मध्यें **एकनाथस्वामी** जन्मास आले. यांचा जन्म हाच आपल्या भाषेचा पुनर्जन्म, असें पर्यायानें ह्मणण्यास हरकत नाहीं. यांच्या बापाचें नांव **सूर्यनारायण** व आईचें नांव **रुक्मिणी**बाई. **सूर्यनारायण** हा **पैठणां**त चांगला विद्वान् व परमेश्वरभक्तिपरायण असा ब्राह्मण होता. परंतु हा **एकनाथा**च्या जन्मानंतर लवकरच वारला.

यामुळें **एकनाथाचें** पालनपोषण व विद्याभ्यास त्याच्या आजापाशीं झाला. **एकनाथानें** परमार्थसाधनासाठीं **जनार्दनस्वामी**पासून अनुग्रह घेतला होता. **जनार्दनस्वामींच्या** एकंदर शिष्यमंडळांत भाषेचे कैवारी असे बरेच निपजले असें दिसतें. **जनार्दनस्वामींनीं अमृतानुभव, ज्ञानेश्वरी** वगैरे ग्रंथ आपल्या शिष्यांस शिकविले असें एकनाथचरित्रांत लिहिलें आहे.[1] **जनार्दनस्वामी**सारख्या व्युत्पन्न ब्राह्मणापाशीं **ज्ञानेश्वर** महाराजांच्या ग्रंथांचें पठण झाल्यामुळें **एकनाथाचें** महाराजांच्या कृतीवर जें एकदां मन बसलें, तें तेथेंच उत्तरोत्तर स्थिर होत गेलें असावें असें दिसतें. कारण, पुढें लौकरच ह्मणजे शके १५०६-मध्यें[2] **ज्ञानेश्वरीच्या** प्रती जमा करून त्यांवरून एक **ज्ञानेश्वरीची** शुद्ध प्रत यानें तयार केली. किंबहुना हल्लीं आपणांस **ज्ञानेश्वर** महाराजांच्या उत्तम ग्रंथाचा जो आस्वाद घेतां येतो, त्याबद्दल सर्व श्रेय **एकनाथांसच** दिलें पाहिजे. **एकनाथानें** आपल्या गुरूपाशीं विद्याभ्यास पूर्ण करून बहुतेक सर्व तीर्थयात्रा केल्या होत्या. यानंतर त्यानीं वृद्ध आजाच्या घरीं राहून, पुन्हा गृहस्थाश्रम पतकरला. गृहस्थाश्रमांत असतांना, हा नेहमीं भजन करी व लोकांस पुराण सांगत असे. आपला बहुतेक काळ तो ग्रंथावलोकनांतच घालवी. यानें ग्रंथरचनाही पुष्कळ केली आहे. याच्या ग्रंथापैकीं **भावार्थरामायण** व **एकनाथी भागवत** हे ग्रंथ सर्वमान्य असून फार मोठे आहेत. **भावार्थरामायण** हा **एकनाथानें** अगदीं शेवटीं रचिला असें सांगतात. याची ओंवीसंख्या जवळ जवळ चाळीस हजार आहे. हा ग्रंथ युद्धकांडात ४४ अध्यायपर्यंत रचून झाल्यावर, **एकनाथाची** प्रकृति फार क्षीण झाली. व पुढें आपण आतां फार दिवस जगणार नाहीं असें त्यांस वाटलें. यामुळें ग्रंथरचनेचा पुढील भार त्यानें आपला पट्टशिष्य **गवाबा** याजवर टाकला. **गवाबा** हाही चांगला विद्वान् ब्राह्मण होता. व यानें पुढें केलेली उभारणी नाथाच्या मूळ पायास चांगली शोभण्यासारखी आहे. याबद्दल कै० **परशरामपंतांनीं**

---

१ सहस्रबुद्धेकृत एकनाथचरित्र. २ १५१२ शि० म० च०.

जरी पात्र पालटलें । तरी न्यूनत्व नाहीं आलें ।
स्वर्णपात्रीं कीं पर्णपुटीं । अमृतस्वादा भेद न पडे ॥

असें आपलें मत लिहून ठेविलें आहे. **एकनाथी भागवत** हा ग्रंथ **एकनाथानें** शके १४९९ त काशीस असतांना लिहिला; ह्मणजे या वेळीं **एकनाथाचें** वय अवघें पंचवीस वर्षांचें होतें असें दिसतें. या अल्पवयांतही ग्रंथरचना केली असून ती फारच चांगली साधली आहे. ही मूळ **भागवत**च्या ११ व्या स्कंधावरील टीका होय. तींत जवळजवळ वीस हजार ओंव्या आहेत. या ग्रंथाची ख्याति **एकनाथाच्या** वेळींच चांगली झाली होती. व त्याच्या पश्चात्‌ही या ग्रंथाच्याठायीं, महाराष्ट्रांतील सर्व विद्वान् मंडळाची प्रीति अजूनपर्यंत अव्याहत तशीच स्थिर आहे. **तुकारामानें** **भांडारासारख्या** उंच पर्वतावरील गुहेंत बसून, या ग्रंथाची कैक पारायणेंच्या पारायणें केलीं, व त्वरित ग्रंथरचनेची अद्भुत शक्तीही त्याजमध्यें येण्यास हाच ग्रंथ कारणीभूत झाला. **मोरोपं**-तांनींही आपल्या ग्रंथांत याबद्दल

ग्रंथ श्रीभागवत, श्रीरामायण, करी सुविस्तर ते ॥
जरि [1]न रचता दयानिधि, केवळ जड जीव तरि कसे तरते ॥

असें ह्मटलें आहे. व नुकते परवां नामदार न्यायमूर्ति **रानडे** हे **एकनाथी भागवतां**तील कांहीं भाग मुंबईकरांस सांगत असत, त्यावेळींदेखील जेथें बाकाच्या संख्येइतकेही श्रोते असण्याची नेहमी पंचाईत पडावयाची, त्या मंदिरांत श्रोत्यांच्या झुंडीच्या झुंडी कशा जमत हें पुष्कळांस माहीत आहेच. एकंदरींत हा ग्रंथ फारच लोकप्रिय झाला हें उघड आहे. वरील ग्रंथाखेरीज **एकनाथाचा चतुःश्लोकी भागवतावरही** एक टीकारूपी ग्रंथ आहे. याशिवाय **आनंदलहरी, हस्तामलक, रुक्मिणीस्वयंवर** व **स्वात्मसुख** हेही **एकनाथाचे** ग्रंथ प्रसिद्ध आहेत. यांपैकीं शेवटील ह्मणजे **स्वात्मसुख** हा ग्रंथ वेदांतपर असून, ती

१ एकनाथस्तव.

शुकाष्टकावर टीका आहे. हा लहानसा ग्रंथ स्वतः **एकनाथांस**-देखील फार पसत पडला होता, असें त्याच्या शेवटल्या ओंव्यावरून दिसतें. वर सांगितलेल्या ग्रंथांखेरीज पदें, अभंग वगैरे रूपानेंही **एकनाथाची** बरीच पद्यरचना हल्लीं प्रसिद्ध आहे. **एकनाथाच्या** वेळीं आपल्या इकडील बहुतेक सर्व विद्वानांचा ओढा संस्कृत भाषेंत ग्रंथरचना करण्याकडे असे व कोणी महाराष्ट्र भाषेंत रचना केली तर ती त्यांना पसंत पडत नसे. यामुळें मराठींत ग्रंथरचना करण्याकडे कोणाचेंही लक्ष नव्हतें. अशावेळीं **ज्ञानेश्वरी**-सारखे ग्रंथ नीट प्रसिद्ध करून आणून व स्वतः मराठींतच ग्रंथ-रचना करून, पुन्हां ही चाल सुरू केल्यामुळें, **एकनाथांचे** आपल्यावरील उपकार चिरस्मरणीय होत. **एकनाथ** हे आपल्या वयाच्या एकसष्टाव्या वर्षी ह्मणजे शके १५२१[1]मध्यें फाल्गुन कृष्ण ६ स **पैठणासच** मृत्यु पावले. यांस दोन मुली व एक मुलगा अशीं तीन अपत्यें[2] होतीं, असें

श्रीनाथकृपेशीं सत्पात्र । **गिरिजाबाई** सुक्षेत्र ।
प्रसवली ते पुत्र । कन्या विचित्र पै दोघी ॥

या **केशवदासाच्या** ओंवीवरून दिसतें. यापैकीं वडील कन्येचें नांव **गोदूबाई**; ही **चिंतामणशास्त्री** ऊर्फ **विश्वंभरबावा** यांस दिली होती. हिचें सासरचें नांव **लीलाबाई**. आरंभीं **चिंतामणशास्त्री** फार गुणसंपन्न असे होते; परंतु पुढें तरुणवयांत त्यांस थोडा बाहेरचा नाद लागला. यामुळें **लीलाबाईस** संसार सुचेना. शेवटीं ही गोष्ट **नाथांचे** कानावर गेली, व त्यानीं आपले जामात **चिंतामणशास्त्री** यांस बोध केला कीं, 'आपण असें करतां हें नीट नाहीं. संसारांत स्त्री व पुरुष दोघांनींही एकविचारें चालावें हें उत्तम. तरी आपण आपल्या मर्जीस येईल तसें वागण्यास मुखत्यार आहां; पण रात्रौ भोजनोत्तर कोठें बाहेर जाण्यापूर्वी, **श्रीमत्‌भगवद्गीतेचा** एकएक अध्याय आपले स्त्रीस वाचून दाखवावा, व त्याचा अर्थ तिला नीट समजून सांगावा, एवढें तरी

---

१ १५४६ नवनीत (१८८६). २ मुलगी एकच होती. भारतीय अर्वाचीन कोश.

करावें '. शास्त्रीबावांनीं **नाथांचें** तें ह्मणणें मान्य करून रोज तसें करण्याचा क्रम सुरू केला. लागलाच थोडे दिवसांत शास्त्रीबावांचे बुद्धींत फरक पडला, व त्यांचा छंद सुटून, ते ईश्वरभजनास लागले, व पुढें ते कविताही करूं लागले असें दिसतें. हल्लीं ध्रुवाख्यानावर दिंड्या, पदें वगैरे ज्या **चिंतामण** कवीची आपण ऐकतों, ते तर हेच नसतीलना?

याच सुमारास ह्मणजे **नाथांचे** समकालीन किंवा जरा मागून **दासोपंत** व **गंगाधर सरस्वती** हे कवी विद्यमान होते. पैकीं **दासोपंत** यांनीं गीतेवर मराठींत ओंवीबद्ध टीका केली आहे. या टीकेची ओंवीसंख्या सव्वालक्ष असावी असें

दासोपंतीं केला गीतार्णव मानवा सवालक्ष ।

पंतांच्या या आर्येवरून दिसतें. हे **एकनाथाच्या** गुरूचे गुरू **नृसिंह सरस्वती** यांचे शिष्य होते. हे **जोगाईचे आंबें** येथें असत. यांचा काळ शके १२३६ मध्यें झाला. दुसरे **गंगाधर सरस्वती** हेही **नृसिंह सरस्वतींचेच** शिष्य होत. यांचें आडनांव **साखरे** असें होतें. यांनीं ५२ अध्यात्मक **गुरुचरित्र** या नांवाचा एक सुरस ग्रंथ लिहिला आहे, तो, भाविक लोक अजूनही फार भक्तीनें वाचतात. या कवींच्या नंतर **आनंदतनय** व **रघुनाथ पंडित** हे दोन कवी प्रसिद्धीस आले. यांपैकीं **आनंदतनय** ह्यानें आपल्या काव्याच्या शेवटीं ' आनंदसुत ' ' आनंदतनय ' ' आनंदनंदन ' वगैरे सारख्या शब्दांची योजना केली आहे; परंतु—कदाचित् **उमारमासंवादासारख्या** आबालवृद्धांच्याही तोंडीं असणाऱ्या प्रकरणाच्या शेवटीं ' आनंदतनय ' असल्यामुळें—हा लोकांत **आनंदतनय** या नांवानेंच प्रसिद्ध आहे. याचें खरें नांव **गोपाळराव**. हा जातीचा ब्राह्मण व चांगला व्युत्पन्न असावा, असें याच्या काव्यावरून होतें. **पूतनावध** काव्याचे शेवटीं,

त्या कृष्णाचेच पायीं नमन करितसे आरणीचा शिपाई ।

असें ह्मटलें आहे. यावरून कविमंडळांत जसें कलम, तशीच यानें तरवारबहादरांत आपली तरवारही गाजविली असली पाहिजे, व हें अनुमान त्याच्या वीररसात्मक पद्यांवरूनही बरेंच संभवनीय दिसतें.

आजपर्यंत याचीं पंचवीस एक प्रकरणें व सुमारें शंभर पद्यें इतकी कृति प्रसिद्ध झाली आहे. परंतु याचे ग्रंथ यापेक्षां पुष्कळच अधिक असावेत, असा पुष्कळ विद्वानांचा तर्क आहे. याच्या पद्यांत **ज्ञानेश्वराच्या** वेळचे खेंव, लाहो वगैरे जुनाट शब्द व कांहीं ' कथिजे, ' ' वदिजे ' सारखीं रूपें बरींच आढळतात. तशींच यानें लांबलांब समास, मोठाले शब्द वगैरेचीही रेलचल उडवून दिली आहे. याच्या काव्यावरून याला हिंदी, मराठी व संस्कृत या तिन्ही भाषांचें ज्ञान चांगलें असावें असें दिसतें.

दुसरा, वर सांगितलेला कवि **रघुनाथ पंडित** हा याचा व्याही होय. असें सांगतात कीं, **आनंदतनयाचें सीतास्वयंवर** पाहून **रघुनाथ पंडितांस** आपणही असेंच एक काव्य रचावें असें वाटलें. ह्मणून त्यानें तसेंच **दमयंतीस्वयंवर** रचिलें. हें काव्य ' नलदमयंतीस्वयंवरोपाख्यान ' किंवा 'नलोपाख्यान' या नांवानें प्रसिद्ध आहे. **आनंदतनयाच्या ताटकावधांतील**

केव्हां कोठुनि घेतला शर करीं केव्हां गुणीं योजिला
केव्हां वोढुनि घेतलाचि न कळे कीं वेगळा दाविला ॥
गेला सायक पावकासम किरे तूणीमधें संचरे
शौर्या साधुनि आर्य कार्य बरवी दासस्थिती आचरे ॥

या श्लोकावरूनच पंडितांनीं आपला

कदा नेणो ओढी शरधितुनी काढी शर कदा ।

हा श्लोक रचला असें ह्मणतात. बाण्यानें ह्मणून रचलेल्या काव्यांत **पंडितासारखा** कवि असा श्लोक घेईल असें वाटत नाहीं; परंतु या दोन्ही श्लोकांत विलक्षण साम्य आहे खरें. या दोघांही व्याह्याव्याह्यांच्या काव्यांत ' सवदा ' ' वजीर ' ' हेजीब ' तुमान ' वगैरे परकी शब्द बरेच आलेले आढळतात; परंतु या परक्या शब्दांची योजना दोघांही कवींनीं इतकी कुशलतेनें केली आहे कीं, त्यापासून कोठेंही विरस न होतां, उलट माधुर्यच आलें आहे. दोघांनींही शब्दसौंदर्य, पदलालित्य, वचनमाधुर्य इत्यादि गुणांनीं आपल्या वाग्वधूस फार उत्कृष्ट नटविली आहे, व दोघांच्याही काव्यांत तिचें रूप फारच मनोहर व हृदयंगम

असें नजरेस पडतें. किंबहुना इतके दिवस झालेल्या मागील सर्व कवींत व आतांच्या या कवींत हाच मुख्य भेद दिसतो असें ह्मटलें तरी चालेल. पूर्वींच्या कवींच्या वाग्वधूचें रूप प्रौढ व शांत असें होतें; परंतु यांच्या काव्यांत तिचें रूप प्रमदावनांत क्रीडा करणाऱ्या विलासवतीसारखें चंचल असें दिसत आहे. **रघुनाथ पंडित** हा फार विद्वान् व संस्कृतज्ञ ब्राह्मण दिसतो. अगदीं आरंभापासून तों शेवटापर्यंत यानें आपलें काव्य संस्कृत अलंकारशास्त्राच्या नियमांस धरून लिहिलें आहे. अगदीं पंचमहाकाव्यांच्या धर्तीवर लिहिलेलें असें मराठींत याखेरीज दुसरें काव्य नाहीं.[1] याचा शृंगार मुग्ध आहे, व रचना सर्वत्र ठाकठिकीची आणि हृदयंगम आहे. श्लेषरचनेची कोणतीही संधि कवीनें फुकट दवडली नाहीं, यामुळें कांहीं ठिकाणीं काव्यास बरेंच दुर्बोधत्व आलें आहे; परंतु याच्या काव्यमंदिराच्या एकंदर सौंदर्यांत वाचक असले बारीक दोष सहज विसरून जातो. प्रसिद्ध कवयित्री **साफो** इच्या एकाच चुटक्यावर तिची कीर्ति जशी अजरामर झाली आहे, तशी या एकाच चुटक्यावर पंडितांची किर्तिही आजपर्यंत चालत आली आहे, व ती पुढेंही तशीच राहील.

या दोघांही कवींना कांहीं विद्वान् ग्रंथकारांच्या मतांस[2] मान देऊन, या ठिकाणीं आणिलें आहे. परंतु हे या काळचे असावेत असें वाटत नाहीं. **आनंदतनय** हा **शहाजीचा** गुरु होता, येवढ्याच दंतकथेवरून या दोघांनींही त्याला **वामन** व **मुक्तेश्वर** यांच्या आंधींचा ठरविला आहे, व **रघुनाथपंडित** त्याचा व्याही होता या दुसऱ्या दंतकथेवरून त्याला त्याचा समकालीन ह्मटला आहे. परंतु याबद्दल दुसरा पुरावा नाहीं. आतां **आनंदतनयानें** आपल्या काव्यांत आपणांस ' अरणीचा शिपाई ' असें ह्मटलें आहे. यावरून तो **अरणीच्या** लढाईंत असावा असें स्पष्ट होतें. इतिहासांत दिलेली **अरणीची** लढाई १७५१ मध्यें झाली. याचे आधीं ह्मणजे **शहाजीचा** गुरु असल्याबद्दल लेखी पुरावा कोठें पहाण्यांत

---

१ **रघुनाथ पंडितां**वरील निबंध.

२ निबंध चंद्रिका व काव्यसंग्रह.

नाहीं. तो **शहाजीचा** गुरु असता तर, **शिवाजीनें** आपल्या बापाच्या गुरूला अगर त्याच्या वंशजांना कांहीं इनाम नेमणूक खास दिली असती. निदान त्याचें देऊळ, छत्री वगैरे कांहीं तरी असण्याचा बराच संभव होता. परंतु शोधाअंतीं तसेंही कांहीं असल्याचें कळत नाहीं. तसेंच सोळाव्या शतकाच्या अगदींच आरंभीं यांनीं पंडितासारखा जाडा संस्कृतज्ञ मराठींत काव्यरचना करण्यास प्रवृत्त होईल असेंही वाटत नाहीं. यावरून हे कवि १७०० च्या सुमारास किंवा जरा नंतर झाले असावे असें वाटतें.[2]

आपल्या भाषेचा 'ओंवीकाळा' चे शेवटीं **मृत्युंजयस्वामी कृष्णदास** व **शिवरामस्वामी** हे कवी झाले. **मृत्युंजय** स्वामींचा **अमृतसार** नांवाचा ग्रंथ व पदें उपलब्ध आहेत. **कृष्णदास** व **शिवराम** हे दोघेही अनुक्रमें 'बाजीरावावर पद्य' व 'श्रीमंत नानासाहेब पेशव्यांस उपदेश रचणारे **कृष्णदास** व **शिवराम**' खास नव्हत हें उघड आहे. **कृष्णदास** हे 'दासपंचा-यतनांतील' **जयरामस्वामी** वडगांवकरांचे गुरु यांचा ग्रंथ असल्याचें माहित नाहीं. परंतु यांचीं पदें पुष्कळ ऐकूं येतात. यांपैकीं बरींच काव्यसंग्रहांत प्रसिद्धही झालीं आहेत. यांनीं एके पदांत

गुरुचरित्र कामधेनु । पठणीं ज्याचा नित्य नेमू।

असा उल्लेख केला आहे. यावरून चरित्रकार '**गंगाधर सरस्वती**' यांचा मागें दिलेला काळ बरोबर आहे, असें मानण्यास आणखी पुरावा होतो. **शिवरामस्वामी** हेही 'दास पंचायतनां' तील **रंगनाथ** स्वामींच्या वडिलांचे गुरुबंधु होत. यांचे 'देहास बोध' वगैरे ग्रंथ व अनेक पदें आहेत.

यानंतर महाराष्ट्रांत जसें शूरत्व तसेंच विद्वत्व आणि

---

१ **अरणी** हा प्रांत ब्राह्मण जहागीरदारांचा आहे. हल्लींही ब्राह्मणाकडे चाललेली एक जहागीर या प्रांतांत आहे. परंतु ती विजापुरकरांनीं '**वेदाजी भास्कर**' या नांवाच्या गृहस्थांस त्यांच्या इसानी नौकरीबद्दल मूळ इनाम दिली. हल्लींचे या जाहागिरीचे मालक **श्रीनिवासराव** आहेत. शोध करतां यांचा व आनंदतनयाचा कांहींच संबंध असल्याचें कळत नाहीं.

२ **नवनीत** व भा. अ. कोशांत **रघुनाथ** पंडितांचा शक १७०० दिला आहे.

कवित्व यांसही फार भरती आली. चांगले दिवस येणें ह्मणजे चोंहीकडून ग्रह चांगले यावे लागतात, हें ह्मणणें कांहीं खोटें नाहीं. देशाला दिवस चांगले येऊं लागले तेव्हां अनेक वीर आणि अनेक मुत्सद्दी एकाच काळांत झाले. तसेंच या राजक्रांतीच्या समयाला कवीही पुष्कळ झाले. एका शके १५३० सालांतच जगन्मान्य अशा तीन कवींचा जन्म झाला. **मुक्तेश्वर, रामदास,** व **तुकाराम** कवी याच सालीं जन्मले. यांपैकीं **मुक्तेश्वर**विषयीं आधीं विचार करूं. कारण याचा आजा **एकनाथ** व बाप **चिंतामणशास्त्री** यांजविषयीं मागें उल्लेख आलाच आहे, तेव्हां हा थोडा जवळचा वाटतो. याशिवाय **मुकुंदराज, ज्ञानेश्वर** वगैरे ' सोऽहं कोऽहं ' सारख्या तत्वज्ञापासून तों आपण **एकनाथा**पर्यंत भाषादेवी बरोबर आलोंच. मग तेथें मात्र जरा वाट चुकून **रघुनाथ आनंदतन**यांच्या संगतीनें आपण आधीं भाषादेवीच्या विलासमंदिरांत गेलों. तेव्हां आतां जरा त्याच मंदिराच्या पुढल्या चौकांत जाऊं आणि तेथून मग पुन्हां संतमंडळाकडे वळूं.

मुक्तेश्वराचा जन्म शके १५३० किंवा १५३१ सालीं झाला. यानें आपला व आपल्या मातापितरांचा नामोल्लेख

> तो **मुद्गलचिंतामणी**सुत । लीला विश्वंभर जगविख्यात ।
> व्यासभारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ॥

या व अशासारख्या शब्दांनीं आपल्या ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं केला आहे. याच्या बालपणच्या कांहीं आख्यायिका लिहिलेल्या आढळतात; परंतु कालमानानें पाहतां त्यांवर विश्वास ठेवतां येत नाहीं; परंतु त्यापासून इतकें मात्र खास निघतें कीं, **मुक्तेश्वराला नाथांच्या** ग्रंथांपासून कवित्वशक्ति प्राप्त झाली आणि त्यांचेंच अनुकरणानें तो ग्रंथ लिहूं लागला. यानें आपल्या ग्रंथांपैकीं **रामायण** हें आधीं रचलें असावें[१]. कारण, या कवींच्या सर्व कृतींत ही कृति जरा नीरस उतरली आहे. त्यांत कवीनें शब्दालंकाराच्या वेड्या हौसेच्या नादीं लागून, आपल्या काव्यास कोठें कोठें दुर्बोधता आणिली आहे. खेरीज यमकासाठीं

१ मुक्तेश्वरावरील निबंध. नि० च०.

शब्दांची केलेली ओढाताण, ऱ्हस्वदीर्घांकडे दुर्लक्ष, व्याकरण नियमांचें उल्लंघन वगैरे प्रकार याच्या याच ग्रंथांत विशेष आढळतात; परंतु सूक्ष्म रीतीनें पाहणाराला पुढील **महाभारताच्या** कर्त्याच्या लेखणीची चमक, यांतही दिसून आल्यावांचून राहत नाहीं. याचा **महाभारत** हा ग्रंथ सर्वोत्कृष्ट उतरला आहे. यांत त्यानें

> व्यास ग्रंथगिरीचें सोनें । संस्कृत खोदिये गाळुनि मनें ।
> देशभाषा घडिलें लेणें । साहित्यरत्नीं सुजडित ॥

व तसेंच

> एक एक अक्षराची भीक । जीर्ण कवींतें मागून देख ।
> मी सर्वज्ञ कविनायक । ऐसें ह्मणविलें लौकिकीं ॥

असें डौलाचे आणि अभिमानाचे उद्गार काढले आहेत. आणि असा अभिमान वाटण्यासारखीच याची कृतीही उतरली आहे. सर्व महाराष्ट्र कवींत कवि असा **मुक्तेश्वरच** असें अनेक विद्वानांचें मत आहे. ते ह्मणतात कीं, **मुक्तेश्वराच्या** तोडीचा दुसरा कवि मराठींत त्याच्यापूर्वी नव्हताच; परंतु पुढेंही झाला नाहीं. **मुक्तेश्वराचें** 'आदिपर्व' तर इतकें सुरेख उतरलें आहे, आणि त्यांत त्याच्या प्रासादिक वाणीचा स्वच्छ झरा असा वाहत आहे कीं, त्यापुढें मूळ **व्यासवाणीचेंही** सौंदर्य फिकें पडतें. कै० **चिपळूणकरद्वयामध्यें** या कवीसंबंधें शेवटपर्यंत वाद होता. वडिलांच्या ह्मणण्याचा आशय असा कीं, कवित्वाची खरी खरी स्फूर्ति महाराष्ट्र कवींमध्यें काय ती एका **मुक्तेश्वराचेच** काव्यांत दिसून येते. **मोरोपंताचें** काव्य ह्मणजे नुसता शब्दजुळवणीचा प्रकार दिसतो. त्यांत काव्यास अत्यवश्य अशी जी सहृदयता ती फारशी आढळत नाहीं; परंतु चिरंजीवांचें ह्मणणें याहून अगदीं निराळें पडतें. त्यांच्या मतें भाषादेवीचें भव्य स्वरूप व कवीचें काव्यकौशल्य **मोरोपंताप्रमाणें** दुसऱ्या कोणाच्याच काव्यांत प्रगट झालें नाहीं. कवि या नात्यानें पाहतां हा मुकुटमणीच शोभतो. त्याची सर इतर कवींस येणार नाहीं. ह्मणजे इतकें कीं, त्यांच्या मतें **मुक्तेश्वराचा** नंबर **मोरोपंताच्या** खालचा लागतो. याप्रमाणें अशा विद्वान्

पितापुत्रांमध्यें देखील ज्या वादाचा निकाल अखेरपर्यंत लागला नाहीं, त्यासंबंधानें येथें, 'आवड गोड आहे', येवढें ह्मटलें ह्मणजे पुरे. या कवीनें लिहिलेले असे 'रामायण', 'शतमुखरावणाख्यान', 'भगवद्गीतेचें भाषांतर' आणि 'भारत' इतके ग्रंथ आहेत असें ह्मणतात. पैकीं **महाभारताची** कोणा कोणाच्या मतें यानें अठराही पर्वें लिहिलीं आहेत असें होतें. हीं पर्वें प्रत्यक्ष पाहिल्याबद्दल निबंधमालेंत (अंक ४७) एक पत्र छापलें होतें.

मुक्तेश्वराच्या भाषेंत 'राणीव', 'पैठा,' 'खेळ' वगैरे जुने व अगदीं पहिल्या काळचे शब्द, आणि उकारांत ओकारांत रूपें प्रयोग व **ज्ञानेश्वरादिकांच्यासारखे** कर्मणिप्रयोग तसेंच आलीकडील कवीप्रमाणें मुसलमानी व फारसी शब्द यांचीही योजना कांहीं ठिकाणीं आढळते. मराठी भाषेंत वनस्पतीचीं किंवा सृष्टिसौंदर्याचीं रम्य वर्णनें इतर कवीपेक्षां याच्याच काव्यांत फार आढळतात. किंबहुना इतर ठिकाणीं—**वामन** खेरीज करून—तीं नाहींतच ह्मटलें तरी चालेल. तसेंच यांनीं ठिकठिकाणीं मदनशरांनीं पीडित झालेल्या

> कनकलतिका सौदामिनी। कीं चंद्रकला तनुधारिणी।
> सुवर्ण केतकी पत्रवर्णी। सुगंध खाणी हरिणाक्षी॥

अशा 'मन्मथ पुतळ्यांची' केलेलीं वर्णनें किंवा कोणी अप्सरा जलक्रीडा करीत असतां

> गंधवायो विनोदें तेथें। वस्त्र उडवोनि नेलें परोतें।
> येरी धांवोन धरी हातें। तंव तें वेगीं नाटोपें॥
> रातोत्पळें इंदीवर। आच्छादिजे तेंवि सकुमार।
> वामकरें कामागार। कवळोनि धांवें नग्नांगीं॥
> धरोनि धांवें चपळापांगीं। सलज्जा आंग झांकी वेगीं।
> मुखें निंदित ह्मणे आंगीं। पडे रे पवना पापिष्ठा॥

याप्रमाणें 'गोमट्या' कामिनींची उडालेली तारांबळ किंवा **शर्मिष्ठेसारख्या**

---

१. हें सर्व खोटें असल्याबद्दल काव्यसंग्रहांत एका शोधकानें कळविलें आहे.

सुवर्ण चंपककळी । कीं ओतली मन्मथपुतळी ।
अत्यंत तारुण्यनवाळी । परि विनय सकुमार ॥

अशा ' नृपांते व्यंकादृष्टी ' लक्षिणाऱ्या नितंबिनींचे कामविलास, कोणालाही भुलवून त्याची

' भंगला नेमाचा तडाग । धैर्य पळालें बारावाटीं, ।
नाहींच झाला विचारू ।

अशी स्थिति सहज करून देण्यासारखे आहेत. रसज्ञ व विद्वान् या कारणांनीं हा कवि जसा आपल्या स्तुतीस पात्र आहे, तसाच आपल्या भाषेंत निरनिराळ्या वृत्तांत कविता करण्यासंबंधेंही पहिला मान त्यालाच योग्य आहे. ही मानाची जागा निरनिराळ्या गृहस्थांकडून निरनिराळ्या कवींना कशी देण्यांत आली, याबद्दल मागें उल्लेख आलाच आहे, व योग्य स्थळीं त्यासंबंधें खरी हकीगत काय असावीशी वाटतें तेंही लिहिलें आहेच; तेव्हां त्यासंबंधें येथें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

मुक्तेश्वराचेच वेळीं **तुकाराम** वगैरे संतमंडळीही महाराष्ट्रांत आपल्या भाषेची सेवा करीत होती, हें मागें सांगितलें. **तुकारामाच्या** जन्मकालासंबंधें बराच घोंटाळा दृष्टीस पडतो. याचें जन्म व मरणशक कविचरित्रांत अनुक्रमें १५१७ व १५७१ असे दिले आहेत. वि० श० परिभाषा व नवनीतांतील भास्कर दामोदर पाळंदेकृत चरित्रलेखांतही हेच शब्द दिले आहेत. नवनीताच्या १८८६ सालच्या अवृत्तींत जन्मशक १५३० दिला आहे, व मरणशक १५७१ च कायम आहे. हिंदुस्थानकथारस (१८८१) कारांनीं हे सन अनुक्रमें १५१० व १५५० असे दिले आहेत. निबंधमालेंत वा० दा० ओकांनीं केलेल्या पत्रव्यवहारांत पुढील शक 'सर्वमान्य' आहेत, असें ह्मणून '**तुकाराम** १५१० किंवा १५७१ इतकाच उल्लेख केला आहे.' यांपैकीं हिंदुस्थानकथारसांत दिलेला मृत्युशक कोठल्या आधारानें आसावा याचा अंदाज होत नाहीं. बाकी सर्व ठिकाणीं मृत्युशक १५७१ च दिला आहे. हा शक **महिपति**बावांनीं भक्तलीलांमृतांतल्या

शकेपंधराशें एकाहत्तर जाण । विरोधीसंवत्सर नामाभिधान ।
फाल्गुन वद्य द्वितीया इंदुपूर्ण । आलासे दिन चार घटका ।
जगद्गुरू तुका वैष्णव भक्त । तये समयीं होतसे गुप्त ।

या लेखावरून घेतला असावा हें उघड आहे. तसेंच **तुकोबाचा** जन्मशक ह्याचप्रमाणें असा कोठेंच दिला नाहीं. यामुळें ज्यानें त्यानें हा शक अनुमानानें दिला आहे. व हें अनुमान बांधण्याचें धोरण पुढीलप्रमाणें आहे. **महिपती**बावांनींच **तुकारामाचे** १७व्या वर्षी आईबाप मेले, १८व्यांत बंधु वारला वगैरे सांगून, पुढें

एकविसाव्यांत विपरीत काळ । तुकयासि पातला तत्काळ ॥

असें सांगितलें आहे. आणि नंतर

पूर्वार्ध संपलें ऐशा रितीं । दुःखें देखिलीं नाना रितीं ॥

असें ह्मटलें आहे. यावरून एकविसाव्यांत जर पूर्वार्ध संपलें, तर त्याचें वय ४२ वर्षांचें असलें पाहिजे, असें समजून, त्याचा जन्मकाल १५३० हा शक धरला आहे. अशा रीतीनें अगदीं खराब आहे असें मानतां येणार नाहीं. तरी जन्मकाल थोडा इकडे तिकडे असल्यानें ऐतिहासिक रीत्या **तुकारामाच्या** पुढील वृत्तांताला बाध येत नाहीं; परंतु मृत्युशकासंबंधें मात्र तसें नाहीं. मृत्युशक १५७१त कायम धरला तर **तुकारामाचे शिवाजी** राजास धाडलेलें पत्र वगैरे मजकूर जरा असंबद्ध दिसतो. हा मजकूर खरा धरावयाचा असेल तर **महिपति**बावांची माहिती चूक असली पाहिजे; परंतु असा तर आधार मुळींच कोठें आढळत नाहीं. उलट एका गांथेंत

शालिवाहन शके । पंधराशें एकाहत्तर। विरोधीनाम संवत्सर उत्तरायणीं।
फाल्गुन वद्य द्वितीया । दिवस सोमवार ।
प्रथम प्रहर । प्रातःकाळ । तये दिवशीं । शेवट कीर्तन करतां ।
ह्मणे मज आतां । निरोप द्यावा । तुका ह्मणे नयन ।
साधुसंत पाया । ऐसें बोलोनिया । गुप्त झाला ॥

असा एक अभंग आढळतो, व मोजून पाहतां १५७१ साली विरोधी-

१ तत्वविवेचक.

नाम संवत्सरही येतो. परंतु त्या सालीं फाल्गुन वद्य द्वितीयेला शनवार येतो, सोमवार येत नाहीं. यावरून हा शक किंवा सदरहू पत्र व तसलाच इतर मजकूर यांपैकीं कांहीं तरी जरा संशयाचेंच मानलें पाहिजे. मात्र **महिपती**नें सांगितलेलें इतर वृत्त खरें मानण्यांत इतिहासाची हरकत पडत नाहीं. **तुकारामा**च्या वयाच्या २२व्या वर्षापर्यंत त्याला अनेक संकटें आलीं व त्याच्यावर नाहीं नाहीं ते प्रसंग गुदरले. आधींच त्याच्या मनाची सहज प्रवृत्ति परमेश्वराकडे होतीच. परंतु त्याच्यावर आलेल्या अनेक संकटांमुळें तो अधिक अधिकच वेवतावून गेला आणि शेवटीं तो सारा धंदा सोडून, **विठोबा**चें भजन करूं लागला. हा जातीचा निव्वळ मराठा. पण याचा पिढीजाद धंदा वाण्याचा असे. **तुकशेटी**नींही थोडासा व्यापार एकदां केला होता. पण ब्राह्मणाकडून घर लुटल्यावर देखील ‘ गांवची महारीण राबती ’ मागायास आलेली विन्मुख जाऊं नये ह्मणून, बायकोचें वस्त्रही ज्यानें देऊन टाकावें, किंवा शेतांत धान्य खाणारे पक्षी ‘ गरीब बिचारे ’ समजून, त्यानें त्यांना खुशालपणें शेत खाऊं द्यावें, त्याला व्यापारांत तें काय मिळणार ? तेव्हां त्यांतही त्याचें दिवाळें निघालें.

सावकार पिशुन आणि खळ। गृहासि पातले जैसे काळ।
क्षत लक्षूनी तात्काळ। येती कावळे टोंचावया।

अशी स्थिति झाल्यावर त्यानें संसारांचा सर्व भार भाउबंदांवर टाकला व विनाकारण उपाधीस आणि आशेस मात्र कारण, असें ह्मणून घरचे आपल्या वांट्याचे सर्व कागदपत्र, खतें, चोपड्या, **इंद्रायणी** नदींत बुडवून परमेश्वराचे ठायीं चित्त एकाग्र होण्यास साधनीभूत असा एकांतवास पतकरला. सकाळीं उठून विठोबाची पूजा करावी आणि मग गांवाजवळील **भांडार** पर्वतावर बसून ग्रंथावलोकन करावें असा त्यानें क्रम धरला. पर्वतावर बसून **ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ** यांच्या ग्रंथाचें पारायण केलें. त्याची स्मरणशक्ति उत्तम होती व बुद्धीही कुशाग्र असे. खेरीज ग्रंथांचें पठण करणें तेंही तो

शेंडीस बांधूनीया दोरी। निजहस्तें टांगी वरी।
ह्मणे मानेसी आंसडा बैसल्यावरी। निद्रा दुरी पळेल॥

अशा एकाग्र चित्तानें करी. यामुळें त्याला ग्रंथाचें पाठांतर फार लवकर झालें व स्वतःही रचना करतां येऊं लागली. तो पंढरीची वारी आधींपासूनच करीत असे; परंतु या पुढें तो भजन व कीर्तनही करूं लागला. कीर्तन करण्याची पद्धति आपणांमध्यें **तुकारामानेंच** सुरू केली असें ह्मणतात. **तुकारामाचे** घरीं कीर्तन चाललें असतां, तेथें पाहिजे त्यानें यावें असें असे. व आपल्या घरीं येऊन कीर्तन करण्याची कोणी त्यास विनंति केली असतां, तीही तो मोठ्या उत्सुकतेनें मान्य करी.

जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ।
बुका लावूं नये भाळा । माळा घालूं नये गळां ।
तटावृषभासी दाणा । तृण मागों नये जाणा ।
तुका ह्मणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ।

अशी त्याची कडकडीत वृत्ति असे. व इतरांनांहीं तो हाच उपदेश करी. यामुळें त्याचा बहुतेक काळ कीर्तनांतच जाई. **तुकारामाची** कीर्तनाची अवघी सामुग्री ह्मटली ह्मणजे एक काय तो टाळ. याशिवाय आपल्याबरोबर तो दुसरें कांहींच बाळगीत नसे. पण इतक्या सामग्रीवर सुद्धां आपल्या रसाळ घाणीनें संसाराच्या मिथ्यात्वाविषयीं उपदेश करून, **शिवाजी**सारख्या राजकारणी पुरुषालाही अगदीं विरक्त बनविण्याजोगें सामर्थ्य त्याचे अंगांत होतें. हा कीर्तनांत तेथल्या तेथेंच अभंग रचून ह्मणे. जे अभंग आज दोनशे वर्षांनंतरदेखील साधारण मनुष्याच्याही तोंडून ऐकलें असतां, मनाला लोकोत्तर आनंद देतात, ते अभंग आदिउगमापासूनच कानीं पडल्यानें श्रोत्यांच्या मनावर त्यांचा कसा परिणाम वठत असेल, ही कल्पना कोणासही सहज करतां येईल. याची रसवंती जात्याच फार मधुर व प्रेमळ असे. यामुळें

जैसे मेघ वर्षतां साचार । अगणित उठती तृणांकुर ।
कां सागरीं तरंग येती अपार । संख्या न करणें तयांची ॥

असे प्रेमपाझर याच्या श्रोत्यांस फुटत. हा संस्कृतज्ञ नव्हता किंवा कोणीं मोठा जाडा विद्वान्‌ही नव्हता हें खरें. तरी याची स्वतःचीच

वाणी काहीं कमी नव्हती. तिच्या योगानें वेदाकडून किंवा स्मृतीकडूनही जें काम होणें कठीण, तें सहज उरकण्याचा तुकारामानें एकसारखा तडाका लावला. याच्या उपदेशानें उच्च हिंदुलोक तर अभंग रचना करून पंढरीस नाचूं लागलेच, परंतु यानें शूद्र अतिशूद्र व प्रत्यक्ष अविंधासही पंढरीची दीक्षा दिली. तुकारामाच्या प्रासादिक वाणीमध्यें मराठी भाषेचें जें एक विलक्षण मनोहर व साधें स्वरूप आढळतें, तें इतरत्र कोठेंही आढळत नाहीं. सोप्या व साध्या शब्दांनीं मनावर ठसे असा उपदेश करणें, तसेंच प्रसंगीं राग त्वेष इत्यादि मनोविकारांचें श्रोत्यांच्या मनांत काहूर उभें करणें, किंवा एखाद्या निंद्य गोष्टीची अगदीं अवहेलना करून त्याबद्दल तिटकारा उत्पन्न करणें, या सर्व गोष्टी यानें आपल्या अभंगांत सहज लीलेनें साधल्या आहेत. तसेंच आपल्या अभंगांत जेथें तेथें उपमा व दाखलेही यानें पुष्कळ सांगितले आहेत. परंतु बोलणें पाटीभर आणि अर्थ चिमुटभर असा प्रकार कोठेंही झालेला नाहीं. उलट, पांच वाक्यें लिहूनही जो अर्थ नीट उमटणार नाहीं, तो यानें पांच शब्दांतच सांगितलेला आढळतो. नेहमींच्या घडणाऱ्या गोष्टी व नामांकित वेदांत्यासही घोंटाळ्यांत पाडणारे गहन विषय हे दोन्ही प्रकार यानें अगदीं साध्याच शब्दांनीं व्यक्त केले आहेत. आणि यामुळेंच या ‘ वैष्णववीरा ’ची वाणी अद्यापि देखील सर्व महाराष्ट्रभर ऐकूं येते. अगदीं भिकार झोंपडींतल्या गरीब कुणब्यापासून तो थेट महादजी शिंद्यासारख्या थोर सरदारापर्यंत याची मान्यता सारखी असे; व अजूनही ती तशीच आहे. तुकारामामुळें पंढरीचें माहात्म्य या दिवसांत फारच वाढलें. वेदांत्यास जशी काशी तशीच भागवत धर्मानुयायांस पंढरी झाली. किंबहुना काशीपेक्षांही एका दृष्टीनें पंढरी श्रेष्ठ ह्मणावी लागते. काशीस भेदाभेद दृष्टीस पडतो; तसें पंढरीस नाहीं. देव ब्राह्मणांचाच आणि ह्मणूनच कोता असा दिसतो. पंढरीचा देव सर्वांचा. त्याच्या येथें पंक्तिभेद मुळींच नाहीं. ज्यानें उठावें त्यानें गळ्यांत तुळसीमाला घालाव्या आणि टाळ घेऊन विठोबाच्या भजनास लागावें. मग तो ज्ञानोबासारखा ब्राह्मण असो, कीं चोखयासारखा महार असो, नाहीं तर शेखमहंमदासा-

रखा यवन असो,—सगळे सारखेच. ज्याचा भाव खरा आणि भक्ति दृढ, त्यालाच देव पावावयाचा. याखेरीज **काशी** आणि **पंढरी** या दोन्ही मार्गांच्या मूळाशींच मोठा खडक आहे. ही अनंत भोंवऱ्यांनीं भरलेली भवनदी तरून जाण्याला हे दोन्हीं मार्ग खरे. पण एकानें भोंवऱ्यांशीं झगडून पोहत नदीपार व्हावयाचें व दुसऱ्यानें नौकेंत बसून अलगत पलीकडे उतरावयाचें, यांत होमहवनादिकांनीं किंवा योगसाधनांनीं स्वर्गप्राप्ति करून घेणारे पहिल्या वर्गांतले गडी. पण त्या मार्गांत मध्येंच गचकळी खाण्याची भीति फार. आणि तो मार्गही अत्यंत बिकट. यामुळें तो सर्वसाध्य व व्यापक असा झाला नाहीं व होणारही नाहीं. दुसऱ्या मार्गाला कदाचित् कोणी नेभळा किंवा कमी मर्दुमकीचा ह्मणेल; परंतु तो सोपा व बऱ्याच अंशीं निर्धास्त असल्यामुळें, भोळ्या बायाबापड्यापासून तों अगदीं वरपर्यंत सर्वांस अगदीं पसंत पडणरा. आणि तशांत त्या नौकेला **नाथासारखे** आणि **तुकोबासारखे** नेते भेटल्यावर तिकडे लोकांच्या झुंडीच्या झुंडी वहाव्या हें अगदीं साहजिक आहे. खेरीज या **पंढरीच्या** भक्तिमार्गांत लटपट किंवा आंतबाहेर ह्मणून कांहीं एक नाहीं. यांत आपणाला समजेल अशा उघड उघड शब्दांनीं ईश्वराला आळविण्याचा प्रयत्न असतो. देवाला आळविण्याचा अमक्याला अधिकार आहे, आणि तमक्याला नाहीं, किंवा देवाला अमुकच भाषा प्रिय आहे, तमुक नाहीं असा प्रपंच **पंढरीस** नाहीं. यामुळें मराठ्यांचें खरें रक्त व खरी भाषा त्याच ठिकाणीं चांगलीं नांदतात. आणि यामुळेंच **नाथ तुकारामासारख्यांच्या** पवित्र मुखापासून उगम पापलेल्या सरस्वतीचा ओघ चोंहीकडे वाहत जातांना, व त्या स्वच्छ जलौघांत ब्राह्मणांपासून तो शूद्रातिशूद्रयवनांपर्यंत सर्वजण विहार करतांना आपल्या दृष्टीस पडतात. या सर्वांच्या रसवंतींतून निघालेले अभंग व व ओंव्या सर्व देशभर पसरून ज्याच्या त्याच्या तोंडी झाल्या ह्मणजे, हळूहळू त्यांतले शब्द जानपद भाषेशीं एक भाव पावून भाषेचें रूप अधिक अधिक सोज्वळ होऊं लागतें. हा या भक्तिमार्गाचा उघड उघड फायदा आपण महाराष्ट्र भाषेचा इतिहासाचा विचार करतांना अवश्य लक्षांत धरण्यासारखा आहे.

तुकारामाचे वेळीं संतमंडळी बरीच होती हें वर आलेंच आहे. व ते बहुतेक सर्वजण कविता करीत. एकट्या **तुकारामाचेच** पाहिले तर लक्षावधि अभंग आहेत असें ह्मणतात. त्यानें स्वतः 'मी पांच कोटी अभंग केले व नामदेवांनीं शतकोटी अभंगाची केलेली प्रतिज्ञा माझे मुखें पूर्ण झाली' असें लिहिलें आहे. हल्लींही यांपैकीं थोडा भाग उपलब्ध आहे असें नाहीं. याखेरीज आणखीही त्यावेळच्या पुष्कळ संतांचे अभंग हल्लीं ऐकूं येतात. **रामेश्वरभट्ट**, **सेना न्हावी**, **शेखमहंमद**, व **शेखसुलतान**, **नारायणबावा**, **प्रेमाबाई** वगैरे सर्व मंडळी याकाळांतली दिसते. यांपैकीं कोणी पदें केलीं आहेत, कोणी भूपाळ्या रचिल्या आहेत. कोणी अभंग व ओंव्याच ह्मटल्या आहेत. परंतु जशी **ज्ञानेश्वराचे** वेळीं तशीच याकालीं सर्वांनाच स्फूर्ती आली होतीसें दिसतें. **रामेश्वरभट्ट** हा पहिल्यानें भक्तिमार्गाच्या अगदीं विरुद्ध होता. परंतु पुढें **अनगडशा** नांवाच्या एका फकीराच्या सांगण्यावरून यानें **तुकारामाचा** उपदेश घेतला. व त्यामुळें यास उपरति होऊन हा **पंढरीची** वारी करूं लागला. **तुकारामाच्या** पट्ट शिष्यांपैकीं हा एक मुख्य होता. याचे कांहीं अभंग, व तुकारामस्तुति स्तोत्रें वगैरे प्रसिद्ध आहेत. **सेना** न्हावी हाही मोठा साधु पुरुष होता. यानें कांहीं ग्रंथ केले आहेत, असें याचे अनुयायी सांगतात. परंतु हल्लीं याचा एकही ग्रंथ प्रसिद्ध नाहीं. वारकऱ्यांच्या तोंडीं याचे अभंग मात्र पुष्कळ आहेत. मुंबईच्या न्हावी वारकऱ्यांत **सेन्याचे** अभंग ह्मणण्याचा प्रघात दिसतो.

आह्मी जातीचे बारीक। काम करणें बारीक॥
गुरुडोळां दर्पण दावूं। भावार्थाचा चिमटा घेऊं॥
इषा मनीषा बगला झाडूं। काम क्रोध नखें काढूं॥
बादशहाचे द्वारीं। **सेना** न्हावी काम करी॥

या एका अभंगावरून **सेन्याच्या** अभंगांची धाटणी बरीच लक्षांत येण्याजोगी आहे. **शेखमहंमद** हा कवि नगर जिल्ह्यांत **चांभारगोंदें** किंवा **श्रीगोंदें** या गांवीं राहत असे. याचे घरीं 'मुल्लाण्याची'

वृत्ति चालत होती. एक दिवस बकरें कापण्याची पाळी याजवर आली. तेव्हां त्या बकऱ्याची ओरड व तळमळ पाहून,

अहिंसा विज्ञान । दु:खी सुख कळलें । आत्म ज्ञान फळलें ।
शेखमहंमदा ॥

तो पंढरीची वारी करूं लागला. याचे ' पवनविजय ' ' निष्कलंक-प्रबोध ' व ' योगसंग्राम ' असे तीन ग्रंथ आहेत. पैकीं ' योग-संग्राम ' हा या सर्वांत मोठा ग्रंथ होय. यांत भाव, भक्ति, अनुभव वैराग्य वगैरे विषयासंबंधें विचार केला आहे. याचीं अठरा प्रकरणें असून एकंदर ग्रंथसंख्या सुमारें २३०० आहे. हा ग्रंथ यानें शके १६१८ मध्यें श्रावण मासीं पुरा केला. जातीनें यवन असून ह्यानें मराठींत ग्रंथ रचना फार चांगली केली आहे. कोठें कोठें याची भाषा अशुद्ध आहे; तरी गोडी सर्वत्र सारखीच दिसते. वर सांगितलेल्या ग्रंथांखेरीज याचे पुष्कळ अभंगही आहेत. याचा एक अभंग **दादोबांनीं** आपल्या ग्रंथांत दिला आहे. तो असा:—

ऐसें केलें या गोपाळें । नाहीं सोंवळें ओवळें ॥
कांटे केतकीच्या झाडा । आंत जन्मला केवडा ॥
फणसा अंगें करड कांटे । आंत साखरेचे गोटे ॥
ऊंस सर्वां आंगीं काळा । आंत अमृत जिव्हाळा ॥
नारळ वरी तो कठीण । आंत सांठवें जीवन ॥
काळी कस्तुरी दिसती । आंत सुगंध सुटती ॥
मधमाशांची घोंगाडी । आंत अमृताची खाणी ॥
शेख महंमद विलासी । झाला हरिभक्ताचा रहिवासी ॥

---

१ योगसंग्राम.

२ याच अभंगांतील तीन ओळी व पुढें

हिरवेची द्राक्ष घड । रसायेतीं बहुगोड ॥
शेख सुलतान अविंध । त्याच्या हृदयीं गोविंद ॥

असा एक अभंग **रघुनाथशास्त्री गोडबोले** यांनीं शेख **सुलताना**चा ह्मणून दिला आहे.

हा अभंग कवीच्या अंगच्या प्रेमळ भक्तीची व स्वाभाविक स्फूर्तीची खरी साक्ष देत आहे. **प्रेमाबाई** हीहि **तुकारामा**चेच वेळीं झाली असावी. हिनेंही कांहीं पद्यरचना केली आहे. **तुकारामा**चा भाऊ **कान्होबा** याचेही अभंग प्रसिद्ध आहेत. यानें आपल्या अभंगांत आपणास **तुकयाबंधु** असें ह्मणविलें आहे. याखेरीज धामणगांवचे **बोधलेबोवा** हेही याच मंडळींतले होत. यांनीं केलेल्या अभंगांची मध्यें एकदां जाहिरात मात्र पाहिली होती. यावरून यांचीही बरीच कृति उपलब्ध असावी असें वाटतें.

तुकारामाच्याच बरोबरीचा व त्याच्या जन्मकालीं ह्मणजे शके १५३० मध्यें जन्मलेला दुसरा एक महापुरुष यावेळीं प्रसिद्ध होता. याचें नांव **रामदास**. हा **सूर्याजीपंत ठोंसर** नांवाच्या एका गृहस्थाचा मुलगा. याला **गंगाधर** ह्मणून एक वडील भाऊ होता. याचें स्वतःचें खरें नांव **नारायण** परंतु हा रामोपासक असल्यामुळें याला पुढें **रामदास** ह्मणूं लागले. हा आजन्म ब्रह्मचर्य व्रतानें होता. यानें लग्न मुळींच केलें नाहीं. हा आपले लग्नाचे वेळीं अंतरपाट धरला असतां जो निसटून पळून गेला, तो परत संसारांत आलाच नाहीं. घरून निघाल्यावर रानांत जाऊन यानें संन्यास घेतला, व पुढें तो तीर्थयात्रा करण्यास निघाला. यानंतर लोक याला **समर्थ** असें ह्मणूं लागले. यात्रेंत **समर्थां**नीं पुष्कळ ठिकाणें पाहिलीं, व त्यांपैकीं योग्य योग्य अशा ठिकाणीं एकेक खात्रीचा शिष्य ठेवून, आपले मठही जागोजाग स्थापिले. **शिवाजी** राजाची व यांची भेट प्रथम १५७१ सालीं झाली, व तेव्हांच **समर्थांस** राजे यांनीं आपले गुरू केलें. महाराजांस राज्यसाधनाचे कामांत पूर्ण उपदेश **समर्थां**चा असे, व हा यांचा संबंध आमरणांत तसाच होता. **शिवाजी**चे हातून आपल्या भाषेसंबंधीं जीं जीं कृत्यें झालीं, त्या सर्वांचें कारण, **रामदास** होय. **रामदासा**मुळें, **शिवाजी**च्या राज्यांत अनेक विद्वान् ब्राह्मणांस वर्षासनें व दक्षिणा मिळूं लागल्या. आणि त्यांच्या विद्येस उत्तेजन आलें. **शिवाजी** राजाचे झेंडे भगवे

१ धौममहाबळेश्वरवर्णन.

झाले, याचेंही कारण **समर्थच** होत. पूर्वी लोक एकमेकांस भेटले ह्मणजे ‘ जोहार ’ करीत, ते आतांपासून ‘ रामराम ’ करूं लागले. हाही फेरबदल **रामदासानेंच** करविला. **शिवाजीनेंही** महाराष्ट्र भाषेची सेवा फार चांगली केली. भाषेंत जुने व फारशी शब्द फार होते, व दफ्तरांतही तेच चालत. हें बरें नाहीं असें जाणून, **शिवाजीनें** त्याच अर्थाच्या अशा संस्कृत शब्दांचा कोश बनविण्यास सुरवात करविली. हल्लीं हा कोश ‘ राजव्यवहार कोश ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. खेरीज साधेल तेवढी तो देशी भाषेची सेवा करीच. **समर्थांच्या** मार्फत तो अनेक साधुसंतांच्या भेटी घेई, व त्यांस संतुष्ट करी. राजव्यवहारांत देखील मराठी भाषेचा प्रचार यानेंच पाडला. ‘ अखबरनवीस ’ ह्मणून दिनचर्येची कृत्यें लिहिणारा एक कामगार असतो. यानेंही काम मराठींत करावें असें **शिवाजीनें** ठरविलें. **शिवाजीची** ह्मणून खालील कविता ‘ भारतीय अर्वाचीन ’ कोशांत दिली आहे.

सद्गुरू बापा तूं माहेरा । माते तुझाचि उबारा ।
परकी जे भवसागरा । पूर्णोद्धारा स्वामिया ॥
अनन्याच्या प्रतिपालका । दारुण भवभयहारका ।
रक्षा आपुल्या बाळका । नका नका उपेक्षूं ॥
भवसर्पें गुंडाळलें । तेणें मन हें व्याकुळ झालें ।
हित अहित विसरलें । सांभाळीलें पाहिजे ॥
मोकलिलें तुह्मी जरी । निरवावें म्या कवणेंपरी ।
तुह्मावीण गती दूसरी । माते नाहीं दयाळा ॥
शुद्ध करोनिया मन । पूर्ण निजरूप जाणून ।
रामदासीं लोटांगण । **शिवराजानें** घातलें ॥

स्वतः **रामदास** हा साधु कांहीं लोकोत्तर होता. त्याच्या आंगांत मराठ्याचें खरें खरें वारें खेळत होतें. **शिवाजीस** जसा शास्त्रांत तसाच मोठमोठाल्या राजकारणांतदेखील तो मार्गदर्शक होता. याच्याजवळ नेहमीं शिष्यसंमुदाय बराच असे. खेरीज ठिकठिकाणीं याचे मठही असत. त्या मठांत एक एक शिष्य असून त्या शिष्याचीही पुन्हां परंपरा असेच. शिवाय **रामदासाला** त्यावेळच्या इतर सर्व साधूंतही मान फार असे.

आणि ते सर्व त्याच्या विचारानें चालत. तो व त्याच्या वेळचे जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, आनंदमूर्ति, केशवस्वामी, हे चार मिळून यांस ' रामदास ' किंवा ' दासपंचायतन ' असें ह्मणत. यावरून या पंचकडीनें कांहीं विलक्षण कृत्यें केलीं असावीं, असें दिसतें. यांपैकीं एकालाही स्वतःचें कल्याण ह्मणून काडीमात्र नव्हतें. सर्व देशाच्या सेवेला वाहिलेले, आणि दरएकाचा मठ नीट योजून ठिकाणीं स्थापलेला. मात्र दासांच्या मठींत यांच्या गाठीं पडत. यामुळें यांचा व यांच्यामुळें रामदासांचा सर्व राष्ट्रभर दरारा असे, आणि जें काम शिवबालाही ऐखादेवेळीं विचारांत पाडावयाचें, तें यांचे हातून सहज होई. हे व यांचे शिष्य सर्व मराठींत रचना करीत. रामदासानें एकंदर लहान मोठे २० ग्रंथ लिहिले आहेत. व ते बहुतेक हल्लीं उपलब्धही आहेत. या सर्वांत ' रामायण ', ' मनाचे श्लोक ' व ' दासबोध ' हे ग्रंथ फार चांगले असून, त्यांपैकीं शेवटले २ हल्लीं प्रचारांतही बरेच आहेत. रामायणाचीं सर्व कांडें अझून प्रसिद्ध झालीं नाहींत. ह्याची रचना समर्थांनीं ' भुजंप्रगयात ' वृत्तांत केली आहे. ' भुजंगप्रयात ' हें समर्थांचें आवडतें वृत्त दिसतें. ' मनाचे श्लोक 'ही यांनीं याच वृत्तांत रचले आहेत; हे श्लोक सुबोध असून यांत स्वामींनीं मनाला उपदेश केला आहे. हे वाचून यांचा विचार केला तर, कोणत्याही मनुष्याच्या अंतःकरणांत प्रकाश पडेल, अशा रीतीनें यांत विषय लिहिला आहे. यांनीं आपला ' दासबोध ' ग्रंथ अगदीं शेवटीं शेवटीं रचला.[2] ह्याची रचना १५८१मध्यें चालली होती असें दिसतें.[3] याचे एकंदर २० दशक असून, प्रत्येक दशकांत दहा समास आहेत.[4] हा ग्रंथ ह्मणजे एक सर्वोपयोगी ग्रंथ आहे. ग्रंथ ह्मणण्यापेक्षां याला साक्षात् गुरूच ह्मणावें. यांत अगदीं भणंगभिकारी गरीबापासून, तो शिवाजीसारख्या छत्रपतीपर्यंत सर्वांना उपयोगी असा उपदेश केला आहे. यांत नाहीं

१ काव्येतिहास सं. रा. च. नांवें १० २ रामदासचरित्र.

३ दशक ६, समास ४, ओवी ७८.

४ नुकताच २१वा दशक कोणी काढून छापला आहे. पण तो कोणत्या आधारानें छापला हें कळत नाहीं.

असें कांहींच नाहीं. राजकारण आहे, घरसंसार आहे, कवित्व आहे, विद्याभ्यास आहे, सर्व कांहीं आहे. भीक कशी मागावी हें देखील यांत **समर्थांनीं** सांगितलें आहे. कांहीं पुस्तकांच्या वाचनानें मनुष्याचें सर्व पालटतें आणि तो रंकाचा राजा होतो, असें इंग्रज ग्रंथकार ह्मणतात. या ग्रंथाची योग्यता याहीपेक्षां जास्त आहे. याच्या वाचनानें रंकाचा राजा काय, पण नराचा नारायण होईल. इतकेंच नव्हे, तर एकंदर राष्ट्राची उद्धगत होईल. ज्याला **शिवाजी**सारख्या महान् पराक्रमी पुरुषानें आपला गुरु ह्मटलें होतें व ज्याच्या पायावर त्यानें राज्यासुद्धां आपलें देहसर्वस्व वाहिलें होतें, व त्या वेळचे निरिच्छ आणि स्वेच्छाचारी संत पुरुषदेखील आपला मेरुमाणि ह्मणून ज्यापुढें मान वांकवीत, तसेंच ज्याची विशाल बुद्धि आणि ' कर्तुमकर्तुं ' शक्ति पाहून महाराष्ट्रानें ज्याला ' समर्थ ' असें अन्वर्थक नांव दिलें होतें, त्या महाभागाच्या हातून हा ग्रंथ झाला आहे, तेव्हां तो वाईट कसा होईल? यांतला प्रत्येक भाग, यांतलें प्रत्येक वाक्य, यांतला प्रत्येक शद्ब, **समर्थांनीं** मोठ्या विचारानें आणि अनुभवशीरपणानें लिहिलेला दिसतो. हा ग्रंथ समाप्त झाल्यानंतर **शिवाजी** राजे सुमारें पंधरा वर्षांनीं वारले. **शिवबा**पाठीमागें स्वामी फार दिवस राहिले नाहींत. त्यानंतर ते सारा वेळ आपल्या मठींतच असत व फारशी कोणाची भेटही घेत नसत. प्रत्यक्ष **संभाजी** राजे दर्शनास आले असतांही, ' आह्मांस समाधान नाहीं, यास्तव दर्शन घडावयाचें नाहीं. तुह्मीं येऊं नये ' असाच निरोप धाडला. **शिवबाचे** पोटीं पुत्र असा झाला, याबद्दल ते फार कष्टी असत. शेवटीं त्यांनीं **संभाजीस** एक ओंवीबद्ध आज्ञापत्र लिहिलें, तेंही हल्लीं प्रसिद्ध आहे. नंतर लौकरच ह्मणजे शके १६०३ या वर्षीं माघ व० ९ मीस **स्वामींनीं** देह ठेविला. **समर्थांच्या** शिष्य मंडळींत **वेणुबाई**, **आकाबाई** वगैरे शिष्यिणी व व **कल्याणस्वामी**, **उद्धवस्वामी**, **वामनस्वामी**, **अनंतस्वामी**, **राजारामप्रसादी** वगैरे शिष्य फार प्रसिद्ध आहेत. **दासांच्या** पंचायनांतील व शिष्य मंडळींतील बहुतेकजण ग्रंथ रचित असत असें वर आलेंच आहे. पंचायतनापैकीं **जयरामस्वामी** शके १५९४ मध्यें वारले. यांची समाधि **वडगांव** येथें आहे. यांनीं ' शांतिपंचीकरण ', ' सीतास्वयंवर ', ' रु-

क्मिणीस्वयंवर ' वगैरे ग्रंथ रचिले आहेत. खेरीज यांचीं पदेंही उपलब्ध आहेत[१]. केशवस्वामी हे १६९० याच सुमारास वारले असावे, असें दिसतें. यांचे ' एकादशीचरित्र ' व कांहीं पदें याखेरीज ग्रंथ हल्लीं प्रसिद्ध नाहींत. **निरंजनस्वामी** व **आनंदमूर्ति** हे **समर्थांनंतर** बरेच दिवस होते असें दिसतें. पैकीं **आनंदमूर्ति** हे १६१८ मध्यें वारले. या दोघांचींही पद्यें आहेत. आतां पंचायनांतील राहिले **रंगनाथस्वामी**. हे निगडी येथील राहणारे. यांचा जन्म मार्गशीर्ष शु १० शके १५३४ या दिवशीं झाला. यांनीं आपल्या लहान वयांतच सन्यास घेतला. यांस अनुग्रह यांचे वडील **निजानंद**स्वामी यांजपासूनच झाला असें सांगतात. निजानंदस्वामीस—पूर्वाश्रमीचे गोपाळराव यांस—तीन पुत्र होते. पैकीं **रंगनाथ**स्वामी हे मधले होत. यांचा थाट नेहमीं शिपाईबाण्याचा असे. बसावयास घोडा, हातांत भाला, कंबरेला तलवार, व बरोबर असेंच ब्रह्मचारी शिष्यमंडळ अशा रीतीनें ते फिरत. यांनीं, 'बृहद्वाक्यवृत्ति','चित्सदानंदलहरी' वगैरे अनेक ग्रंथ लिहिले आहेत[२]. या सर्वांत यांचा 'वासिष्ठसार' हा ग्रंथ लोकमान्य आहे. मूळ ' योगवासिष्टा ' पैकीं सुमारें २२९ श्लोक निराळे करून, त्यास ' योगवासिष्ठसार ' असें नांव दिलेलें आढळतें. यांपैकीं सुमारें २२१ श्लोकांवर **रंगनाथस्वामींनीं** ओंवीबद्ध टीका केली आहे व यासच त्यांनीं ' वासिष्ठसारटीका ' असें नांव दिलें आहे. हा ग्रंथ एकदां समाप्त झाल्यावर, **स्वामी** वारंवार तपासून, त्यांत अधिकउणें करीत असत, असें त्यांच्या हल्लीं उपलब्ध असलेल्या[३] निरनिराळ्या प्रतींवरून दिसतें. कर्त्यांनीं घेतलेल्या श्रमांचें यांत चीजही चांगलेंच झालेलें आढळतें. ' चित्सदानंदलहरी ' ही गीतेवरील टीका होय. 'ज्ञानेश्वरी'खेरीज मराठींत यापूर्वीं इतकी चांगली

---

१ का. स.,लघुका. माला. ब. भा. अ. को.

२ काव्यसंग्रहांतील 'रुक्मिणीमाला' टीपांवरून ही माहिती दिली आहे. पण पुढें एका ' का. स. हितेच्छु ' नीं हे ग्रंथ या **रंगनाथ**स्वामींचे नसून, यांचा कर्ता **रंगनाथ** पैठणकर होय, अशा अर्थाचा पत्रव्यवहार केला आहे.

३ यो. वा. सा. टी.

टीका कोणी केली नाहीं. हींत विषयाचें निरूपण व भाषासरणी सुबोध करण्याकडे विशेष लक्ष दिलें आहे. रंगनाथस्वामी हे आपल्या वयाच्या ७२व्या वर्षीं ह्मणजे शके १६०६मध्यें मार्गशीर्ष व० ६स निगुणपूर येथें समाधिस्थ झाले. समर्थांस गंगाधरपंत या नांवाचे एक वडील बंधु होते. तेही यांचेच समकालीन. हे आपल्यास रामीरामदास असें ह्मणवीत. यांनीं 'भक्तिरहस्य' व 'सुगमोपाय' या नांवांचे दोन ओंवीबद्ध ग्रंथ रचले आहेत. हे शके १५९९मध्यें समाधिस्थ झाले.

समर्थांच्या शिष्यीणींत आकाबाई व वेणुबाई या दोघींही पद्यरचना करीत. पैकीं वेणुबाई ही मिरजकर देशपांड्यांची कन्या. हिचे जन्मशक व मृत्युशक १५४८ व १५७७ असें आढळतात. हिनें 'निवृत्तिराम' या नांवाचा एक बोधपर ग्रंथ लिहिला आहे. यांत सुमारें पांच हजार ओव्यां आहेत. ही बाई कीर्तनही फार चांगलें करी. शिष्य मंडळींपैकीं सर्वांत विख्यात असा वामन पंडित होय. हा कोरेगांव कुमठें येथील राहणारा. याच्या आईचें नांव लक्ष्मी व बापाचें नरहरि पंडित. याचा जन्म अदमासें शके १५४० चे सुमारास झाला असावा. यानें आपला विद्याभ्यास श्रीक्षेत्र काशी येथें केला. हा चांगला व्युत्पन्न असून दशग्रंथ पढला होता, व त्या वेळच्या सर्व विद्वान्मंडळांकडून पूर्वपक्ष व उत्तरपक्ष करून यानें जयपत्र मिळविलें होतें. हा संस्कृत भाषेंत इतका निपुण होता कीं, साधारण बोलणें झालें, तरीदेखील संस्कृतच बोले. मराठीभाषेंत ग्रंथरचना तर दूरच; परंतु नुसतें भाषणदेखील मराठींत करणें, त्याला कमीपणाचें वाटे; परंतु समर्थांच्या उपदेशापासून ही त्याची बुद्धि पालटली, व तो मराठींत ग्रंथरचना करूं लागला. हा फार चांगला पंडित असल्यामुळें, याची रचनाही फार चांगली उतरली आहे. याची गिरा नांवाची बायको होती. तिला त्यानें ब्रह्मज्ञानाचा उपदेश करण्यासाठीं 'प्रियसुधा' हा ग्रंथ लिहिला. 'भीष्मप्रतिज्ञा' या नांवानें याच्या ज्या कविता हल्लीं उपलब्ध आहेत, त्या त्यानें अगदीं प्रथम रचिल्या असाव्या. यांचे शेवटीं आपल्या

१ भा० अ० को०.

२ वामनपंडितचरित्र.

मातापितरांसंबंधीं माहिती त्यानें दिली आहे. याच्या काव्यांवरून हा कवी पुरा कृष्णभक्त दिसतो. यानें रचलेल्या काव्यांपैकीं बराच भाग कृष्णासंबंधीं आहे. यानें आपल्या कोणत्याही ग्रंथारंभीं गजाननाचें स्तवन मुळींच केलें नाहीं. भगवद्गीतेवर याची ' यथार्थदीपिका ' नांवाची एक प्रसिद्ध टीका आहे. या टीकेच्या आरंभींदेखील गणपतीच्या नांवाचा उल्लेख नाहीं. उलट

जे मंगलाचरणीं । लागती इतर देवतांचे चरणीं ॥
त्यांस भगवंताचे जगद्वंद्य चरणीं । कैचें अनन्यभक्तित्व ॥

अशी ओंवी लिहून, त्यानें आपला प्रतिकूल अभिप्राय प्रगट केला आहे. या ' यथार्थदीपिका ' ग्रंथांत वामनानें आपलें खरें खरें पांडित्य दाखविलें आहे. यांत कोणत्याही वादग्रस्त मुद्यासंबंधें विचार करितांना श्रीमत् शंकराचार्यांपासून तों ज्ञानेश्वर, रंगनाथापर्यंतच्या गीतेवरील सर्व टीकाकारांचें काय काय ह्मणणें आहे, तें सांगून, नंतर विचार केला आहे. यामुळें ही टीका वाचली, ह्मणजे इतर सर्व टीका वाचल्याचें श्रेय येतें. व यांत विषयही करवेल तितका सोपा केला आहे. जें आत्मज्ञान व अद्वैत जाणण्यासाठीं आपल्या तरुण वयांत स्वामींनीं सगळे देश पालथे घातले, व वेदांती, भाष्यकार वगैरेची त्यांनीं सेवा पत्करली, व जें आतां कळत नाहीं, असें वाटून एक वेळ प्रयागांत जलसमाधिही घेण्यास स्वामी तयार झाले, आणि जें ज्ञान शेवटीं त्यांना प्रत्यक्ष ईशदर्शनानें घडलें, तें ज्ञान या ग्रंथांत प्राकृत जनालाही करून घेतां यावें, अशा रीतीनें सांगितलें आहे. गीतेवर असल्या योग्यतेची टीका दुसरी नाहीं, असें सांगतात. या टीकेची एकंदर ग्रंथसंख्या २२००० पेक्षां जास्त आहे. यावरून हा ग्रंथ किती प्रचंड असावा याची कल्पना होईल. हा ग्रंथ इतका चांगला असतांही, त्या वेळच्या पंडितांना तो फारसा आवडला नसावा असें यांतील

वाचोत जे वाचिती । न वाचोत जे वाईट मानिती ॥
संतुष्ट होय एक जगत्पती । या यथार्थ निरूपणें ॥

असल्या उद्गारावरून वाटतें. या टीकेखेरीज 'राजयोग', 'कर्मतत्व',

' तत्वमाला ' वगैरे बरेच अध्यात्मग्रंथ व ' सीतास्वयंवर ', ' कालिया-मर्दन ', ' भामाविलास ', वगैरे चरित्रकथात्मक अनेक प्रकरणें प्रसिद्ध आहेत. इतर ग्रंथांतही जेवढा ह्मणून वेदांतविषय घालतां आला, तितका यानें घातलाच आहे. प्रत्येक काव्यारंभीं एखाद्या दुसऱ्या श्लोकांत पुढील कथानकाचा सारांश सांगण्याची याची वहिवाट आहे. व याची रचना प्राय: अनेक वृत्तात्मक श्लोकांतच आढळते. याच्या श्लोकाइतका गोड श्लोक दुसरा कोणाचा नाहीं. याची धाटणीही मोठी भव्य असते. कोणताही रस घेतला, तरी तो याच्या काव्यांत पूर्णपणें पाहण्यास सांपडतो. शृंगाररसात्मक कित्येक काव्यें यानें फार उत्तम लिहिलीं आहेत. कोणत्याही स्वाभाविक देखाव्याचें किंवा कामी जनाच्या मनाच्या स्थितीचें यथार्थ वर्णन पाहणें झाल्यास, तें याच्या ' रासक्रीडा ' काव्यांत फारच सुंदर तऱ्हेनें दृष्टीस पडेल. या काव्यांत चांदण्यांत गोपींबरोबर केलेल्या रंगविलासाचें वर्णन आहे. हें वर्णन अगदीं थेट इंग्रजी कवींच्या धाटणीवर गेलें असून, अत्यंत मनोहर आहे. इतकेंही असून यांत बीभत्सपणा मुळींच नाहीं. पंडितांच्या काव्यांत बीभत्सपणा अनेक ठिकाणीं आढळतो व कित्येक ठिकाणीं तर अगदीं गरज नसतांही त्याची योजना केली आहे. याच्यासारख्या जाड्या कवीनें व विद्वान् पंडितानें असल्या घाणेरड्या प्रकारांत लवमात्र तरी आनंद मानावा, हें जरा विपरीत दिसतें. तसेंच व्याकरणनियमांकडे जरा दुर्लक्ष आणि शब्दांची प्रासयमकांसाठीं ओढाताण हेंही याच्या सारख्यास शोभत नाहीं, बाकी ज्या रसाचें वर्णन करावयाचें, त्या रसास योग्य अशा वृत्तांचीं योजना करून, यानें आपल्या काव्यास फार शोभा आणिली आहे. यानें मराठींत 'समश्लोकी टीका' किंवा भर्तृहरीच्या 'शतकां'सारखीं जीं भाषांतरें केलीं आहेत, त्यावरून याचें शब्दसामर्थ्य स्पष्ट दिसून येतें. यानें आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत संन्यास घेतला असावा असें दिसतें. याचा जन्मकाल किंवा मृत्युकाल यांपैकीं एकही निश्चितपणें सांगण्यास मार्ग नाहीं. एवढ्या मोठ्या पंडिताच्या मृत्युकालाची अशी अवस्था असावी, हें खरोखरच जरा नवल

आहे. कांहीं पुस्तकांत याचा मृत्युकाल १९९९ दिला आहे, परंतु हा चुकीचा दिसतो! कारण त्यांनें आपल्या ' निगमसार ' नामक ग्रंथाच्या शेवटीं

शके पंधरा शतें पंचाणव । तैं ग्रंथ प्रगटला अभिनव ।

असें लिहिलें आहे. यावरून १९९९ हा या ग्रंथाच्या समाप्तीचा काल दिसतो. आणि ' निगमसारा ' नंतर पंडितांनीं अनुक्रमें ' कर्मतत्व ', ' ब्रह्मस्तुति ', ' समश्लोकी गीता, ' ' गीतार्णवसुधा, ' ' यथार्थदीपिका ' वगैरे ग्रंथ रचले असावे, असें त्या त्या ग्रंथांतील उल्लेखांवरून दिसतें. खेरीज आणखीही ग्रंथ यांनीं यापुढें रचिले असावे. हे ग्रंथ नुसते लिहिण्यासही वर्षेंच्यावर्षें लागतील, मग ते रचण्यास पंडिताला बराच काळ लागला असला पाहिजे हें उघड आहे. अगदीं आलीकडे पंडितांचा ' श्रुतिकल्पलता ' या नांवाचा एक मोठा ग्रंथ सांपडला आहे. हा तर इतर सर्व ग्रंथांहूनही मोठा आहे असें ह्मणतात व हाही ग्रंथ ' निगमसारा ' नंतर रचला गेला असें त्यांचे एक चरित्रकार सांगतात. यावरून त्यांचा काळ १९९९ नंतर बराच पुढें झाला असावा असें दिसतें. एका लेखकानें हा काल १६१९ असावा असें सुचविलें आहे. **वामन** पंडितांखेरीज **समर्थांच्या** शिष्यमंडळांत कवि या नात्यानें **अनंतकवि** इतका दुसरा कोणीही प्रसिद्ध नाहीं. अनंतकवि हा सातारा जिल्ह्यांत राहणारा, परंतु ह्याला **समर्थांनीं निलंगाबादेस** मठ स्थापून दिला होता. यामुळें याचें वास्तव्य तेथें असे. वामनस्वामीप्रमाणेंच याचा जन्म व मृत्यु कधीं झाला, याबद्दल कोठेंही आधार मिळत नाहीं. यांनीं आपल्या ' सुलोचनाख्यान ' या काव्याच्या शेवटीं

सोळाशें निगमावरी शिवमुखें ठेवूनि संख्या गणा

---

१ कविचरित्र, नवनीत.

२ सदर्हू ग्रंथ व वामनचरित्र.

३ वामनपंडितांची समाधि वारणा नदीचे तीरीं सातारा जिल्ह्यांत शिरगांव कोरेगांव मुक्कामीं असल्याचें एका गृहस्थांनीं काव्यसंग्रहांत लिहिलें होतें, पण काळ दिला नाहीं.

असा ग्रंथसमाप्तीचा काल दिला आहे. यावरून हा कवि १६४९ साला-नंतर केव्हां तरी वारला, येवढें मात्र होतें. जन्मकालासंबंधें तर असाही अनुमान करण्यासारखा लेख कोठें नाहीं; परंतु या कवीचा जन्म शके १९८०।८९ चे सुमारास झाला असावा असा विद्वानांचा तर्क आहे हल्लीं या कवीचीं पदें वगैरे मिळून सुमारें अठरा, वीस प्रकरणें प्रसिद्ध आहेत. व त्यांची ग्रंथसंख्या जवळ जवळ दीड हजार आहे. यांच्या सर्व ग्रंथांत 'सुलोचनागहिंवर' हें प्रकरण अगदीं श्रेष्ठ मानलें आहे. याखेरीज 'सीतास्वयंवर', 'अहिमहिआख्यान' 'कुशलवा-ख्यान' हेही ग्रंथ चांगले उतरले आहेत. ह्या कवीचीं आख्यानें बायकांत फार आवडतीं आहेत असें दिसतें. निदान या प्रांतांत तरी बाय-कांना यांच्या गाण्यांपैकीं एखादेंनाएखादें तरी गाणें येतच असते. याचें 'गरुडगर्वपरिहार' हें आख्यान त्यांत विषेशच आवडीचें दिसतें. याची सुबोध रचनाशैली हें या आवडीचें मुख्य कारण असावें. खेरीज याची वर्णन करण्याची शैलीही फार चांगली आहे. जें सांगणें तें उगाच त्रास येई इतक्या पाल्हाळानें न सांगतां, कवीनें फार शैलीनें सांगितलेलें असतें. याच्या भाषेंत परकी भाषांतील शब्द किंवा संस्कृ-तातील मोठमोठे समास मुळींच नाहींत, असें ह्मटलें तरी चालेल. तरी भाषेच्या अंतरंगापेक्षां बहिरंगाकडे याचा भर विशेष आहे. यामुळें काव्यांत क्वचित् दुर्बोधत्व आहे. लेखनशुद्धीच्या मानानें पाहतां हा कवि बऱ्याच कमी योग्यतेचा ठरेल; परंतु याची स्फूर्ति स्वाभा-विक आहे, यामुळें याच्या काव्यांतील बरेच दोष लोपून जातात. वर सांगितलेल्या दोन शिष्यांखेरीज, कल्याण, उद्धव व राजारामप्र-सादी हे तिघे शिष्य पद्यरचना करीत असें दिसतें. यांपैकीं कल्याण, उद्धव या दोघांची हल्लीं पदेंच कायतीं उपलब्ध आहेत. समर्थांनीं आपला 'दासबोध' कल्याणाकडून लिहिला असें ह्मणतात. राजारामप्रसादी हे प्रसादी बोवा या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांनीं कांहीं पदें व 'राम-दासलीला' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे.

१ काव्यसंग्रह, अनंतचरित्र.

येथपर्यंत श्रीसमर्थरामदासस्वामी आणि त्यांचें पंचायतन व शिष्य-मंडळ याविषयीं थोडी उपलब्ध माहिती सांगितली. यावरून समर्थांची वृत्ति सहज लक्षांत येण्यासारखी आहे. राजकारणांत समर्थांनीं केलेलीं कृत्यें एकीकडेच, परंतु आपल्या भाषेच्या संबंधानें पाहतां त्यांनीं केलेली सेवा लक्षांत ठेवण्याजोगी आहे. शिवाजीला यांच्यासारखा मार्गदर्शक गुरु मिळाला हें एक जसें महाराष्ट्राचें, तसें महाराष्ट्र भाषेचेंही भाग्य समजलें पाहिजे.

समर्थांच्या वेळीं वर सांगितलेल्या मंडळीखेरीज आणखीही कित्येक मंडळी मराठींत ग्रंथरचना करीत असे. या सर्वांत विठ्ठलकवि हा फार प्रसिद्ध आहे. 'विठ्ठल' या नांवाचे आपल्या महाराष्ट्रांत आजपर्यंत एकंदर पांच कवी होऊन गेले. विठ्ठल दीक्षित, विठ्ठल केरीकर, व विठ्ठल बीडकर; आणि शिवाय दोन.[1] या तिघांपैकीं निश्चयानें अशी कोणाच्याच जन्मवृत्ताची माहिती सांगतां येत नाहीं. पहिल्या दोघां-संबंधानें तर ते अमुक सुमारास असावे, असेंही निश्चितपणें सांगतां येण्यासारखा आज उपलब्ध आधार नाहीं. पहिल्या विठ्ठलाचा 'भगवद्गीते' वरील एक सुंदर कटाव प्रसिद्ध आहे. याच्या शेवटीं 'अभीष्ट वितरण दीक्षित विठ्ठल दीक्षित पुंडलिक' असा उल्लेख आहे, आणि एवढ्यावरून ह्याचा कर्ता कोणी 'विठ्ठल दीक्षित' असें मानलें आहे; पण या उल्लेखावरून 'विठ्ठल' हें या स्थळीं कर्त्याचेंच नांव असावें, असें स्पष्ट होत नाहीं. आणि तसें जरी असलें तरी, हा विठ्ठल अमृतरायानंतरचा असावा असें कटावावरून वाटतें.

दुसरा विठ्ठल ह्मणजे विठ्ठल केरीकर. याचें पूर्ण नांव विठ्ठल नर-सिंह नाईक असें होतें. हा कोणी मंगीश स्वामींचा शिष्य होता. गोमांतकाकडे हा फार जाडा विद्वान् असून, यानें काशीपर्यंत नांव मिळ-विलें होतें. परंतु कवि या नात्यानें हा चांगला विद्वान् दिसत नाहीं. याचीं 'वामन चरित्र', 'शुकरंभासंवाद' वगैरे तीन चार बारीक-सारीक प्रकरणें प्रसिद्ध आहेत. हा सोहिरोबानाथाच्या वेळचा ह्मणजे

---

१ विठ्ठल कृष्ण, गोकर्णमाहात्म्याचा कर्ता, १७९३; व विठ्ठल पद्यकार.

अगदीं आलीकडला असावा असें वाटतें. मोरोपंतांच्या ' सांगावें ' ' कां गावें ' ' देवरायाला ' ' दे वरा याला ' अशा ठरीव यमकांपैकीं हीं कांहीं यमकें याच्या आर्यांत दृष्टीस पडतात, हेंही याच्या कालाचा विचार करतांना लक्षांत धरण्यासारखें आहे. कदाचित् माधवराव पेशव्यांचे वेळीं पुण्यांत विठ्ठल वकील होता, तो हाच असण्याचा संभव आहे. तिसरा विठ्ठल ह्मणजे विठ्ठल बीडकर. हा बीड परगण्यांतील गौरीपूर या गांवचा राहणारा. यानें आपल्या ग्रंथांत ठिकठिकाणीं आपली हकीगत बरीच दाखल केली आहे. यावरून हा रामदास वगैरे मंडळींच्या वेळचा किंवा जरा नंतर असावा असें दिसतें. याचे जन्म व मृत्युशक माहित नाहींत; तरी यानें बऱ्याच प्रकरणांचे शेवटीं त्या प्रकरणसमाप्तीचा काल घातला आहे, त्यांवरून याचा काल मात्र निश्चित होतो. याच्या ' रुक्मिणीस्वयंवरा ' वर १५९६ हा शक दिला आहे. याच्या आधींचा शक कोणत्याच प्रकरणांवर नाहीं. याचीं ' रुक्मिणीस्वयंवर ', ' बिल्हणचरित्र ', ' सीतास्वयंवर ' वगैरे आठ दहा प्रकरणें आणि बरींचशीं पदें इतका ग्रंथ उपलब्ध आहे. या सर्वांची मिळून ग्रंथसंख्या एक हजाराच्या आंतबाहेर एवढीच होईल. ' निबंधमालें 'तील एका पत्रव्यवहारांत हा कवि अनेक वृत्तांत काव्यें रचणारांत पहिला असावा, असें ठरविण्याचा यत्न केला आहे. परंतु मुक्तेश्वराचा जन्मशक १५३० हा सर्वमान्य आहे. तेव्हां हा मुक्तेशाच्या आधींचा धरला तर, यानें आपलें ' रुक्मिणीस्वयंवर ', वयाच्या सासष्टाव्या वर्षांनंतर लिहिलें असें होतें. या प्रकरणानंतरचीं अशीं ' सीतास्वयंवर ', ' रसमंजरी ' वगैरे प्रकरणें आहेतच. ' द्रौपदीवस्त्राहरणा 'वरचा समाप्तिकाल शके १६०२ दिला आहे. यावरून हें काव्य ७२व्या वर्षांनंतर रचलें असें होतें. आतांही अशी रचना असणें अगदींच अशक्य ह्मणतां येत नाहीं, हें खरें आहे; तरी कवीच्या भाषाशैलीवरून काव्यांत

बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासिचा वायदा

असलीं कूटें रचण्याच्या हौसेवरून, व बंध वगैरे घा-

लण्याच्या प्रघातावरून पाहतां, हीं काव्यें साठी उलटून गेलेल्या वयांतल्या मनुष्यानें रचिलीं असावी, असें धरण्यास मन घेत नाहीं. हीं चित्रकूटात्मक काव्यरचनेची वेडी हौस कवीला बरीच होती असें दिसतें. आपल्या काव्यांत यानें बंधरचनाही पुष्कळच केली आहे. ही रचना थोडीशी चित्ताकर्षक आहे, हें कबूल केलें पाहिजे. यावरून कवीची विद्वत्ता किती होती, व भाषेंतील शब्द त्याच्या सेवेंत किती तत्पर होते हेंही चांगलें दिसतें. याच्या काव्याला विद्वानापेक्षां धनवानाची उपमा चांगली शोभेल. यानें बांधलेल्या मंदिरांत 'छत्र' 'चामरें' आहेत, 'व्यजनें' आहेत, 'धनुर्बाण' आहेत. मंदिराच्या क्रीडाभुवनांत 'मयूर हंसा'दि सुंदर प्राणी आहेत. जिकडे तिकडे 'अष्टदल' 'द्वादशदल' वगैरे अनेक तऱ्हांचीं शोभिवंत 'कमलें' आहेत. शालेंत 'अश्व' 'उष्ट्र' वगैरे थोर थोर जनावरेंही आहेत. याची संपत्ति अपार आहे. परंतु त्यांत 'सौख्य' किंवा 'रस' ह्मणून जें कांहीं अवश्य लागतें, तेवढें मात्र कमी आहे. यामुळें अशा कवींची गणना दुसऱ्या वर्गांतच केली पाहिजे.

या विठ्ठलाच्या काळीं किंवा जरा आलीकडे पलीकडे **त्र्यंबक** कवि, **सदाशिव** कवि, **जनार्दन, गणेशराय, कृष्णानंद, साम्राज्यवामन, विश्वनाथ** वगैरे मंडळी असावी असें वाटतें. **त्र्यंबक** व **सदाशिव** हे कदाचित् जरा पूर्वीचेही असण्याचा संभव आहे. सदाशिव कवि हाच उद्धव गोसाव्याचा बाप असें कांहीं ठिकाणीं आढळतें. परंतु याच्या 'उमाविलासां'तील अनेक पद्यांचें, वामनाच्या कांहीं पद्यांशीं फारच साम्य दिसून येतें. या दोघांच्या एवढ्या साम्यावरून यानें वामनाचे ग्रंथ कदाचित् पाहिले असावेत, असा संशय येतो. त्र्यंबककवीनें आपल्या एका पदांत

'धांव एकाकी एका जनार्दना। पावतो त्र्यंबका शीणरे॥

असें ह्मटलें आहे. यावरून हा **नाथांचा** शिष्य असावा. या दोघांची-

---

१ हीं सर्व नांवें याच्या बंधांचीं होत.

ही पदें बरींच आहेत. **गणेशनाथाची** नुसतीं कांहीं पदेंच उपलब्ध आहेत. हा **शिवाजीचे** अमदानींत असावा. **जनार्दन** व **कृष्णानंद** हे **वामनाच्या** नंतरचे असे दिसतात. पण तसा स्पष्ट उल्लेख नाहीं. कृष्णानंदाचा ' राधाविलास ' व कांहीं पदें आहेत. **जनार्दनकृत** 'रामस्तुति ', ' दामाजीपंतचरित्र ', ' दानावर्ताख्यान ' वगैरे हल्लीं छापिलीं आहेत. कदाचित् हा कवि बराच आलीकडचाही असेल. याच्या गीती मोरोपंताच्या धाटणीवर बऱ्याच धांवतात. **साम्राज्यवामन** व **विश्वनाथ** हे दोघेहीं **वामनाचे** शिष्य होत. **साम्राज्यवामनानें** वयाच्या पंचविसाव्या वर्षीं **वामनाचा** गुरूपदेश घेतला असें दिसतें. याचीं ' सुदामचरित्र ', ' राजयोग ', ' ब्रह्मोपदेश ' वगैरे बरींच प्रकरणें प्रसिद्ध आहत. **वामनाच्या** ' अनुभूतिलेशा ' वरही याची प्राकृत टीका आहे. **विश्वनाथ** यानें

विश्वनाथ निजार्किंकर वामनाचा

असें स्पष्ट ह्मटलें आहे. याचेंही एक ' सुदामचरित्र ' आहे. या दोघांची भाषासरणी अगदीं थेट **वामनासारखी** आहे. व एकंदर प्रकणाची पद्धतिही तशीच आहे. यांच्या काव्यावरून यांनीं आपल्या गुरूचा कित्ता नीट वळविलेला दिसतो.

येथपर्यंतच्या काळास साधारणपणें **शिवाजीचा** काल ह्मटलें असतां चालेल. या काळांत मराठी भाषेची सेवा कशी होत गेली, हें वर सांगितलेंच आहे. **शिवाजीनें** जसें राज्य मिळविण्याकडे श्रम केले, तसेच भाषा सुधारण्याकडेही केले, हें उघड आहे. या कालीं भाषेंत चांगले कवी निर्माण होऊं लागले होते. मोठाल्या विद्वानांचें लक्षही इकडे लागत चाललें होतें. राजदरबारीं ही भाषा सुरू झाली होती. एकंदरींत चांगला काळ येण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं होतीं. परंतु मराठ्यांना यापुढें मिळावी तशी स्वस्थता मिळाली नाहीं. **शिवाजीचे** पोटीं **संभाजीसारखे** पुत्र झाले. यामुळें राज्यांत बखेडे माजून, पुन्हां मराठ्यांच्या तक्ताचा पाया डळमळूं लागला. या मानानें भाषेवरही परिणाम झाला. पंडित मंडळींत, **शिवाजीनंतर** बरेच दिवस सांगण्या-

सारखा कोणी कवि झाला नाहीं. शिवाजीनंतर श्रीधरस्वामी हे उदयास आले; परंतु हे पंडित नव्हत. हे संन्यासी होते. यांचा जन्म शके १६०० मध्यें झाला. मागें सांगितलेल्या रंगनाथ स्वामींचे हे पुतणे होत. यांचा जन्म पंढरपुराजवळ नाझरें या गांवीं झाला. यांची वृत्ति नेहमीं उदासीन असे. हे चौदा वर्षांचे असतांच यांनीं संन्यास घेतला! व तेव्हांपासून ते तीर्थयात्रा करीत हिंडत. पण संन्यास घेतल्यानंतर यांचें राहण्याचें ठिकाण फार करून पंढरपूरच असे. यांच्या बापाचें नांव **ब्रह्मानंदस्वामी**–पूर्वाश्रमींचे **यादवराव**–व आईचें नांव **सावित्री** असें होतें. यांनीं 'शिवलीलामृत', 'पांडवप्रताप', 'हरिविजय', 'रामविजय' वगैरे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. हा ग्रंथरचनाही फार लहानपणीं करूं लागला असावा, असें दिसतें.

> शके सोळा शत चोविस। विलंबनाम संवत्सर सुरस ॥
> शुद्ध पूर्णिमा फाल्गुनमास। रविवारी ग्रंथ संपला ॥

असें 'शिवलीलामृताचे' शेवटीं आहे. यावरून यानें हा आपला जगन्मान्य ग्रंथ, आपल्या चोविसाव्या वर्षीच पुरा केला असें होतें. यापुढें त्यानें 'हरिविजय', 'रामविजय' रचले असावे. 'पांडवप्रताप' हा यांच्या मागून ह्मणजे १६३४ त पुरा झाला, असें त्यांत लिहिलें आहे. याचे सर्व ग्रंथ ओंवीबद्ध आहेत. हे संस्कृतांतील पौराणिक ग्रंथास धरून लिहिले असल्यामुळें, यांच्या ठायीं लोकांची भक्तीही विशेष आहे. भाविक लोक श्रीधराचे ग्रंथ फार मनोभावेंकरून वाचतात. याच्या काव्यांत प्रायः सर्व रसांचा भरणा आहे. परंतु कठीण किंवा जाडे शब्द फारच थोडे आढळतात. भाषा शुद्ध, सरणी सुबोध व विषय गोड, यांमुळें हे ग्रंथ वाचण्यासही सोपे आहेत. खेरीज याचीं वर्णनें स्थलविशेषीं फारच उत्तम असून, कोमल आहेत. याच्या भाषेंत एका तऱ्हेचें जें मार्दव दृष्टीस पडतें, तें इतरांच्या लेखणींत आढळत नाहीं, असें ह्मटल्यास चालेल. याच्या ग्रंथांचा पाठ घरोघर जास्त झाल्यानें, व जात्याच याच्या शब्दांत माधुर्य असल्या कारणानें, श्रोत्यांच्या तोंडांतही चांगली भाषा यावी,

हा याच्या ग्रंथांचा सहज परिणाम दिसतो. याच्या भाषेंत परकी शब्दही फारच क्वचित् आढळतात. यामुळें याची भाषा निर्भेळ सुवर्णाप्रमाणें समाधानकारक अशी आहे. एका गृहस्थानीं * तर या कवीसारखा प्रेमळ कवि सगळ्या महाराष्ट्रकवींत झाला नाहीं, असें ह्मटलें आहे. वर सांगितलेल्या ग्रंथांखेरीज 'ब्रह्मोत्तरखंड', 'जैमिनीअश्वमेध', 'पांडुरंगमाहात्म्य' व 'काशीखंड' हे ग्रंथ यानें रचिले आहेत, असें 'कविचरित्रां'त व 'नवनीतां'त सांगितलें आहे. परंतु 'काशीखंडा'चे प्रत्येक अध्यायाचे शेवटीं, तो ग्रंथ **शिवदासगोमा** यानें रचिला असा उल्लेख आहे. यावरून हा **श्रीधराचा** खास नाहीं हें उघड आहे. हा आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षी ह्मणजे शके १६९० मध्यें समाधिस्थ झाला. **किंकर** हा कवि याच सुमारास होता. याचें खरें नांव कांहीं निराळें असावें असें दिसतें. पण यानें आपल्या काव्याच्या शेवटीं नुसता 'कविकिंकर', याच अक्षरांनीं स्वनामाचा उल्लेख केला आहे. याचे जन्म व मृत्युशकही कोठें आढळत नाहींत. ह्यानें गंगेच्या कांठीं बैजापूर हें आपलें राहण्याचें गांव असें ह्मटलें आहे. हा कवि १६१० या सुमाराचा असावा. याच्या 'शुकरंभासंवाद' या काव्याच्या शेवटीं १६३६ समाप्तिशक दिला आहे. यावरून वरील अनुमान खरें दिसतें. यानें 'द्रौपदीवस्त्राहरण', 'सुदामचरित्र' हीं प्रकरणें अनुक्रमें १६३७-३९ सालीं पुरीं केली. याची रचना अनेक वृत्तात्मक आहे. व साधारणपणें या कवीला दुसऱ्या वर्गातल्या कवींपैकीं समजण्यास हरकत नाहीं. यानें 'महिम्नस्तोत्रा'चें भाषांतर व आणखीही लहानसहान प्रकरणें रचिलीं आहेत. 'गरुडगर्वविमोचन' हें याचें शेवटलें काव्य दिसतें. निदान यानंतरचें असें याचें प्रकरण हल्लीं उपलब्ध असल्याचें माहित नाहीं. हें काव्य यानें १६६०मध्यें संपविलें. **शिवदीन** केसरीचा शिष्य (?) **मालोनाथ,**

---

* Acworth on Marathi Language.

'रुक्मिणीस्वयंवरा 'चा कर्ता मुद्गलकवि, 'दानव्रत' 'गंगारत्नमाला' इत्यादि प्रकरणांचा लेखक **नरहरि**, तसेंच **बाळकृष्ण**, **बस्वलिंग**, **सुभानराव** वगैरे कवी याचे समकालीन असावेत. यांपैकीं मुद्गलभट्ट हा रामोपासक होता. यानें 'मुद्गलशतक' ह्मणून रामस्तुतिपर आर्या व 'मुद्गलरामायण' वगैरे ग्रंथ केले आहेत. याचीं काव्यें सुबोध असून, त्यांत करुणरस चांगला उतरला आहे असें ह्मणतात. याचीं पदें आलीकडे प्रसिद्ध झालीं आहेत.

हे वर सांगितलेले कवी पेशवाईबरोबरच उदयास आले. ह्मणजे हे थोरले **बाजीराव** साहेबांच्या कारकीर्दीतले कविमंडळ दिसतें. यावेळीं आपणांमध्यें गद्यग्रंथांची रचना होण्यासही चांगली सुरुवात झाली होती. **शिवाजी** महाराजांनीं रायगडास गादी स्थापल्यापासूनच गद्यग्रंथास सुरुवात झाली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. रोजची दिनचर्येची हकीगत, यादी, करारपत्रें वगैरे सर्व एका अर्थानें ग्रंथच ह्मटले पाहिजेत. असें सांगतात कीं, राज्याचा हिशोब ठेवण्याची पाळी आली, तेव्हां तें काम शिकविण्यास दिल्लीहून दोन मुसलमान आणावे लागले. ह्मणजे आपल्या मंडळांत असलीं कामें लोक कधींच विसरून गेले होते. यामुळेंच जमाखर्चांत मुसलमानी शब्द फार आले, व ते पुढें पुष्कळ काळपर्यंत तसेच राहिले. पद्य ग्रंथांपेक्षां गद्य ग्रंथांवरूनच त्याकाळीं लोक कोणत्या तऱ्हेची भाषा वापरीत असावे, याची कल्पना चांगली होते. जुन्या बखरींवरून लोकांच्या बोलण्यांत जुन्या काळीं तीन हिस्से शब्द मुसलमानी व एक हिस्सा मराठी असे असावेत असें दिसतें. तसेंच लिहिण्यांत काय आणि बोलण्यांत काय, जाडे जाडे संस्कृत शब्दही बरेच असावेसे दिसतात. हल्लीं उपलब्ध असलेल्या गद्यग्रंथांपैकीं **कृष्णाजी** अनंत सभासद यांनीं रचिलेलें 'शिवछत्रपती'चें चरित्र हा ग्रंथ सर्वांत जुना आहे. **सभासद** हे **राजाराम** महाराजांचे पदरीं चिटणीसीकडील व कोठीकडील कामगार होते. यांचे वंशज हल्लीं कोल्हापुरांत आहेत. **कृष्णाजी**पंतांनीं आपली ग्रंथरचना **राजाराम** महाराजांचे आज्ञेवरून केली. ग्रंथ शके १६१६ मध्यें चंदिचंदावरास

लिहून पुरा झाला. संवत्सर, वगैरेवरून पाहतां, हा शक १६१९ असावा.[1] जवळ असलेलें कागदपत्र, करारनामे वगैरेच्या आधारें ही बखर रचिली असल्यामुळें, ती फार विश्वसनीय आहे. शिवछत्रपतींचें चरित्र कोणासही लिहिणें असल्यास, आमच्या भाषेंतील मुख्य आधार 'सभासद-कृत चरित्र' होय. दुसरा आधार अजूनपर्यंत पुरा छापलेला तरी नाहीं.[2] या बखरीची भाषा नीट आटपसर व मुद्देसूद आहे. लेखक चिटणिसी-कडील असल्यामुळें काम चांगलें झालें आहे यांत नवल नाहीं. परंतु भाषा जुन्या काळची असल्यामुळें, तींतील वाक्यरचनेंत व हल्लींच्या प्रचारांतील वाक्यरचनेंत फार अंतर आहे. यापूर्वी भाषा कोणत्या तऱ्हेची वापरीत असत, हें कळण्यास आज साधनें उपलब्ध नाहींत. धर्मासंबंधीं पंढरपूर हें आद्यस्थान होऊन; तेथील भक्त मंडळीनें पूर्वीच्या काळचे ग्रंथ मिळवून जतन करण्यास जसे अविश्रांत श्रम घेतले, तसे राज्यकारस्थानांत कोणतेही ठिकाणीं झाले नाहींत. पूर्वी ज्या पक्षीं देवगिरीकरांची गादी गाजत होती, त्यापक्षीं हकीगती वगैरे त्यावेळीं लिहिल्या गेल्या असल्या पाहिजेतच. परंतु त्यांपैकीं आज कांहींएक मिळत नाहीं. यासाठीं वरील सभासदांच्या बखरीसच गद्यग्रंथांतलें आद्यस्थान दिलें पाहिजे. यानंतरचे, कोल्हापूरचे संभाजीराजे यांनीं आपल्या प्रधानास सांगितलेलें 'आज्ञापत्र' प्रसिद्ध आहे. याचीं नऊ प्रकरणें असून, त्यांत राज्यकारस्थानासंबंधीं फार चांगला मजकूर आला आहे. हें सुमारें शके १६३८ मध्यें रचलें आहे. परंतु हें कोणी व कोठें लिहिलें हें नीट कळत नाहीं. यापुढीलही बखरी बऱ्याच आहेत; परंतु त्या नक्की अमक्यानेंच लिहिल्या असाव्या, असें त्यावरून सांगतां येत नाहीं. कारण, बहुतेक बखरी एकानें दुसऱ्यास लिहून कळविलेल्या पत्राचे थाटावर रचिलेल्या असतात. यांत पत्राचा ह्मणजे बखरीचा लेखक, व कोणासाठीं लिहिलें तो, या दोघांचींही नांवें आरंभीं दिलेलीं असतात. परंतु तीं नेहमीं खरीं असतातच असें नाहीं. पुष्कळ वेळां लेखक कोणती तरी दोन काल्पनिक नांवें कल्पून, बखर लिहितो. यामुळें लेखक कळत नाहीं.

---

१ काव्येतिहाससंग्रह. २ विविधज्ञानविस्तार.

मात्र यापुढील पत्रव्यवहार, यादी, मेस्तकें वगैरे अनेक प्रसिद्ध झालीं आहेत, व त्यांतही कांहीं कांहीं लेखकांची विशेष शैली नजरेस येते. या कालाचे सुमारास अमृतराय व अंबिये हे प्रसिद्धीस आले. दोघेही साधु असून विरक्त असत. अमृतराय हे औरंगाबादेकडे मोंगलाईंत नोकर होते; परंतु मध्वमुनींच्या उपदेशावरून यांनीं संन्यास घेतला व काव्य करूं लागले. यांच्या आईचें नांव उमा व बापाचें नांव शंकर. शंकरराव हे जातीचे ब्राह्मण. हे कोणी व्युत्पन्न पंडित होते असें नाहीं. अमृतरायांची बहुतेक कविता कटावात्मक आहे. हल्लीं यांचे सुमारें पन्नास साठ कटाव प्रसिद्ध झाले आहेत, व खेरीज यांचा पदसंग्रहही बराच आहे. यांची भाषा सरस व प्रौढ अशी आहे. यानीं आपल्या काव्यांत हिंदी व संस्कृत शब्दांची योजना मोठ्या चतुराईनें करून, काव्यास वैचित्र्य आणलें आहे. यांच्या कटावांत प्रसाद ओतप्रोत भरलेला आढळतो. चांगल्या कुशल चिताऱ्यानें सहज कुंचला फिरविला, तरी रंग मनोहर खुलतो, तसेंच यांच्या कटावाचें आहे. कटावांत कथानकाच्या गोडीपेक्षां कवीच्या करामतीनेंच वाचकाचें मन दंग होऊन जातें. नुसतें जेवणाचें किंवा अलंकारांचें वर्णन–ह्मणजे त्या त्या वस्तूंची एक लांब यादच ह्मणावयाची–पण ही याद करतांना देखील यानीं आपलें अमूल्य चातुर्य प्रगट केलें आहे. यांची सर्व कविता ‘ कडाका ’ छंदांत आहे, व यांत प्रासानुप्रासांची जुळणी अशी मोहक रीतीनें केली आहे कीं, एखादेवेळीं अर्थ न कळला, तरी देखील मनुष्य त्या नादावरच डुलूं लागतो. हे स्वतः फार हुशार पंडित होते. संस्कृत मराठी व हिंदी या तिन्ही भाषांचें त्यांना फार उत्कृष्ट ज्ञान होतें. मराठीप्रमाणेंच यानीं हिंदींतही रचना केली आहे. हे नेहमीं कीर्तन करीत असत. वक्तृत्वाचे कामांत ते वाचस्पतीच होते. यांचा चेहरा भव्य असून, आवाजही मधुर असे. आणि कीर्तनांत हे स्वतः रचलेले कटाव खड्या स्वरानें ह्मणत, यामुळें यांचें कीर्तन लोकांना फार आवडे. खुद्द नानासाहेब पेशव्यांचीही यांच्या कीर्तनांवर फार भक्ति होती, असें सांगतात.

---

१ अमृतरायकृत कवितासंग्रह.

हे मोंगलाई अमलांत राहिल्यामुळें, जात्याच मोठे खुशालचंद असत व यांची राहण्याची तऱ्हाही मोठी थाटाची आणि श्रीमंतीची अशी असे. यांच्या या वर्तनक्रमाची प्रतिभा यांच्या काव्यांतही फार स्पष्ट उठली आहे. आणि यामुळेंच यांच्या काव्याला एक प्रकारचा मोहकपणा आला आहे. हे शके १६७९ चैत्र शु० ६ समाधिस्थ झाले. सोहिरोबानाथ अंबि यांचा प्रकार यांच्या अगदीं उलट आहे. सोहिरोबा हे सावंतवाडीकडील राहणारे; यांचा जन्म शके १६३६ मध्यें झाला व बरेच दिवस सरकार-नोकरी केल्यावर, वयाच्या ३९व्या वर्षी यांनीं सन्यास घेतला. सन्यास घेतल्यानंतर ते अगदीं एकांतवासांत काळ काढीत. व फार गरीबीनें राहत. यांनीं पदें वगैरे बरींच केलीं आहेत; व शिवाय अभंग, सवया मिळून एकंदर पांचसातशें चुटके प्रसिद्ध आहेत. यांचे 'अक्षय्यबोध' नांवाचा पारमार्थिक बोध व 'महदनुभवेश्वरी' 'अद्वयानंद' वगैरे कांहीं ग्रंथ प्रसिद्ध आहेत. हे बहुतेक ग्रंथ यांनीं आपल्या उत्तरवयांतच रचिले असावे असें दिसतें. हे ग्रंथ बरेच मोठे असून यांतील विषयही चांगले आहेत. यांची एकंदर मिळून ग्रंथसंख्या जवळ जवळ वीस हजारांवर आहे. यांची वृत्ति नेहमीं उदासीन असून, ते निरिच्छ व निस्पृह असत. [illegible]च्या निस्पृहतेबद्दल पुष्कळ आख्यायिका प्रचारांत आहेत. एकेवेळीं जि[illegible]दादा [illegible] यांचे मार्फतीनें शिंदे सरकारच्या प्रांतांत यांचें माहात्म्य फार होतें. हे शके १७११ मध्यें परलोकवासी झाले. पंढरीच्या वारकरी मंड[illegible] या काळीं महिपतराव बाबा प्रसिद्ध होते. महिपतिबाबा हे राहुरी तालुक्यांतील ताहराबादचे राहणारे. ताहराबादेस दादोपंत ह्मणून ऋग्वेदी ब्राह्मण होता. त्याला फार दिवस पुत्रसंतान नव्हतें. पुढें शके १६३७ सालीं दादोपंताचे वृद्धापकाळांत त्याला पुत्र झाला. त्याचें नांव त्यानें महिपति ठेविलें. हा फार हुशार व बुद्धिवान् होता. हा कुलकर्ण्याचें काम करीत असे. एक दिवस देवपूजा करीत असतां, याला सरकारचे लोक कांहीं टाकून बोलले. तें त्याला सहन न होऊन, त्यानें आपली लेखणी श्रीपांडुरंगाचे चरणावर ठेविली, आणि 'आजपासून

१ सोहिरोबानाथकृत पदें.

मी गांवकृत्यासंबंधीं लेखणी हातीं धरणार नाहीं ' अशी त्यानें शपथ वाहिली, व तो भक्तिमार्गांत शिरला. यानें बरेच ग्रंथ लिहिले आहेत. यानें सर्व संतांचीं चरित्रें वर्णन केलीं आहेत. यासंबंधीं याचे एकंदर चार ग्रंथ आहेत. 'संतलीलामृत',' संतविजय',' भक्तविजय'व' भक्तलीलामृत'. ' संतलीलामृत ' हा ग्रंथ यानें १६७९ मध्यें पूर्ण केला. यांत सुमारें ३९ अध्याय असून चाळीस संतांचें वर्णन आलें आहे. ' भक्तविजय ' हा ग्रंथ यानें १६८४ मध्यें वैशाखमासीं पुरा केला. याचे ५७ अध्याय आहेत. यांत साठांपेक्षां जास्त चरित्रें आलीं आहेत. ' भक्तलीलामृत ' हा या सर्व ग्रंथांपैकीं शेवटला ग्रंथ असावा. हा ग्रंथ शके १६९६मध्यें संपूर्ण झाला. यांत

> संतांचीं चरित्रें व्हावया प्रख्यात । युक्ती केली पंढरीनाथें ।
> मजपुढें करोनि निमित्त । भक्तविजयग्रंथ वदविला ॥
> दुसरा संतलीलामृत सार। त्यांत हीं चरित्रें वर्णिलीं फार।
> परि आणीक कथा राहिल्या अपार। मग रुक्मिणीवरें आज्ञापिलें॥
> ह्मणोनि भक्तलीलामृत जाण। ग्रंथ आरंभिला दुसऱ्यानें।

असें हा ग्रंथ रचण्याचें कारण सांगितलें आहे. याचे अध्याय ५१ आहेत. पण इतर ग्रंथांपेक्षां यांत चरित्रें मात्र जास्त आहेत. आज जी आपणांस महाराष्ट्र कवींविषयीं माहिती मिळते, तींतील बराच हिस्सा महिपतबावांमुळेंच मिळतो, हें उघड आहे. यानें शेंकडो संतांचीं चरित्रें मिळवून लिहून ठेवलीं आहेत, हे याचे आपणांवर फारच मोठे उपकार होत. इतका दांडगा चरित्रलेखक दुसरा कोणत्याही भाषेंत झाला असेल, असें वाटत नाहीं. एका कवडीच्या देखील लाभाची आशा न धरतां, इतक्या कवींचीं चरित्रें मिळवून, त्यांचें टांचण करणें; व ती लिहून वर सांगितलेल्यांसारखे चार अमूल्य ग्रंथ निर्माण करणें, हें काम कांहीं साधारण श्रमाचें नव्हे. याला खरोखरच महिपतीसारखा आपलें सर्वस्व खर्ची घालणाराच मिळाला पाहिजे. आणि महिपतीनें आपलें सर्व आयुष्य यांत खर्च केलें, ह्मणूनच त्याच्यानें तरी हें काम उरकलें. ' भक्तविजयग्रंथांत, ' हा ग्रंथ उत्तरदेशचा नाभाजी यानें केलेले

' संतचरित्र ' व मानदेशचा उद्धवचिद्घन यानें केलेलें ' भक्तचरित्र हे ग्रंथ आधार धरून लिहिला असें त्यानें ह्मटलें आहे. उद्धवचिद्घनाविषयीं माहिती मागें आलीच आहे. नाभाजी हा जातीचा डोंब. हा परमेश्वराचा मोठा भक्त होता. याचें चरित्र महिपतीनें दिलें आहे. ह्यानें आपला ग्रंथ ग्वालेरी भाषेंत लिहिला. मूळग्रंथ, ' छपया ' किंवा ' दोहरे ' या चालीवर असावा. नाभाजीचा ग्रंथ पहावयास मिळाला नाहीं, यामुळें त्यानें आपली माहिती कशी गोळा केली, हें कळत नाहीं. ' भक्तलीलामृत ' ग्रंथ ' भक्तविजया 'च्या मागाहून लिहिला. परंतु त्यांत उद्धवचिद्घनाचें नांव नाहीं. तो नाभाजी च्या आधारानें लिहिला आहे. यावरून नाभाजीचा ग्रंथ चांगला व विश्वसनीय असावा असें दिसतें. तसेंच नाभाजीचा किंवा कोणाचाही ग्रंथ पुढें ठेवून त्याचा तर्जुमा मराठींत भराभर लिहून टाकला, असें महिपतीनें केलें नाहीं. तो ह्मणतो—

संतांचीं चरित्रें संपूर्ण । एकदांची नाकळती जाण ॥
जेव्हां जी झाली आठवण । तीं चरित्रें लिहून ठेविलीं ॥

यावरून बावांनीं निरनिराळीं चरित्रें लिहून ती एके ठिकाणी ग्रथित केलीं व मग त्यांचा ग्रंथ तयार केला असें होतें. तसेंच नाभाजी हा उत्तर हिंदुस्थानांतला मनुष्य. त्याला महाराष्ट्रांतल्या विष्णुदासाबद्दल माहिती नीट असणार नाहीं, असें जाणून महिपतीनें ती माहिती स्वतः मिळविली होती, ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. नाहींतर ' महाराष्ट्राचा इतिहास ' किंवा ' हिंदुस्थानांतील वनस्पती ' हे ग्रंथ, ज्या साहेबांचे पाय हिंदुस्थानच्या धुळीनें कधींच माखले नाहींत, अशांच्या ग्रंथांची भाषांतरें करून तयार करण्या सारखेंच, हे ही ग्रंथ हास्यास्पद झाले असते. तसेंच ज्यांची चरित्रें नाभाजीनें लिहिलीं नव्हतीं,

आणिक स्वदेशा माजी निश्चित । प्रख्यात जाहले जे महासंत ॥
त्यांच्या वंशीं सज्ञान महंत । त्यांचे वचनार्थ पाहिलें ॥
आपुल्याची मतें वदलों जर । तरी सर्वज्ञ न मानिती उत्तर ॥
यासी साक्ष रुक्मिणीवर । जाणे अंतर सकळांचे ॥

यावरून महिपतीनें इकडील संतांच्या वंशजांच्या भेटी घेऊन, माहिती कशी श्रमानें मिळविली असेल, याची चांगली कल्पना होते. ग्रंथांत चरित्रें फार व तीं ठिकठिकाणीं असल्यामुळें सांपडण्यास घोटाळा पडावा; पण तसें होत नाहीं. ग्रंथांत शेवटीं अनुक्रमणिकेचा एक एक अध्याय जोडला आहे. ही रचना महिपतीचीच एकट्याची आहे असें नाहीं. श्रीधर वगैरे बहुतेकांची ग्रंथरचनेची हीच पद्धति असते. प्रथम इष्टदेवतेचें, वाडवडिलांचे, गुरूचें वगैरे स्मरण केलेलें असतें. कदाचित् स्वत: विषयीं व आपल्या ग्रंथाविषयींही थोडीबहुत माहिती सांगणें, ती कवि येथेंच सांगतो व दुसऱ्या अध्यायापासून ग्रंथाच्या विषयाला नीट सुरवात होते. विषयानुरोधानें ग्रंथाचे भाग पाडलेले असतात. त्यास समास, खंड, अध्याय वगैरे नांवें देतात. प्रत्येक भागाचे किंवा अध्यायाचे शेवटीं कवीचें नांव असतें. दरएक अध्यायांत काय भाग आला आहे, हें कळण्याची योजना अगदीं शेवटल्या अध्यायांत केली असून, शेवटीं ग्रंथ पूर्ण झाला ती मिति, वार, महिना, शक, संवत्सरसुद्धां दिलेलें असतें. आणि मग आपलें नांव ठिकाण वगैरे घालून, कवि ग्रंथ पुरा करतो. संवत्सर घालण्याची पद्धति फार चांगली आहे. यामुळें शकाचा आंकडा चुकला असल्यास तपासून पाहण्यास जागा राहते. या ठिकाणीं ग्रंथ लिहिण्याची पद्धति सांगतली असतांही, वावगें होणार नाहीं. कारण, हल्लीं जरी नाहीं, तरी पुढेंही पुष्कळांना ठाऊक नसण्याचा संभव आहे. पोथी लिहिणें ती नेहमीं ' देवनगरी ' लिपींत लिहितात. कारण, ही लिपि पवित्र मानिली आहे. मोडी लिपीस ' पिशाच्च लिपि ' समजतात. कागदावर आडव्या बाजूनें चोंहींकडे नीट समास टाकून, ग्रंथ लिहिला असतो. ओळी सरळ व सारख्या याव्या, आणि सर्व ठिकाणीं समासाची जागा सारखीच सुटावी, अशी योजना केली असते. याकरितां ज्या आकाराच्या कागदावर पोथी लिहिणें असेल, त्या आकाराची एक फळी घेतात व तिला आडवी धरून बाजूला समासाची जागा टाकून थोडथोड्या अंतरावर समोरासमोर दोहों बाजूला भोकें पाडतात. या भोकांतून दोरी ओंवलेली असते. अशा रीतीनें फळी तयार झाली ह्मणजे, त्यावर कागद ठेऊन वरून जरा दाबून हात

फिरवतात. ह्मणजे दोऱ्यांचे वण कागदावर उठतात. आणि मग ओळी आंखल्याप्रमाणें, लिहिण्यास सुलभ जाते. अभंग मात्र असे लिहीत नाहींत; ते उभ्या चोपड्यावर लिहिलेले असतात. त्या खतावणीसारख्या शिवलेल्या असून जाड असतात. प्रत्येकाची चोपडी निराळी असते व तो त्यांत अभंग लिहितो. वारकरी कागदाच्या कपट्यावर अभंग लिहून घेऊं लागलें तर सांगत नाहींत. लिहून घेतलेला कपटा उकिरड्यावर पडेल, आणि संतांचा अभंग कोणाच्या पायदळी जाईल, हें पाप आमचेकडे नको असें ते ह्मणतात. महिपतीच्या नंतर वारकऱ्यांत नांवाजण्यासारखा ग्रंथकार कोणी झाला नाहीं. वर सांगितलेल्या ग्रंथांखेरीज 'कथासारामृत' 'कृष्णलीलामृत' वगैरे ग्रंथ आणि 'शनिमहात्म्या'सारखीं स्तोत्रें व हरितालिका ऋषीपंचमीसारखीं व्रतें यांची हल्लीं प्रसिद्ध आहेत. याची कविता फार सरळ आहे. कोठेंही कठीण शब्द किंवा दुर्बोध रचना आढळत नाहीं. उपमा देऊन दृष्टांत सांगण्याचीही याची हातोटी फार चांगली आहे. इतर लेखकांचीं अवतरणें घालून ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं यानें सौरस्य आणलें आहे. याजबद्दल पंत ह्मणतात--

ज्ञानोबाची जैशी, एकोबाची सुधा जशी वाणी ।
कीं मुक्तेश्वर कविची महिपतिची सेविती तशी प्राणी ॥

हा श्रावण वद्य १२ शके १७१२ मध्यें, वयाचे ७९ वे वर्षी मरण पावला. याचेवेळीं श्यामा, जनार्दन, दामोदर वगैरे लहानसहान कवी महाराष्ट्रांत बरेच प्रसिद्ध होते. तसेंच शहामुनी, हरिराज, माणकेश्वर, शिवराम वगैरे मंडळीही याच वेळीं असावी. शहामुनी मोठा गणेशभक्त होता. शके १७००चे सुमारास त्यानें आपला 'सिद्धांतबोध' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ वेदांतविषयात्मक असून, याचे एकंदर ९० अध्याय आहेत. याची देहावर कांहीं पदेंही आहेत. हरिराज माणकेश्वर याचें उपनांव शेंडे. याच्या हिंदी व मराठी या दोन्ही भाषांत कविता आहेत. 'भस्मासुराख्यान', 'राधावर्णन' वगैरे लहानलहान तीन चार प्रकरणें यानें रचलीं आहेत. रामायांचे यानें

केलेलें श्लोकबद्ध भाषांतर काव्येतिहासांत आलें आहे. शिवराम कवी अगर शिवराम स्वामी हाही पुरुष याच काळांत होता. याची गंडिकाख्यान, मुद्रिकाख्यान, रामतुळसी, अपराधस्तोत्र वगैरे दहा बारा प्रकरणें व कांहीं पदें आजपर्यंत छापलीं आहेत. यानें श्रीमंत नानासाहेब पेशव्यांस केलेला एक कविताबद्ध उपदेशही प्रसिद्ध आहे. यांतील मजकुरावरून श्रीमंतांची व कवींची बरीच ओळख असावी असें वाटतें. याकाळीं पेशवाईमुळें कवींनाही एके तऱ्हेनें उत्तेजन होतेंच. लोकांत ज्ञानाचा प्रसार व्हावा आणि आपल्या देशांत विद्वान् पुष्कळ असावे असें पेशव्यांस वाटणें अगदीं साहजिकच आहे. नानासाहेब, थोरले माधवराव यांच्या कारकिर्दींत मराठी गोष्टींना नवें स्वरूप येत चाललें होतें असें दिसतें. त्यावेळीं मराठी ही या देशाचीच भाषा होण्याचा चांगला समय आला होता, व माधवरावासारखा प्रभु आणखी कांहीं दिवस जगता तर तसें कांहीं झालेंही असतें. पेशव्यांचे सर्व दफतर मराठींत असे, यामुळें मराठी भाषेला चोहीकडे मानमान्यता मिळूं लागली. चोहींकडच्या मांडलिक राजांना मराठी येणें, किंवा त्यांचे पदरीं मराठींत निष्णात असा एखादा दिवाण असणें अगदीं अवश्य झालें होतें. पेशव्यांचे वकील चोहींकडे असत, तेही मराठी लिहिणें लिहीत. यामुळें मराठी लेखण चोंहीकडे पसरत चालली होती. दादांसारख्यांनीं मोठमोठ्या देशगिऱ्या करून जेव्हां कृष्णातीरच्या भिमथडी तट्टांना सिंधुनदांत नाहूं घातलें, तेव्हां पुण्याच्या कारकुनाचा हुकूम सिंधुनदाच्या प्रांतांतही शिरसावंद्य झाला. त्यांच्या ऐन अमलांत तर पंजाब, नेपाळ, बंगाल राजपुताना, कर्नाटक, तैलंगण वगैरे ठिकाणींही मराठी भाषेंत लिहिलेलें आज्ञापत्र वंद्य होत असे. परंतु मराठ्यांना केव्हांही जरूर तितकी स्वस्थता मिळालीच नाहीं, हें भाषेचें दुर्भाग्य समजावयाचें. याकाळीं जुन्याकाळच्या बखरी, लढायाचीं वर्णनें वगैरे गद्यग्रंथही बरेच झाले असावेत. पुढें डफसाहेबानीं ‘ मराठ्यांचा इतिहास ’ लिहिला. त्यांत लिहिले आहे कीं, मी ह्या इतिहासास आधार ह्मणून ज्या बखरी वाचल्या, त्यांपैकीं, कांहीं

इतक्या मोठ्या होत्या कीं, त्यांतील एक एक खुद्द माझ्या ग्रंथाएवढी होईल. आणि डफसाहेबांचा इतिहास हा केवढा प्रचंड ग्रंथ आहे हे पुष्कळांस माहित असेलच. या बखरी लिहिण्याची लिहिणारांची पद्धतिही पुष्कळ वेळां चांगली असे. यावेळीं पेशव्यांच्या पदरीं असलेले चिटणीस रघुनाथ यादव यानीं श्रीमती गोपिकाबाईसाहेबांचे आज्ञेवरून 'पानिपतची बखर' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यांनीं शेवटीं ह्मटलें आहे कीं, 'एक बारनीस शत्रू कडील व एक श्रीमंतांकडील या उभतांचें दिनचर्येचें वर्तमान दफात्यास चिटणिसानीं बार केलें, त्यांची संगत पाहून कच्चा मजकूर सेवेशीं निवेदन करण्याकरतां यथामतीनें बखर सजवून सेवेशीं पाठविली आहे.' अशा तऱ्हेनें रचलेले ग्रंथ खरोखरच जसे इतिहासदृष्टया तसेच भाषेसंबंधानीं अमोल होत. हेच आपल्या भाषेंतील प्रथमचे 'इतिहास' होत. तसेंच नाना फडणनवीसानीं लिहिलेलें असें एक आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. हल्लीं उपलब्ध असलेला भाग अगदींच त्रुटित आहे. यांत जन्मापासून तों थोरले माधवराव साहेबांच्या कारकीर्दीच्या आरंभापर्यंतचा मजकूर आला आहे. परंतु एक तर तें खुद्द नानानीं लिहिलेलें असून आत्मचरित्र आहे. यामुळें या लेखास फारच योग्यता आली आहे. खेरीज यांत नानांचें बालपण, पानिपतची धामधूम व पळ आणि पुढें त्यांच्या स्वतःवर कोसळलेलीं संकटें हा भाग आला आहे. यामुळें हें कितीही वेळां वाचलें तरी पुरेसें होत नाहीं. ज्या मनुष्यानें आपल्या अकलेच्या जोरावर डबघाईस आलेलें मराठ्यांचें राज्य इतकें वर्षें चालविलें, ज्याची कार्यतत्परता व उद्योगप्रीति पाहून मी मी ह्मणणाऱ्या मुत्सद्यांनींही तोंडांत बोटें घालावीं, व सहज पत्र लिहिणें तरी ज्यानें तें फार जपून लिहावें, त्याच्या हातचें हें स्वदस्तुरचें चरित्र कोणाही महाराष्ट्रीयास आनंददायक होईल. नानांचें आत्मचरित्र व त्यांचीं पत्रें हीं एके ठिकाणीं छापल्यास तो एक सर्वप्रकारें उत्तम असा ग्रंथ होईल, यांत संशय नाहीं. मराठी भाषा खुबीदार रीतीनें कशी वापरावी, सहज टोमणा मारणें तर दोनच शब्द पण काळजास घरें पाडण्यासारखे कसे

लिहावें, मोठमोठ्या कारस्थानांच्या हकीगती चार दोन वाक्यांत कशा आणाव्या, हें या ग्रंथांत नीट दृष्टीस पडेल. श्रीमंत सवाई माधवराव यांस त्यांच्या आजीनें एक ' उपदेशपत्र ' लिहून पाठविलें, त्यांवरून या काळीं जुन्या पौराणिक हकीगती व भूगोलाऐवजीं स्थलवर्णनें व त्यांचे नकाशेही असावेत असें स्पष्ट दिसतें. यांत बाईनीं नातवास ' खर्डे लिहावयास बसावें ' असा उपदेश केला आहे. यावरून पेशव्यांचें अक्षराकडे लक्ष विशेष असावें असें दिसतें. लिहिण्याची पद्धत पेशवाईंत फार सुधारली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. थोरले माधवराव साहेबांचे कारकीर्दींत कोणी गोपाळराव बिवलकर या नांवाचे गृहस्थ होते. यांनीं लेखनकलेचे नियम ठरवून मोडी लिपींत फार सुधारणा केली. यांनीं मोडी अक्षरास लावून दिलेलें वळण हल्लीं ' बिवलकरी वळण ' ह्मणून प्रसिद्ध आहे. माधवराव साहेबांचें अक्षर याच नमुन्यावर वळविलें होतें. महाराष्ट्रांत लोकांनीं अक्षराकडे लक्ष पोचवावें, व आपली लिपि चांगली सुधारावी ह्मणून पेशव्यांनीं असा नियम केला होता कीं, अक्षर चांगलें असल्याशिवाय, कोणाला मामलत सांगावयाची नाहीं. खेरीज विद्यार्थ्यांच्या सोईसाठीं ह्मणून त्यांचेकडे असा नियम असे कीं, पंक्तीला जेवावें, व खुशाल पर्वतीला राहून आपलीं अक्षरें सुधारावीं. पेशवाईंत पुढें काकिर्डी, चिटणीशीं, जनोबाभट्टी वगैरे अनेक वळणें प्रसिद्ध होतीं. कोणाकडेही गेलें तरी कोणीही कित्ता घालून देई. खुद्द माधवराव साहेबांसंबंधीं असें सांगतात कीं, घोड्यावरून जात असतांही कोणी दौत कागद घेऊन आल्यास, ते तसाच घोडा थांबवून घोड्यावरच कित्ता काढून देत.

माधवरावाचे नंतर ह्मणजे नारायणराव, सवाई माधवराव वगैरेंच्या कारकीर्दींत गोविंदकवि, चतुर साबाजी, मोरेश्वर, रामचंद्रमल्हार, पांडुरंग वगैरे कवी प्रसिद्धीस आले. गोविंदकवि हा मोठा भगवद्भक्त असून, साधु वृत्तीनें राही. याची बायको थोडीबहुत कविता प्रसिद्ध आहे. या कवीची बायकोदेखील कविता करी असें दिसतें. हिचें एक पद गोविंदाच्या पदाबरोबरच काव्यसंग्रहांत छापलें आहे. तें गोड व प्रेमळ

आहे. चतुर साबाजी हा पुण्यांत पेशव्यांच्या पदरीं असे. याच्या बापाचें नांव विश्वनाथ. याची ' बलिदानकथा ' ' रावणगर्वपरिहार ' वगैरे आख्यानें छापिलीं आहेत. मोरेश्वर व हेबळीकर हे दोघेही एकच असावेसें वाटतें. मोरेश्वराचें ' चंद्रावळीवर्णन ' ह्मणून एक शृंगाररसपर काव्य प्रसिद्ध आहे. ' वीरभद्रचरित्र ' हा एक सात हजार ओव्यांचा ओंवीबद्ध ग्रंथ यानेंच रचला आहे असें ह्मणतात. रामचंद्रंमल्हारकृत ' सुभद्राहरण ' प्रसिद्ध आहे. हें अनेक वृत्तात्मक असून, याची रचनाशैली थेट वामनाच्या काव्याच्या धाटणीवर आहे. या कवीचीं बरींच प्रकरणें आसावींत असें पुष्कळांचें अनुमान आहे. पांडुरंग हा कवि साधारणच दिसतो; परंतु श्रीमंत नारायणराव पेशवे यांचें ओंवीबद्ध चरित्र यानें लिहिलें असल्यामुळें, हा बराच प्रसिद्ध आहे. या चरित्रांत श्रीमंतांच्या वधाबद्दल हकीगत जरा विस्तारानें लिहिली आहे. कदाचित् हा कोणी श्रीमंतांच्या पदरचा मनुष्य असावा. यानें ' रामगौरव ' ' द्रौपदीस्वयंवराख्यान ' ' स्थालीपाक ' ' पार्थहनुमंतसंवाद ' वगैरे अनेक प्रकरणें रचलेलीं प्रसिद्ध आहेत. यानें आपल्या ग्रंथांत रामकृष्ण असें गुरूचें नांव दिलें आहे.

यावेळीं सर्व कवींपेक्षां किंबहुना एकंदर सर्व महाराष्ट्र कवींपेक्षां प्रसिद्ध असा कवि मोरोपंत हा होता. पेशव्यांचे व्याही बाबुराव बारामतीकर याजकडे दप्तरांत रामाजीपंत पराडकर ह्मणून एक कारकून होते. यांचे मोरोपंत हे चिरंजीव होत. मोरोपंत कांहीं दिवस पन्हाळा किल्ल्यावर कारकुनीचें काम पहात होते. परंतु यांची विद्वत्ता पाहून यांस बाबुरावांनीं अपल्या घरीं पुराण सांगावयास ठेविलें. व आमरण ते तेथेंच होते. पंक्तीस जेवावें, संध्याकाळीं पुराण सांगावें, व राहिलेला सर्व काळ ग्रंथावलोकनांत आणि ग्रंथरचनेंत घालवावा, असा यांचा क्रम असे. दुसरे बाजीराव साहेबांची पंतावर गैरमर्जी असल्याबद्दल अनेक अख्यायिका हल्लीं प्रसिद्ध आहेत. बाजीराव साहेबांनीं पंतास आपल्या आश्रयास राहण्यास बोलाविलें असतां ते त्यांनीं नाकारिलें.

---

१ काव्यसंग्रह

एकदां श्रीमंत कथेला यावयाचे असून, ते येण्यापूर्वीच कथेला सुरवात केली, वगैरे कारणांवरून श्रीमंताची नाखुषी झाली व त्यांनीं आपल्या समोर कोणी पंताच्या आर्या कीर्तनांत ह्मणतां कामा नये, असा नियम केला. अशा हकीगती काव्येतिहाससंग्रहांतील 'मोरोपंतांच्या चरित्रां-' पासून तों परवां लिहिलेल्या 'काव्यसंग्रहां' तील 'मोरोपंत कवीच्या चरित्रां' पर्यंत सर्व ठिकाणीं आढळतात. व यासंबंधीं 'काव्यसंग्रहांत' 'तुकारामस्तुतीं' तील २२वी गीती 'पंतांनीं बाजीरावाच्या मूर्खपणा' बद्दल मारलेला खुबीदार टोला ह्मणून दाखल केला आहे. आतां या गीतीच्या काव्यसंग्रहकारांनीं केलेल्या अर्थांत जरा ओढाताण दिसते. तेविसावी गीती वाचली ह्मणजे तर याबद्दल बरीच खात्री होते. व या २२व्या गीतींत असा कांहीं एक अर्थ नाहीं असें दिसून येतें. कालमानावरूनही वरील आख्यायिका खऱ्या मानण्यास बरीच अडचण येते. पंतांचें जन्म व देहावसान शक अनुक्रमें १६५१ व १७१६ (चै० शु० १५) हे सर्व मान्य आहेत. काव्यसंग्रहांतही ते असेच दिले आहेत. बाजीराव साहेबांस पेशवाईचीं वस्त्रें शके १७१७त[1] मिळालीं. ह्मणजे बाजीराव पेशवा होण्यापूर्वीच इतकेंच नव्हे, तर सवाईमाधवराव पेशवे (१६९५–१७१७) याच्याही एक वर्ष आधीं पंत वारले होते. पेशवा होण्यापूर्वीच असें कांहीं झालें असेल ह्मटलें तर, तें तर अगदींच संभवत नाहीं. सवाईमाधवरावांचे कारकीर्दींत बाजीरावाची सत्ता किती आकुंचित होती व नानांनीं त्यांस कसें ठेविलें होतें हें इतिहासज्ञांस माहित आहेच. अनंतफंदीच्या 'माधव' काव्यावरूनही याची कल्पना होण्यासारखी आहे. पेशव्यांचा व पंतांचा संबंध असा कांहीं वेडा वांकडा होता, असें ह्मणण्यापेक्षां, लोभाचा होता असेंच ह्मणण्यास पंतांचे ग्रंथ साक्ष देतात. गंगावकिलींत ८७व्या गीतींत व ८९व्या गीतींत 'श्रीमाधवराय पेशव्यां' बद्दल आपली आदर बुद्धि चांगली दर्शविली आहे. इतर ठिकाणांवरूनही असाच आशय निघतो. 'नगाचे मणि-

---

१ मोलस्वर्थकृत कोशांत हा शक निराळा आहे. पण त्यांतली माहिती विश्वसनीय नाहीं.

गणीं खचिला ' असा आपला ' प्रल्हादविजय ' हा ग्रंथही पंतांनीं थोरल्या माधवरावांच्या मातुश्री श्रीमती गोपिकाबाई यांच्या आज्ञेवरून रचला हें प्रसिद्ध आहे. तेव्हां एकंदरींत वरील आख्यायिकांस कांहीं सबळ पुरावा मिळे तोंपर्यंत त्या जरा संशयाच्या वाटतात.

मोरोपंताच्या कवितेसंबंधें दोन पक्ष आढळतात. एका पक्षाचें ह्मणणें असें पडतें कीं, मोरोपंताची वाणी शुद्ध, प्रौढ, सरळ आणि स्थलविशेषीं फारच रसाळ आहे,[1] त्याच्या कवितेंत प्रासयमकादि शब्दालंकार आणि उपमा, रूपक उत्प्रेक्षादि अर्थालंकार फार आहेत.[2] त्याचीं यमकें जरी अप्रतिम असतात, तरी तीं साधण्याकरितां तो अर्थाची हानि करीत नाहीं. नियमित स्थळीं नियमित अक्षरें घालणे आणि मार्मिक व हृदयंगम दृष्टांतयोजना यमक जुळविणें ही गोष्ट त्यांस सुलभ होउन गेली होती.[3] त्याची शब्दरचना व वर्णनाची हातोटी अशी कांहीं खुबीदार असते कीं, त्यामुळें सहृदय वाचकांची त्याच्या काव्यावर मुरकुंडीच पडावी. नवरस तर जसे कांहीं पुढें हात जोडून उभे होते, असें वाटतें. सर्वांत भक्तिरसाची भट्टी पंताला फार चांगली साधली आहे.[4] दादोबांनीं तर ह्मटलें आहे कीं, त्यांनीं आपल्या रसभरित काव्यानें महाराष्ट्र भाषेस केवळ संस्कृत भाषेचीच प्रौढि आणिली. प्राकृत भाषेविषयीं नाकमुरडणारे जे शास्त्री व पंडित, यांस त्यानींच लाजविलें. आजपावेतों जें कांहीं भांडार संस्कृत भाषारूप पेटींत कुलूप घालून ठेविलें होतें, आणि तिची किल्ली ब्राह्मणांच्याच स्वाधीन होती, तें ज्ञानेश्वर, एकनाथ, मध्वनाथ, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत आदिकरून जे ब्राह्मण कवी झाले, त्यांनीं उघडून काढून त्यांचें प्राकृत तेणेंकरून सर्व लोकांस अर्पण केलें. ह्मणोन नुसतें यांचें कौशल्य व चातुर्य वर्णावें इतकेंच नाहीं, परंतु यांची औदार्यपूर्वक जी औपकारिक बुद्धि तिचीही या प्रसंगी प्रशंसा केली पाहिजे.

दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें असें पडतें कीं, मोरोपंत हा कांहीं खरा कवी नव्हे. यानें पुष्कळ ग्रंथांचे भारुड मात्र केलें आहे. पण त्याची

---

१ कविचरित्र. २ नवनीत. ३ ज० बा मोडक. ४ काव्यसंग्रह.

किंमत कायती साखरेच्या गोण्या वाहणाऱ्या बैलाइतकीच. त्याच्या कवितेंत प्रसाद किंवा स्फूर्ति यांचा अनुभव लवमात्र मिळणें नाहीं. संकृतांतले जाडेजाडे शद्ब किंवा लांब लांब यमकें घालून कोणी कवि होतो असें नाहीं. कवित्वाला कांहीं स्वाभाविक गुण लागतात. आणि त्यांचा तर मोरोपंताच्या काव्यांत पूर्ण अभाव. आतां या दोन पक्षांत खरे कोण आणि खोटे कोण याजबद्दल बरीच भवति न भवति गेल्या दहा-वीस वर्षांत झाली आहे. पण या दोन पक्षांत अंतर दिसतें तें असें कीं, पहिल्या किंवा पंताच्या अभिमानीवर्गांत परशुराम पंतांसारखे आपला सर्व काल मराठी कवींची काव्यें वाचण्यांत व तशीं नवीन रचण्यांत घालविणारे पंडित, दादोबांसारखे वैय्याकरण व टीकाकार, विष्णुशास्त्र्यासारखे भाषाभिज्ञ विद्वान्, किंवा मोडकांसारखे सत्दृदय वाचक व आणखी अनेक लोक नजरेस पडतात; परंतु दुसऱ्या पक्षाकडे पहावें तों तसें कांहींच दिसत नाहीं. नुसत्या 'नवनीता' पलीकडे गेलेल्यांची संख्या देखील त्यांत फार सांपडावयाची नाहीं. घेण्यासारखे असें थोरल्या चिपळूणकरांचें नांव मात्र या मंडळींत आढळेंत. परंतु या विद्वानांनींही पंतांचें ग्रंथ वाचून मग त्यांवर आपला अभिप्राय कोठें प्रगट केला आहे, असें मुळींच नाहीं. याशिवाय दुसरे असें कीं, दुसऱ्या पक्षांतील बहुतेक मंडळी मोरोपंताच्या काव्यांना मात्र नांवें ठेवतात. परंतु त्यांतून कोणी मोरोपंतापेक्षां सरस राहो, पण निदान त्याच्यासारखें तरी काव्य निर्माण केलें आहे असे मुळींच नाहीं. पाहिजे असल्यास कोणी पांचसातजण जमून अमरकोश, वगैरे साहित्य जवळ घेऊन एकदां दहा आर्या करण्याचा यत्न करून पहावा, ह्मणजे 'कश्चित्त व्याघ्र: पुलकित तनू बोंब मारीत गेला' अशी विचित्र रचना कशी होते, तें त्यांना कळेल व मग पंतांना काय ह्मणावें हें त्यांस आपोआप समजेल. पंतांच्या काव्यास नावें ठेवणाऱ्या लोकांस अनुलक्षून एका कवीनें ह्मटलें आहे:—

'संतोष मयूराच्या काय बिडालास होय केकांनीं'।

पंतांच्या काव्यांतील अनेक गुणांविषयीं पुष्कळ ठिकाणीं लिहिलें आहे.

तरी त्यांचें कोणतेंही एखादें काव्य किंवा बारीकसें स्तोत्र घेतलें तरी त्यांत त्यांचा कारकुनी बाणा सहज दिसून येतो. वामन पंडितांखेरीज-करून पंताइतका विद्वान् कवी मराठी भाषेंत झाला नाहीं. यामुळें इतरां-पेक्षां त्यांच्या काव्यांत ठाकठिकी अधिक आढळते. शब्दांची ओढा-ताण किंवा व्याकरणाची वगैरे चूक असा प्रकार यांच्या ग्रंथांत क्वचित्च आढळतो. व ग्रंथरचनेच्या मानानें पाहिला तर तो अगदींच नाहीं असें ह्मटलें असतांही चालेल. यांचें काव्य जरा दुर्बोध आहे हें खरें; पण एखादीं दोन वाक्यें वाचल्यावर ती दुर्बोधता कमी होते. व हळू हळू गोडी जास्त जास्त लागूं लागते. त्यांतही 'गंगावकिली', 'तुळसीस्तव', 'सीतागीत' वगैरे काव्यें सोपीं आहेत. हीं आधीं वाचलीं ह्मणजे पुढलीं फार कठीण वाटणार नाहींत. यांचें कोणतेंही काव्य घेतलें, तरी त्यांत विद्वत्ता, शुद्ध भाषा व (कारकुनी) नियम हे गुण अवश्य सांपडतील. मात्र जें कांहीं वाचणें तें नवनीतांत वाचून उपयोगीं नाहीं. मूळांतच वाचलें पाहिजे. 'कृष्णविजयांत' दुसऱ्या भागांत ८३व्या अध्यायांत कृष्णभगिनी द्रौपदी व त्याच्या रुक्मिणी, भामा, जांबवंती वगैरे भार्या या एकेठिकाणीं बसून कुशल प्रश्न एकमेकींस विचारीत आहेत. अशा-वेळीं द्रौपदीनें तुह्मी आपल्या 'स्वयंवर कथा मला सांगा' अशी विनंति ह्या कृष्णसख्यांस केली. त्यावरून तेथें असलेल्या सात आठ जणींनीं आपापलीं पृथक् पृथक् वृत्तें सांगितलीं. हीं सर्वांची वृत्तें कवीनीं फारच कुशलतेनें सांगितली आहेत. पहिली पट्टराणी रुक्मिणी. तेव्हां तिनें वृत्त आधीं सांगितलें. हिच्या तोंडीं पंतांनीं ९२ आर्या घातल्या आहेत. यांत कृष्णाबद्दल झालेली तिच्या मनाची उछृंखल वृत्ति, आपल्या भावाला आणि शेवटीं दे-वालाही तिनें लावलेला बोल, कृष्ण आला न आला पाहण्या करितां तिनदां तिनदां तिचें उंच गच्चीवर जाणें, पत्रिका घेऊन धाडलेला विप्र आल्यावर वाटलेलें समाधान, देवीदर्शनाचें वेळची स्थिति, कृष्णानें तिला रथांत घालून नेणें, आणि शेवटीं कृष्णाबरोबर लढावयाला आपला भाऊ आलासें पाहून दोन ठिकाणीं झालेलें मन या स-र्वांचें वर्णन अगदीं हुबेहूब उतरलें आहे. आणि सगळ्यापेक्षांही स्व-

तःच्या स्वयंवराची कथा, मोठेपणीं नणंदेस चार आयाबाया देखत सांगावयाची, तशांत पहिली पाळी रुक्मिणीवर, यामुळें तिनें लाजत लाजत सांगितलेल्या या भागाला विशेषच गोडी आली आहे. आणि या येवढ्या ९२ आर्यांच्या ऐवजीं मुळांत अवघा एकच श्लोक आहे. तरी देखील ' मोरोपंतांनें काय नुसतें भाषांतर केलें ' हें आहेच. पुढील कथाभागही असेच मजेचे आहेत. पण ते प्रमाणांनीं उत्तरोत्तर लहान लहान आहेत. ' लक्ष्मणेचा वृत्तांत साऱ्या आठच आर्यांत आणिला आहे. हें एक उदाहरण सांगितलें. अशीं स्थळें पंताच्या काव्यांत सर्वभर पसरलेलीं आहेत. त्यांपैकीं नमुन्यादाखल अवतरणें देणें ह्मणजे वाडा कसा आहे याची कल्पना होण्यासाठीं त्याची एखादी तोंड किंवा मूठभर माती खणून आणण्यासारखेंच आहे.

बरें. यांची ग्रंथरचना तरी एखाद्या प्रचंड महासागराप्रमाणें केवढी अवाढव्य आहे हें मनांत आणलें ह्मणजे अगदीं अबच होतें. आधीं अठरा पर्वें महाभारत; ह्मणजे एक मोठा थोरला समुद्रच तो; द्वादश स्कंद व मंत्रमय असे दोन भागवतग्रंथ, हरिवंश, कृष्णविजय, ब्रह्मोत्तरखंड असे किती तरी ग्रंथ. साधारणसा कृष्णविजय घेतला तर त्यांत देखील साडेछत्तीसशेंपेक्षां जास्त पद्यें आहेत. याखेरीज इतर ग्रंथ व बारीक बारीक प्रकरणें तर किती तरी आहेत. नुसतीं रामायणें ह्मटलीं तर तींच १०८. या सर्वांची सकारण नांवें त्यांतील पद्य संख्या इतकेंच नुसतें द्यावयाचें ह्मटलें तरी देखील एक ग्रंथच होईल. हीं सर्व ' शाळापत्रकें ' व ' काव्येतिहाससंग्रह ' मध्यें दिलीं आहेत. खेरीज असें सांगतात कीं, काशींत असतांना चातुर्मासभर, पंत रोज सकाळीं आंघोळ करून श्रीमद्भगवद्गीतेचें पद्यात्मक भाषांतर करीत. तें ब्राह्मणाला दान केल्याखेरीज अन्नग्रहण करीत नसत. ह्मणजे नुसत्या गीतेचींच शें सव्वाशें भाषांतरें झालीं. संस्कृतांत देखील यांची रचना थोडी नाहीं. एकट्या ' संस्कृत मंत्ररामायणांत ' जवळ जवळ चार हजार पद्यें आहेत. 'काव्यसंग्रह' या मासिक पुस्तकांत आजपर्यंत सुमारें ९ हजार पृष्ठें ' मोरोपंतांचे ग्रंथां 'नीं व्यापिलीं आहेत. अजून भार-

ताचीं ६ पर्वें देखील पुरीं झालीं नाहींत. सर्व उपलब्ध ग्रंथ छापण्यास हें पुस्तक आणखी बरींच वर्षें चालवावें लागेल असा अदमास आहे. शिवाय अनुपलब्ध अशी पंतांची सुमारें पांच सहा हजार ग्रंथसंख्या असल्याबद्दल त्याच पुस्तकाच्या एका वाचकानें पत्रव्यवहार केला आहे. यावरून यांच्या ग्रंथास वर महासागर ह्मटलें आहे, तें किती यथार्थ आहे हें दिसून येईल. बरें हे सर्व ग्रंथ नुसते सरळ रचले आहेत तर तेंही नाहीं. यांत किती तरी तऱ्हेच्या चित्रविचित्र रचना केल्या आहेत. एखाद्या 'राजे साहेबांच्या' राज्यारोहण प्रसंगीं दहा बारा श्लोक रचून त्यांत आद्याक्षरानीं राजाचें नांव आणावयाचें, तर आमच्या मंडळीची केवढी तारांबळ उडते. पण पंतांनीं कोठेंही ओढाताण केल्याशिवाय व काव्याला विशेष दुर्बोधता आणल्याशिवाय शेकडों तऱ्हेच्या रचना केल्या आहेत. यांच्या या रचना पाहिल्या ह्मणजे अरबी भाषेंतल्या सुरस गोष्टींतील रत्न भांडारांचीं आठवण येते. हिऱ्यांची खोली ह्मटली ह्मणजे चोहींकडे हिऱ्यांचा लकलकाट, ती टाकून माणकांच्या खोलींत गेलें ह्मणजे सर्वभर माणकेंच माणकें; पाचांची खोली पाहिली कीं, खालीं वर, बाजूला सगळीकडे हिरवा गार देखावा; मोत्यांच्या खोलींत गेलें ह्मणजे चोंहीं-कडे तींच, असाच याचाही थाट आहे. 'मंत्रमय रामायण' घेतलें तर 'श्रीराम जयराम जयजयराम' हा मंत्र दरएक आर्येंत साधला आहे, 'मंत्ररामायण' व 'बालमंत्ररामायण' या दोहोंतही हाच त्रयोदशाक्षरी मंत्र साधिला आहे. पण या दोहोंत, बालकांडांत तो प्रत्येक गीतीच्या पहिल्या चरणाच्या पहिल्या अक्षरांत; अयोध्या कांडांत दुसऱ्या अक्षरांत; अरण्य कांडांत तिसऱ्यांत; किष्किंधाकांडांत चौथ्यांत, याप्रमाणें क्रमानें शेवटच्या उत्तर कांडांत तो सातव्याअक्षरांत आहे. नामांकरामायणांत प्रत्येकगीतीच्या पहिल्या ओळींचें पहिलें अक्षर 'रा' व दुसऱ्या ओळीचें पहिलें अक्षर 'म' असें सर्वभर आहे. हाच प्रकार 'उमा' रामायणांत आहे. 'शिव' रामायण, 'काशी' रामायण, 'गंगा' रामायण, 'प्रयाग रामायण' वगैरेंत थोड्या फरकानें हीच रचना आढळते.

तीर्थरामायणांत प्रत्येक गीतींत एकेका तीर्थाचें नांव आणलें आहे. ऋषीरामायणांत एकेका ऋषीचें नांव आहे. दहा स्तोत्र रामायणांत मिळून दरएक गीतींत एक याप्रमाणें विष्णूचीं सहस्रनामें गोंवलीं आहेत. लघुरामायणांत दीर्घ अक्षर एकदेखील आलें नाहीं. दामरामायणांत एका ओळीचीं शेवटलीं अक्षरें दुसऱ्या ओळींत प्रारंभीं आणलीं आहेत. मात्रारामायणांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंतचे सर्व वर्ण अनुक्रमानें आर्यांचे आरंभीं योजिले आहेत. यांत कवि जेव्हां 'ण' अक्षरावर आला तेव्हां मोठी पंचाईत पडली. आरंभीं 'ण' वर्ण असा शद्ब मराठींत नाहीं. तेव्हां

'ण पुढें मागें रा ज्या, तो राय कपीस भेटला वानी'

अशी आर्या रचून व जरा वळशानें रावणाचें नांव योजून क्रम साधला आहे. निरोष्ठ रामायणांत प फ ब भ म व इत्यादि ओष्ट्य वर्ण अजी गाळले आहेत. हे ओंठ धरून किंवा विडा खाऊन अगदीं सहज वाचतां येतें. या रचनेंत केवढाल्या अडचणी येतात त्या पहा. रामायणांत मूळ कथा रामाची. पण राम शब्दांत 'म' येतो, रामाचा भाऊ लक्ष्मण त्याच्या नावांतही 'म' कार आहेच. रामाचा शत्रु रावण त्याच्या नावांत 'व' हें वर्ज अक्षर येतें. रावणाचा भाऊ बिभीषण त्यांत 'ब' आणि 'भ' हे दोन ओष्ठ्य वर्ण. रामाचा एकनिष्ठ सेवक मारुती त्याच्या आरंभींच 'म' कार, मिळून जिकडे पाहवें तिकडे अडचणच. पण इतक्यांतूनही दशरथनंदन, धाकटा दशरथी, दिक्कंठ, अंजनीसुत वगैरे नावें योजून कवि पार पडला आहे. तेव्हां अशा या कवीची थोरवी किती आहे हें सहज लक्षांत येईल.

नित्य तुह्मीं प्रभुपाशीं पेढे बरफी नवा खवा खावा।
तरि म्यां एके दिवशीं रेवडिचा स्वाद कां न चाखावा॥

ही रेवडीकर हरिदासाच्या कीर्तनासंबंधीची आर्या पंताची पहिली आर्या ह्मणून प्रसिद्ध आहे. परंतु ही कधीं ह्मटली, ह्मणजे पंतानीं ग्रंथरचनेस प्रारंभ केव्हां केला याचा उल्लेख कोठेंही नाहीं. ग्रंथाच्या शेवटीं ग्रंथसमाप्तीची मित्ति देण्याची पंतांची वहिवाट नाहीं. संशयरत्नावली,

मंत्ररामायण, कुशलवचरित, प्रल्हादविजय, साधुसत्कार, नामसुधाचषक रामनामार्या, आर्यामुक्तामाला हे ग्रंथ पूर्ववयांत रचले असावे अशी अटकळ होते. कारण, ' प्रल्हादविजय ' श्रीमती गोपिकाबाईसाहेबांच्या आज्ञेवरून लिहिला, तेव्हां तो तिच्या हयातींतच रचला हें उघड आहे. शिवाय वरील सर्व ग्रंथांचा उल्लेख ' नामरसायन ' या काव्यांत आहे. याच काव्यांत

रघुनाथपंत कोशे संप्रति गेले समीप सेवेला ।
प्रेमें सिंचित होते या कवनातें सखे जसे वेला ॥

असा रा. कोशे यांचा व पुढल्याच गीतींत पंताचे उपाध्ये नारायणभट्ट यांचा उल्लेख आहे. परंतु पुढें सुमारें १७११ त काशीयात्रेस गेल्यावर रचलेल्या गंगावकीलींत या पैकीं कोणाचाच उल्लेख नाहीं. यांनीं आपलें सर्वोत्कृष्ट केकावली (श्लोकबद्ध) हें स्तोत्र मात्र उत्तर वयांत रचलें असावें असें त्यांतील ' कृतांतकटकामलध्वज जरा दिसूं लागली ' या ओळीवरून दिसतें. पंत रचना करीत ती

लिहिलीं होतीं तीहीं लिहितां लिहितां क्षणांत योजून

या प्रमाणेंच जलद असे. एका बैठकीस ते दीडदीडशेंपर्यंत आर्या लिहीत. आर्या करण्याचें श्रम ह्मणून त्यानां पडतच नसत. सहजवृत्तीनें कांहीं लिहावें त्याप्रमाणें ते आर्या लिहीत असत. हल्लीं पंढरपुरास यांच्या वंशजाजवळ यांचे हस्तलिखित ग्रंथ आहेत ते नीट आंखून, मंत्र वगैरे चित्ररचनेचीं अक्षरें तेवढींच निराळ्या टांकांनीं लिहिलेलीं, असे फार काळजीपूर्वक लिहिलेले आहेत. यावरून जशी रचनेंत तशी ती लिहिण्यांतही त्यांची टापटीप दिसून येते. पंतांच्या हयातींतच त्यांच्या काव्यांची फार चहा झाली होती व त्यांच्या आर्या काशी रामेश्वरापर्यंत सर्वांच्या तोंडीं होत्या असें

' या जन्मतांचि गेल्या काशीरामेश्वरा नमायाला ।
प्रौढपणीं आर्यातें जगतीतलही पुरे न मायाला ॥

अशा त्यांच्याच वेळच्या रामचंद्र बडवे या कवीनें केलेल्या उल्लेखावरून उघड होतें. याच कवीनें आणखी ह्मटलें आहे कीं,

सुश्लोक वामनाचा अभंग वाणी प्रसिद्ध तुकयाची ।
ओंवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची ॥

आणि या याच्या ह्मणण्यास सर्वांच्या तोंडून संमति मिळालेलीही नेहमीं ऐकूं येतेच. पंतांनीं देखील आपल्या स्वत:च्या कृतीबद्दल ठिकठिकाणीं मोठ्या अभिमानानें उल्लेख केलेला आढळतो. मयूर किंवा मयूरेश्वर या शब्दांनींच आपल्या नांवाचा त्यानीं ग्रंथांत उल्लेख केला आहे, तोही अगदीं यथार्थ आहे. कारण विद्यादेवी सरस्वती हिचें आवडतें स्थान किंवा वाहन ह्मटलें ह्मणजे मयूरच होय. मोरोपंत हे महाराष्ट्रांतील इतर कर्त्यासवरत्या पुरुषाप्रमाणेंच खर्ड्यांच्या लढाईनंतर पेशवाईचा र्‍हास पहाण्यास वांचले नाहींत. ते शके १७१६ मध्येंच निवर्तले. हें वर आलेंच आहे. सिद्धेश्वर, महेश्वर, सज्जनरंजन, बहिरवनाथ वगैरे लहान लहान कवी मोरोपंतांचेच समकालीन होत. सिद्धेश्वर हे मागें सांगितलेल्या अमृतरायांचे शिष्यवर्गापैकीं एक होत. यांचेही कटाव व पदें हल्लीं प्रसिद्ध आहेत. 'अद्वैतसरणी' हें प्रकरण इतर रचनेच्या मानानें पाहतां बरेंच सरस उतरलें आहे[1]. महेश्वरभट (१६४० ते १७३९) हे स्वत: चांगले विद्वान् होते. यांनीं केलेल्या रचनेपैकीं हल्लीं कांहीं भाग उपलब्ध आहे. ज्योतिषप्रकरणीं व इतर संस्कृत ग्रंथांवर यांची बरीच टीका आहे[2]. सज्जनरंजन [१६९८-१७२६] व बहिरवनाथ [१६६५-१७२३] यांची कविता फारच थोडी प्रसिद्ध आहे. बहिरवनाथ व बहिरापिसा या दोहोंकवीसंबंधें कांहीं ग्रंथकारांनीं बराच घोंटाळा केलेला दिसतो. परंतु हे दोघे कवी अगदी निराळे होत,

---

१ प्रसिद्ध सुभानंत स्वामी हे याच काळीं असावे असा काहींचा अभिप्राय दिसतो. परंतु ते या काळचे नसून याचे आधीं पंचवीस तीस वर्षें होऊन गेले असावे. कदाचित् ते महिपतीचे समकालीन किंवा त्याच्या जरा मागचे असावेत, हेंही संभवनीय आहे. यानीं रचलेलें ओंवीबद्ध 'भीष्मपर्व' माधवचंद्रोबांच्या सर्वसंग्रहांत प्रसिद्ध झालें आहे. तें साधें व सोपें असून चांगलें रसाळ आहे. कांहीं दिवसापूर्वीं यांचे 'उद्योगपर्व' सांपडल्याबद्दलही कोणी छापलें होतें. कदाचित् यांची आणखी बरीच कृति असावी असें वाटतें.

२ मुहूर्तमाला, अद्वैत मकरंद इ. इ.

बहिरवनाथ हे पंतांचे समकालीन व बहिरापिसा हा ज्ञानेश्वराचा समकालीन होय. ' धनेश्वरचरित ' व ' भागवतावरील टीका ' हे ग्रंथ ' बहिरापिसा ' याचे होत. या ग्रंथांशीं बहिरवनाथाचा कांहीं एक संबंध नाहीं.

रामजोशी, अनंतफंदी, देवनाथ वगैरे कवीही याच वेळीं आपल्या कृतींनें महाराष्ट्र भाषेस मंडित करीत होते. रामजोशी हे ' जोशीबोवा ' किंवा ' तात्या ' या नांवानें ओळखले जात. हे सोलापूर, बार्शीकडील राहणारे. यांचा जन्म १६८४त झाला. हे लहानपणींच कांहीं कारणानें रागावून घर सोडून क्षेत्रास गेले व तेथें चांगला विद्याभ्यास करून परत माघारे आले. यांची वृत्ति जरा चैनीची होती. आरंभीं हे डफावर थाप मारून तमाशे करीत. त्यावेळीं पुणें प्रांतांत चोहोंकडे सोन्याचा धूर निघत असे व जिकडे पहावें तिकडे चैनबाज व आनंदांत मग्न अशा लोकांची गर्दी दिसे. यामुळें व मनाच्या स्वाभाविक कलामुळें जोशिबावांनीं तमासगिरपणाचा धंदा पतकरला असावा. आधीं तमाशांना व लावण्या पवाडे वगैरे ह्मणणारांना साहजिकच ऊत आला होता. परंतु त्यांतही जोशीबावांसारख्या ब्राह्मणानें मन घातल्याळें त्या सर्वांवर ताण झाली व यांचीं कवनें ज्याच्या त्याच्या तोंडीं सर्वत्र ऐकूं येऊं लागलीं. यांची कविता प्राय: लावणी छंदांत फार आहे. हे स्वत: व्युत्पन्न व संस्कृत असल्यामुळें यांच्या लावण्यांत अशुद्धतेचा प्रकार कोठेंच दिसत नाहीं, उलट चोंहींकडे शब्दरचनेचा सुंदर थाट नजरेस पडतो. ' कोण्या हो सुभगाची मदनमंजरी ' किंवा ' मनामधें भरली जरा नाहीं ठरली हवेलिंत शिरली ' वगैरे पद्यांतला प्रौढ आणि कोमल अशा शब्दांनीं वर्णन केलेला सहजशृंगार, ' तसेंच भला जन्म हा तुला लाभला ' वगैरे पद्यांतील कडाक्यांची हातोटी ' भूतळांत जशी या स्थळांत यमुना चळांत ' या पद्यांतील स्थलवर्णन पाहून कवीच्या कर्तबगारीबद्दल कोणासही आनंद होण्यासारखा आहे. याच्या लावण्यांत जसा प्राकृत शब्दांचा तसाच संस्कृत शब्दांचाही भरणा फार आढळतो. परंतु त्यांची आपल्या काव्यांत कवीनें इतक्या खुबीनें मिसळ करून

दिली आहे कीं, त्यांपासून श्रोत्यांस व वाचकांस आनंदच होतो. खेरीज कवीचें आपल्या वर्णनाशीं व विषयाशीं तादात्म्य पाहूनही फार नवल वाटतें. याचा शृंगाररस पाहून हा कोणी विलासवान मर्द फांकडा असावा अशी जशी कल्पना होते, तशीच याचे उपदेशपर व वैराग्यपर चुटके पाहिले ह्मणजे हा सर्व ऐहिक सुखांना तुच्छ मानणारा कोणी सिद्ध पुरुष तमासगिराच्या जन्मास आला आहे कीं काय असा भास होतो. यांच्या साठ सत्तर लावण्या हल्लीं प्रसिद्ध आहेत. यांत छेकापन्हुति ही यांची लावणी फार प्रसिद्ध आहे. हिचे ईश्वर भक्तिपर व शृंगारिक असे दोन तऱ्हांनीं अर्थ लावतां येतात. यांच्या लावण्यामुळें यांची ख्याति सर्वत्र झाली हें वर आलेंच आहे. आपलें कवन पंतांच्या कानावर जावें अशी यांस इच्छा फार होती. एकदां तसा योगायोग जुळून आला. त्यावेळीं सर्व प्रसंग आटोपल्यावर मोरोपंतांनीं रचनेची फार तारीफ केली व यांस ‘ यापेक्षां हरिकीर्तन करा ’ असा बोध केला. लागलाच जोशीबुवानीं डफ फोडून टाकला व पुढें ते कथाकीर्तन करूं लागले. या कामांतही त्यांनीं फार लौकिक मिळविला. सभापांडित्य, समयसूचकता, बहुश्रुतपणा वगैरे गुण अंगांत पूर्वीपासून असल्यामुळें यांची कथा नीलकंठशास्त्री यांच्यासारख्यांसही फार आवडे. कथेंत मोरोपंतांच्या आर्या फार ह्मणत व त्यांचे निरनिराळ्या तऱ्हेनें अर्थ लावण्याची यांना फार हौस असे, किंबहुना पंतांच्या आर्या इतक्या लवकर महाराष्ट्रभर पसरण्यास व त्या लोकांस इतक्या प्रिय होण्यास जोशिबुवाच पुष्कळ अंशीं कारण झाले असें ह्मणतात. कीर्तनप्रसंगीं हे स्वतः रचलेले कटावही ह्मणत. यांचा ‘ छंदोमंजरी ’ नांवाचा ग्रंथही फार नांवाजलेला आहे. खेरीज ‘ मदालसाचंपू ’ वगैरे संस्कृतरचनाही यांनीं केली आहे. यांच्या कृतीचा बराच भाग अद्यापि प्रसिद्ध झाला नसावा असा पुष्कळांचा समज[1] आहे. यांचा काल शके १७३४मध्यें पुण्यास झाला.

---

१ रामजोशी कृत लावण्या व वि. ज्ञा. विस्तार. सोलापूर प्रांतांत यांची बरीच कृति पुष्कळांनीं पाहिली आहे.

अनंतफंदी हेही या काळच्या चांगल्या हरिदासांपैकीं एक होते. यांचा जन्म शके १६१९मध्यें नगर जिल्ह्यांत संगमनेर येथें झाला. यांचे वडील भवानीबावा घोलप हे चांगले विद्वान् ब्राह्मण होते असें दिसतें. परंतु यांचा वडिलोपार्जित धंदा ह्मणला ह्मणजे सराफीचा होय. अनंतफंदी हेही जोशीबुवाप्रमाणेंच आपल्या पूर्ववयांत तमाशे करीत असत. परंतु यांची वाणी फार रसाळ असल्यामुळें, यांची कीर्ति अहिल्याबाई होळकरणीचे कानापर्यंत ती संगमनेरास असतां गेली. तेव्हां बाईनें फंदीस उपदेश केला कीं, तुह्मी ब्राह्मण असून तमाशा करतां हें नीट नाहीं. देवानें तुह्मांस सुधातुल्य वाणी दिली आहे, तिचा उपयोग परमेश्वरस्तवनाकडे करावा. यानंतर फंदीबावा कीर्तन करूं लागले. यांचे पवाडे, कटाव, लावण्या, वगैरे लेख प्रसिद्ध आहेत. यांचेसंबंधीं ज्या महदाख्यायिका हल्लीं ऐकूं येतात, यांवरून यांच्यावर पेशव्यांचा बराच लोभ असावा असें दिसतें. यांनीं[1] 'श्रीमाधव ग्रंथ' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. यांत श्रीमंत सवाई माधवराव साहेबांनीं वाड्यांत उडी टाकल्यापासून तो शेवटले बाजीरावसाहेब गादीवर येईपर्यंतच्या हकीगतीचें वर्णन केलें आहे. या कथानकाचे हल्लीं ६ भाग उपलब्ध आहेत. हें वर्णन फार गोड असल्यामुळें काव्य या नात्यानें तर तें संग्रहणीय आहेच, परंतु हें बाजीराव साहेबांनीं स्वहस्तें सर्व हकीगतचा मजकूर लिहून मग त्याप्रमाणें कवीकडून करविलें असल्यामुळें ऐतिहासिक दृष्टचाही त्याचा बराच उपयोग आहे. यांत ह्मटलें आहे कीं,

> हें कथानक राघवपुत्रें । आपुल्या स्वहस्तें लिहिलीं पत्रें ।
> त्या पत्रांवरून हीं चरित्रें । कवीनें कविता केली असे ॥
> यांत पदरचें नाहीं यत्किंचित् । बाजी रघुनाथ साक्षभूत ।
> टीका केली प्राकृत । लहान थोरांस समजावया ॥

या ग्रंथाचा कांहीं भाग नवनीतांत ही एका आवृत्तींत दिला होता. या-

---

१ अनंतफंदीकृत लावण्या.

खेरीज फंदीचे फटके वगैरे अजूनही गोंधळ्यांच्या तोंडीं पुष्कळ आहेत. अनंतफंदी हे शके १७४१मध्यें वारले

वर सांगितलेल्या तिघांपैकीं तिसरे देवनाथ हे होत. हे सुर्जी अंजनगांव येथील राहणारे. येथें अजूनही त्यांचा मठ व शिष्यपरंपरा आहे. यांचा जन्म १६७६मध्यें माघमासीं झाला. यांना लहानपणीं शिपाईगिरीची हौस फार होती. परंतु पुढें त्यांनीं अनुग्रह घेतला, व मठस्थापना केली, हे फार निस्पृह व स्पष्टवक्ते असे होते. यांचीं दोन चार आख्यानें व कांहीं पदें, अभंग, दोहरे, कटिबंध वगैरे कविता हल्लीं प्रसिद्ध आहेत.[२] हे कीर्तन करीत असत. कीर्तनांत हे आपलींच पदें ह्मणत. यांचीं भक्तिपर, वेदांतपर, व बोधपर पदें फार सुरस आहेत. कविता जरी थोडी आहे तरी या कवीची चांगल्या कवींत गणना करण्यासारखी त्याची कृति आहे. श्रीमंत सवाई माधवराव साहेबांच्या मातोश्री गंगाबाईसाहेब यांनीं देवनाथांचा अनुग्रह घेतला होता, असें सांगतात. देवनाथ हे आपल्या वयाच्या ६७व्या वर्षीं ह्मणजे १७४३ मध्यें मृत्यु पावले.

रामजोशी, अनंतफंदी व देवनाथ हे तिघेही कीर्तन करीत ह्मणून वर सांगितलेंच आहे. कीर्तनकार हरिदासांमुळें आपल्या सारस्वताचा बराच फायदा झाला आहे. एकंदर कीर्तनांत रंग यावा ह्मणून हे चांगल्या चांगल्या कवींच्या कवनांचा संग्रह करून त्यांतील चुटके आपण ह्मणत, व शिवाय प्रसंगयोग्य व आपापल्या आवडत्या आख्यानास साजेल अशा संविधानकासंबंधीं कविता करीत. यामुळें नवीन रचना करण्याचें व जुनी कविता जपून ठेवण्याचें अशीं दोन्ही कामें यांचेकडून नेहमीं होत. खेरीज कीर्तनांत पद्यें ह्मणावयाचीं ह्मणजे तींही निवडक असत. यामुळें इतर जनांचे कानांवर कवींच्या कृती जाऊन त्यांस त्या त्या कवींचे इतर ग्रंथ वगैरे पाहण्याची जिज्ञासाही

---

१ यांचे मागें यांचे चिरंजीव श्रीपतफंदी १७१९–९४ व नातू अनंतफंदी व गणपतफंदी हेही कविता करीत. हल्लीं याचे वंशज संगमनेरास आहेत व यांची कविताही त्याच प्रांतांत बरीच आहे.

२ काव्यसंग्रह.

सहज उत्पन्न होई. आणि यामुळेंच जुन्या लोकांत कवींच्या कृतींचा संग्रह करण्याची चाल असे; हल्लींही जुनीं काव्यें उपलब्ध होण्याचा मुख्य मार्ग ह्मटला ह्मणजे हरिदासच होत. परंतु कालमानानें हरिदासांची वृत्ति कमी होत चालली आहे, त्या मानानें लोकांतली महाराष्ट्र कवींवरची भक्तीही नाहींशी होत आहे. तरी इतके दिवस छापखानें वगैरे साधनें नसतांही चांगलीं चांगलीं काव्यें जपून ठेवल्याबद्दल या हरिदासांचे महाराष्ट्रीयांवर अनंत उपकार आहेत. हा काल ह्मणजे जवळ जवळ पेशवाईची अखेर होय. या वेळीं पुष्कळ कवी प्रसिद्ध होते. ज्या पुरुषांनीं आपल्या पूर्ववयांत सवाई माधवरावाचे लग्नाचा थाट किंवा रंगाचा देखावा पाहून आपल्या डोळ्याचें पारणें फेडलें होतें, व उतारवयांत त्या नांदत्या शनवारच्या वाड्यावरील जरीपटका जाऊन तेथें तांबडें निशाण आलेलें आंसवांनीं भरलेल्या डोळ्यांनीं ज्यांनीं पाहिलें असेल, त्यांत प्रभाकर कवि हे श्रेष्ठ होते. हे वावझेंपाली[१] येथील राहणारे असत. यांचा जन्म श० १६९१मध्यें झाला. यांचे वडिलांचें नांव जनार्दनपंत. यांच्या लावण्या, व कटाव हल्लीं फार प्रसिद्ध आहेत. आपल्या कृतीनें यांच्या वर्गातल्या इतर सर्व कवींवर यांनीं कडी केली आहे. यांचे ' रंग ' ' लक्ष्मीपार्वतीसंवाद ' वगैरे चुटके पाहिले ह्मणजे यांच्या रचनाकौशल्याचा फार चमत्कार वाटतो. पेशवाईतील बऱ्याच गोष्टींच्या हकीगतीवर यानी फारच सुरस पवाडे रचले आहेत. यांची वर्णन करण्याची शैली इतकी उत्कृष्ट आहे कीं वाचतांना किंवा ऐकतांना शब्दांचा ठसा एकदां जो मनावर उमटतो तो बहुतकरून पुढें तसाच राहतो. यांची बहुतेक कविता अद्यापि अप्रसिद्ध आहे असें ह्मटलें पाहिजे. नाहीं ह्मणण्यास नवनीतांत किंवा इतर ठिकाणीं कांहीं

१ हर्णई मुरूड येथील राहणार असें ' ऐतिहासिक पवाडे ' यांत दिलें आहे.

१ यांची एकुलती एक मुलगी श्रीमंत पटवर्धन यांचे येथें दिली होती. तिजजवळ आपल्या बापाची बरीच कृती असल्याबद्दल तिला ती वाचून दाखवणाऱ्या, एका गृहस्थाकडून कळतें व त्या गृहस्थाचे सांगण्यावरूनच यांस ' वांवझेपाली ' येथील राहणारे असें ह्मटलें आहे. प्रभाकराच्या बहुतेक कवनांच्या शेवटीं ' गंगु हैबती ' व ' महादेव ' यांचीं नांवें आढळतात. परंतु हे दोघेही कोण होते व प्रभाकराशीं यांचा काय संबंध होता हें कळत नाहीं. यापैकीं पहिला शाईर असावा.

कांहीं कवनें मात्र आढळतात. खेरीज थोडेसे पवाडे आणि कांहीं लावण्या प्रसिद्ध आहेत. हा कवि श० १७६९मध्यें परलोकवासी झाला. याच्या वेळेस दयाळनाथ, लोकनाथ, कृष्णदास, काशिकवि, चिमणकवि, राघवकवि वगैरे पुष्कळ कवी कविता करीत असत. दयाळनाथ हा देवनाथांच्या शिष्यवर्गापैकीं एक होय. याची कविता गोड व शुद्ध आहे; तीपैकीं बराच भाग हल्लीं काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झाला आहे. लोकनाथ व कृष्णदास हे दोघेही अगदीं पेशवाईच्या अखेरचे होत. लोकनाथाचें गोपिकृष्णाख्यान व कांहीं पदें व कृष्णदासाचीं फक्त पदें मात्र प्रसिद्ध आहेत. काशिकवि हाही याच काळचा असावा. काशिकविकृत कृष्णपत्न्यांच्या स्वयंवरावर लावण्या व कांहीं पदें प्रसिद्ध आहेत. या कवीबद्दल विशेष माहिती कोठें नाहीं. परंतु याच्या पद्यांत व मोरोपंतांच्या आर्यांत कांहीं ठिकाणीं इतकें साम्य आढळतें कीं, त्यामुळें हा कवि पंतांच्या मागचा असला पाहिजे असें ह्मणावें लागतें. काशिनाथकवीचें 'किंचित् रामायण' ह्मणून-श्रीधराच्या रामविजयाचें सार आहे. तो व हा काशिकवि एकच असतील तर याचीं लहानसहान बरींच प्रकरणें आहेत व हा अगदीं अलिकडचा असावा असें त्याच्या काव्यावरून सिद्ध होतें. याची कविता अजून छापली नाहीं. चिमणकवि [१७३९-१७८४] हा चांगला विद्वान् शास्त्री होता. यानें हंसपद्धति या नांवाचा सुमारें पांच हजार ओव्यांचा एक ग्रंथ लिहिला आहे. राघवकवि हा जबलपूर प्रांताकडील राहणारा होय. यानें वीरमणिकथा, सुरतसुधन्वावध, शिबिचक्रवर्त्याख्यान वगैरे प्रकरणें लिहिलीं आहेत. यांखेरीज आणखीही अनेक कवि याकाळीं होऊन गेले. परंतु त्यांपैकीं ह्मणण्यासारखे कोणाचेही ग्रंथ अजून प्रसिद्ध झाले नाहींत. शेवटल्या बाजीराव साहेबांचे प्रसिद्ध दिवाण माणकेश्वर हेही फार चांगली रचना करीत, अशी ख्याति आहे. ऐकेवेळीं त्यांनीं आपल्या कृतीनें महाराष्ट्रास रंजविलें होतें असें दिसतें. ज्या पुरुषानें आपल्या पूर्ववयांत हातीं वीणा घेऊन हरिदासवृत्तीनें देशाची सेवा केली, व पुढें प्रसंग येतांच वीणा ठेउन हातांत लेखणी घेतली व त्या कृतींत आपले सर्व दिवस घालविले, त्या पुरुषाचे अंगीं कांहीं तरी तसेच

गुण असले पाहिजेत हें उघड आहे. त्याच्या कृतीला महाराष्ट्रीयांनीं तर चांगलें ह्मटलेंच आहे, पण डफसारख्या परकीयांनीं जर आपली मान डोलविली आहे, व या कृतीचा अवश्य संग्रह करून ठेवावा अशी त्यांनीं एतद्देशियास आग्रहानें सूचना केली आहे. यावरून माणकेश्वराची कृति खरोखरीच चांगली असली पाहिजे, असें वाटतें. याखेरीज आणखीही कित्येक कारणावरून त्याची कृति पाहण्याची जिज्ञासा साहजिक उत्पन्न होते. परंतु हल्लीं तिचा कोठें मागमूसही लागत नाहीं.

पेशवाईचे ऐन अमलांत जसे पौराणिक कवी पुष्कळ होऊन गेले, तसेच शाईरही पुष्कळ झाले. शिवाजी महाराजांची तलवार म्यानांतून बाहेर पडल्यावर, इतर देशी गोष्टींप्रमाणें शाईरांच्या धंद्यालाही भरती आली. किंबहुना हा धंदा तेव्हांच उत्पन्न झाला असावा असेंही वाटतें. कारण यांच्या कवनाला पराक्रमी पुण्यपुरुषांचे पराक्रमच विषयीभूत होतात. देशांत पराक्रमी पुरुषच जर झाले नाहींत, तर पवाडे तरी रचावे कशावर, आणि ह्मणाचे कोणापुढें? तैमुरलंगानें मोठी तरवार गाजवली किंवा लार्ड राबर्टसनीं आफ्रिडीस लोकांचा समूळ नाश केला, तर त्यावर रचलेला पवाडा सह्याद्रीच्या पायथ्यापासल्या गांवढ्यांतल्या लोकानां आवडेल असें कधींही होणार नाहीं. यामुळें आपल्या कवित्वापैकीं या भागाचा जन्मच मऱ्हाटेशाईच्या जन्माबरोबरचा असला पाहिजे हें उघड आहे. जसें नवें कवित्व निघालें तशीच त्याची रचनापद्धतीही अगदीं नवीन वृत्तांतच झाली. पवाडे व लावण्या हे अगदीं निव्वळ देशी छंद होत. या छंदांचें जनकत्वही निव्वळ देशी लोकांकडेच आहे. या तऱ्हेचीं कवनें रचणारांच्या अंगांत विद्वत्तेपेक्षां कवित्वाच्या स्वाभाविक स्फूर्तीचाच भाग विशेष लागतो. आणि यामुळेंच हे छंद सर्व देशभर आबालवृद्धांना प्रिय होतात. अशा तऱ्हेचीं कवनें रचणारे व ह्मणणारे मुख्यत्वेंकरून शाईर, गोंधळी, भराडी, तमासगीर वगैरे लोक होत. यांचा उदरनिर्वाह यात्र धंद्यावर चालतो. हल्लीं उपलब्ध असलेल्या पवाड्यांत सर्वांत जुना पवाडा शिवाजी महाराजांनीं अफजुलखानास मारिलें त्यासंबंधाचा आहे. याचा कर्ता अज्ञा-

नदास किंवा अग्निनदास या नांवाचा त्याच काळचा शाईर होता. या
अज्ञान किंवा अग्निदासाचाच कोणी तुळशीदास या नांवाचा नातलग
याच काळीं होता. याचाही, तान्हाजीनें सिंहगड घेतला, त्या प्रसंगाचा
पवाडा हल्लीं प्रसिद्ध आहे. पहिल्याचे ३७ व दुसऱ्याचे ९९ चौक
आहेत. दोन्ही पवाडे सुरस असून कोणाही मराठ्याचे अंगांत रेड्याचें
बळ आणण्यासारखे आहेत. बेमामाळी, कृष्णा वाण्या, पिराजी, हरी
रामा, यमाजी वगैरे शाईरांचेही जुने जुने पवाडे हल्लीं छापले आहेत.
ही सर्व मंडळी कवनें करणारी होत. परंतु पवाडे रचण्याचें खरें चातुर्य
पहावयाचें तर तें प्रभाकर, अनंतफंदी, सगनभाऊ, होनाजीबाळ, बाळा
बहिरू वगैरेंचें कवनांतच दिसेल. पवाड्यांचे संबंधानें सर्वांत गोंध-
ळ्यांची ख्याति विशेष ऐकूं येते. असें होण्याचें कारण एकटा रामा
गोंधळी होय असें सांगतात. जसें शेक्सिपीयरनें नाटकें रचलीं, किंवा
पंतांनीं आर्या केल्या, परंतु त्यांची कृति लोकांपुढें मांडून लोकांत ह्यावि-
षयीं अभिरुचि ग्यारिक किंवा रामजोशी यांनीं उत्पन्न केली, त्याप्रमा-
णेंच कवनें पुष्कळांनीं रचलीं, परंतु त्यांचा सर्व महाराष्ट्रास रामा
गोंधळ्यानें चटका लावला. पूर्वी तो पेशव्यांचें पदरीं होता, परंतु स्वराज्या-
बरोबर हाही इतर वस्तूप्रमाणेंच पुणें सोडून पुढें बडोद्यास गेला. त्यानें
चांगलें नांव मिळविलें. अजूनही लोक त्याला मृत्युलोकचा गंधर्व
ह्मणतात. पंढरीस गळ्यांत माळ घालून वारकऱ्याबरोबर जसे मुसलमा-
नही नाचूं लागले, तसेंच पवाडेकार मंडळींत देखील सुलतान पारद
हुसेन वगैरेंच्या वाणीला, मराठ्याचें वैभव पाहून भरतें आलें. महारा-
ष्ट्रांतील चांगले चांगले पवाडे मिळून एकेठिकाणीं छापण्याचें काम आधीं
शाळिग्राम यांनीं व नंतर शाळिग्राम व आक्वर्थ यांनीं केलेलें सर्वांस
ठाऊक आहेच.[1]

१ या पुस्तकांत आरभींच प्रस्ताविक लेखांत साहेब मजकूर मे० आक्वर्थसाहेब
यांनीं ह्मटलें आहे कीं, पुढील कवनांत उत्कृष्ट उतरलेलीं अशीं जीं कवनें
आहेत त्यांत मराठ्यांचे अपयशाचेंच वर्णन आहे. या सर्वांत सर्वोत्कृष्ट असा
ह्मणजे एक पानपतचा पवाडा किंवा एक खडकीच्या लढाईवरचा. साहेब बहादुरांस
वर सांगितलेले पहिले २ पवाडे आवडले नाहींत. रमाबाईवरचाही उत्तम वाटला

पवाड्याप्रमाणेंच लावण्या व कटाव यांजसंबंधेंही व्यवस्था होणें इष्ट आहे. परंतु अजूनपर्यंत भाषेंतील सारस्वत, या दृष्टीनें त्यांचा कोणीही नीट संग्रह केलेला आढळत नाहीं. लावण्यांचा असा संग्रह न होण्याचें कारण त्यांसंबंधीं थोडासा गैर समज झाला आहे हें असावें. पुष्कळ श्रृंगारिक कवनें लावणी छंदांतच रचलीं असल्यामुळें, व त्यांतही पुष्कळांत अश्लीलत्वाचा प्रकार ओतप्रोत असल्यामुळें, लावणी ह्मटली कीं पुष्कळ लोकांना त्या शद्बाबरोबर अश्लीत्वाची कल्पना होते, यामुळें लावण्यांचा संग्रह कोणी केला नसावा; असें सरसकट मानणें जरा गैर दिसतें. पुष्कळ लावण्या अशा आहेत कीं, त्यांत अश्लीलत्वाचाचसा काय पण नुसत्या श्रृंगाराचाही मागमूस लागणार नाहीं. तेव्हां कांहीं कवनामुळें त्या छंदांतील सर्वच कवनांना टाकून न देतां, त्यांची निवड करून संग्रह अवश्य केला पाहिजे.

पेशवाईच्या अखेरपर्यंत ऐतिहासिक ग्रंथापलीकडे गद्य ग्रंथाची मजल गेली नाहीं. कदाचित् उपदेशपर किंवा नीतिमार्गदर्शक कांहीं लेख लिहिले गेले असण्याचा संभव आहे; परंतु त्यांपैकीं हल्लीं कांहींच उपलब्ध नाहींत. मुलांना लिहिण्यासाठीं लिखिताकरतां, कांहीं सुरस कथांतील भाग किंवा दशावतारवर्णनें किंवा इतर कांहीं पौराणिक गोष्टी वगैरे असावींत असें दिसतें. अजूनही कित्येक ठिकाणीं असले लेख मुलांचे दप्तरांत दृष्टीस पडतात; परंतु त्याचें महत्व किंवा ते रचण्याचा हेतु यापलीकडे कांहीं असेल असें वाटत नाहीं.

ऐतिहासिक ग्रंथकारांपैकीं मल्हारराव चिटणीस व कृष्णाजीपंत सोहोनी हे दोघेही चांगले नांवाजलेले ग्रंथकार होत. मल्हारराव हे छत्रपतींच्या

मागील पानावरून पुढें चालू.

नाहीं. प्रभाकराच्या 'रंगांत' ही त्यांचें मन रंगलें नाहीं. खर्ड्याच्या लढाईवरील त्यांत दिलेल्या ८ कवनांतून एकही पसंत पडलें नाहीं, तसेंच फंदी अनंत कवनांचा सागर पण त्या सागरांतदेखील एखादें रत्न त्यांच्या हातीं गावलें नाहीं, व अगदीं साधारण असा ज्यांत मराठ्यांचा समूळ नाश झाला, व इंग्रजांचा जय झाला, त्या खडकीच्या लढाईवरील पवाडा त्यांस उत्तमोत्तम वाटला. ही केवळ आवड गोड.

पदरीं असून त्यांनीं आपले ग्रंथही सरकारी कामावर असतांच लिहिले आहेत. मशारनिल्हे मल्हारराव यांस पेशव्यांकडून जरा त्रास सोसावा लागला असल्यामुळें, ऐतिहासिक दृष्ट्या पाहतां यांची लेखणी कदाचित् समतोल राहिली नसली, तरी आपल्या भाषेंतील ग्रंथकार या नात्यानें मल्हाररावजींची कृति अभिनंदनीय आहे. यांस आधीं पुष्कळ माहिती असल्यामुळें व सरकारांतील कागदपत्र वगैरे सर्व पाहण्याची यांस पूर्ण सवलत असल्यामुळें, यांनीं ग्रंथही बरेच लिहिले आहेत. हल्लीं काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेले असे यांचे पांचसहा ग्रंथ उपलब्ध आहेत. या ग्रंथांत मराठेशाईच्या प्राणप्रतिष्ठेपासून तो तिच्या अखेरपर्यंतची बहुतेक हकीगत आली आहे. दुसरे गृहस्थ कृष्णाजीपंत सोहोनी यांचेविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. तरी हे पेशवाईत चांगल्या हुद्याच्या कामावर असावेत असा अंदाज वाटतो. पेशवाईनंतर पुष्कळ लोकांनीं आपले रोजगार सोडून संन्यासग्रहण केला; त्यापैकींच हे एक होत. चतुर्थाश्रम धारण केल्यानंतर हे वैजनाथ येथील देवालयांत रहात असत. तेथें असतांना तेथील गांवकऱ्यांना यांनीं अव्वलपासून अखेरपर्यंतची पेशवाईची हकीगत आपल्या तोंडानें सांगितली; हीच हकीगत हल्लीं ‘ पेशव्यांची बखर ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. पंतांची अफाट माहिती व ती जुळवून तोंडानेंच संगतवार सांगण्यासारखें त्यांचें बुद्धिसामर्थ्य हीं केवळ अलौकिक होत. महाराष्ट्रांतील अत्युत्कृष्ट कुळाची त्यांच्या पडत्या काळांत मोठ्या अभिमानानें या पुरुषानें सांगितलेली ही हकीगत फारच हृदयंगम आहे. यांपैकीं कित्येक गोष्टी पंतांनीं स्वतः पाहिलेल्या असल्यामुळें त्यांचें वर्णन तर उत्कृष्टच झालें आहे. तशीच या बखरीची भाषा अगदीं अलीकडची असल्यामुळें तींत हिंदुस्थानी शब्द फार कमी आले आहेत. एकंदर हा ग्रंथ शुद्ध, सोपा व सरळ आहे. आपल्या भाषेंतील गद्य ग्रंथांपैकीं बराच भाग अजून प्रसिद्ध होणें आहे. एकट्या पेशव्यांचेंच दफ्तर म्हटलें तरी तें किती मोठें आहे याची कल्पना आतां सर्वांस झालीच आहे. आणि अशी त्यांच्या सरदारांची फडनिसांची वगैरे दप्तरेंही

प्रसिद्ध होणें अवश्य आहे. अशा कामास रा० खरे व राजवाडे यांनीं हात घातला आहेच, तेव्हां आतां तें कसें तडीस जाईल, याबद्दल काळजी उरली नाहीं. तथापि आपलें गद्य सारस्वत इंग्रजी अंमलापासून पुढेंच वाढत गेलें आहे. याकरितां त्याचा विचार त्या भागांतच होणें इष्ट आहे.
